

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन!

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी




सोने लाखात देखणे! वर्षभरात घसघशीत परतावा « नाशिक आज

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : १९९ ■ नाशिक, सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


# शेतकऱ्यांना दिवसा बारा तास मोफत वीज

## मुख्यमंत्री : दरवर्षी विजेचे बिल कमी होणार



**मुंबई :** शेतकऱ्यांना डिसेंबर २०२६ पर्यंत दिवसा बारा तास शेतीसाठी मोफत वीज देऊ तसेच दरवर्षी शेतकऱ्यांचे विद्युत बिल कमी होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. विहीर पुनर्भरण योजना जर हातात घेतली तर त्याचा फायदा होईल, विहिरींची पातळी वाढेल, आपण जर असाच उपसा करीत राहिलो तर आपलाही प्रदेश रेगिस्तान झाल्याशिवाय राहणार नाही, असा संभाव्य धोकाही देवेंद्र फडणवीस यांनी बोलून दाखवला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. आर्वी येथे बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिवसभर शेतीसाठी वीज देण्याची घोषणा केली. तसेच, महाराष्ट्रात दरवर्षी विजेचे बिल कमी होणार आहे, इतक्या मोठ्या प्रमाणात लोकांना दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र देशात पहिले राज्य ठरले आहे. ज्या राज्याने विजेचे बिल दर ५ वर्षांनी कमी करून दाखवले, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले. लोअर वर्धा प्रकल्पावर पाचशे मेगावॅट वीज निर्मिती प्रकल्प उभारला जात आहे. वर्धा जिल्हा सौरऊर्जेच्या बाबतीत पूर्णतः स्वयंपूर्ण होईल. तर, नेरी मिर्झापूर गावाला संपूर्ण सौरऊर्जा देण्यात आली आहे, असे म्हणत फडणवीसांनी येथील गावकऱ्यांचे अभिनंदन केले.

### प्रत्येक घरावर सोलर

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि शिवराजसिंह चौहान यांनी प्रत्येकाला घर देण्यासाठी पाऊल उचलले आहे. घरासाठी दोन लाख रुपये मिळतील. हा निर्णय आपण केला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रत्येक घरावर सोलर लागेल. त्यामुळे नागरिकांना मोफत वीज मिळेल, असेही फडणवीसांनी म्हटले.

### विदर्भात ७ लाख कोटींची गुंतवणूक

नवीन रस्त्यामुळे कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून दिली जाईल. रोजगार उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येते आहे. दाओस येथील दौऱ्यानंतर जवळपास ७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. भविष्यात वर्धा जिल्ह्यासाठी ही गुंतवणूक फायद्याची आहे, असेही फडणवीसांनी म्हटले.



नाशिक : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी काल रविवारी शालिमार चौकातील पुतळ्याजवळ अभिवादन करताना खासदार राजाभाऊ वाजे, खा. डॉ. शोभा बच्छाव, आमदार देवयानी फरांदे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, आकाश छाजेड, रंजन ठाकरे, लक्ष्मण सावजी आदी. यावेळी डॉ. आंबेडकर अनुयायी मोठ्या संख्येने अभिवादनासाठी उपस्थित होते. (छाया : रविकांत ताम्हणकर)

# प्रत्येक हिंदूचे रक्षण करण्यास वचनबद्ध : योगी

**लखनौ :** आपल्याला प्रत्येक हिंदूचे रक्षण करावे लागणार असून, यासाठी भाजपा वचनबद्ध आहे. म्हणून नागरिकत्व कायदा लागू करण्यात आला. काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने त्याला विरोध केला. दलित आणि वंचितांच्या जमिनीवर कब्जा करणारे बहुतेक लोक विरोधी पक्षातील आहेत, पण आता जेव्हा सरकार कारवाई करते, तेव्हा हे लोक पळून जातात, असे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितले.

काँग्रेस आणि समाजवादी पक्ष देश तोडणाऱ्या घटकांच्या पाठीशी उभे राहिले आहेत. वक्फच्या नावाखाली लाखो एकर जमीन बळकावण्यात आली आहे. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये तीन हिंदूंची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. त्यांना घराबाहेर ओढून नेण्यात आले आणि त्यांची हत्या करण्यात आली. हे लोक कोण आहेत? हेच दलित, वंचित आणि गरीब हिंदू आहेत ज्यांना या भूमीचा सर्वाधिक फायदा होणार आहे.

विरोधकांवर निशाणा साधताना योगी म्हणाले, या लोकांना भीती वाटते, की जर गरिबांना उंच इमारती मिळाल्या, तर यांची व्होट बँक नष्ट होईल. म्हणूनच हे लोक हिंसाचार भडकावत आहेत. काँग्रेस आणि समाजवादी पक्ष देश तोडणाऱ्या घटकांच्या पाठीशी उभे राहिले आहेत. आम्ही विधानसभेच्या प्रत्येक सदस्याला संविधानाची मूळ प्रत दिली. जेणेकरून प्रत्येक सदस्याला संविधानाच्या गाभ्यात काय आहे हे समजू शकेल. काँग्रेसने प्रस्तावनेत कशी छेडछाड केली, असे त्यांनी सांगितले.

# भूषण गवई सरन्यायाधीश

## १४ मे रोजी घेणार शपथ



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई १४ मे रोजी भारताचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांना राष्ट्रपती भवनात शपथ देतील. गवई हे भारताचे ५४ वे सरन्यायाधीश म्हणून काम पाहतील आणि त्यांचा कार्यकाळ २३ नोव्हेंबर २०२५ रोजी संपेल. ते सरन्यायाधीश पदावरून निवृत्त होत असलेल्या संजीव खन्ना यांची जागा घेतील.

न्यायमूर्ती मोहम्मद हिदायतुल्ला आणि शरद अरविंद बोबडे यांच्यानंतर गवई हे नागपूर बार असोसिएशनचे तिसरे सदस्य असतील. ज्यांना सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून काम करण्याची संधी मिळेल. न्यायमूर्ती गवई मूळचे अमरावतीचे आहेत. ते माजी राज्यपाल आणि आरपीआय नेते रा. सू. गवई आणि कमलाताई गवई यांचे पुत्र आहेत. अमरावती येथून सुरुवातीचे शिक्षण घेतल्यानंतर गवई यांनी मुंबईतून कायद्याची पदवी मिळवली. काही काळ त्यांनी मुंबई आणि अमरावती येथे वकिली केली./-...४

### झाड कोसळून महिला ठार

**नाशिक : प्रतिनिधी**

गंगापूर रोडवरील सोमेश्वर बस थांब्याजवळ रविवारी (दि.१३) दुचाकीवर झाड कोसळून यात महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अलका अनिल सोनवणे (५५, रा. शिवाजीनगर) असे मृत झालेल्या महिलेचे नाव असल्याचे गंगापूर पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी गंगापूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गंगापूर गावातून मुलगा दीपक अनिल सोनवणे (३६, रा. शिवाजीनगर) याच्यासोबत अलका सोनवणे या दुचाकीवर पाठीमागे बसून शिवाजीनगरच्या दिशेने प्रवास करत होत्या. सकाळी नऊच्या सुमारास सोमेश्वर बसथांब्याजवळ अचानकपणे रस्त्यालगतचे मोठे झाड त्यांच्या दुचाकीवर कोसळले.

**(सविस्तर आतील पानात)**

# निफाड, चांदवडला गारपिटीचा तडाखा

## द्राक्षमण्यांना तडे; कांदा, गव्हाचे नुकसान

**निफाड : प्रतिनिधी/वि.प्र**

तालुक्याच्या काही भागात कालही वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. त्यामुळे द्राक्षमण्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हरभऱ्याच्या आकाराच्या गारा शिरवाडे, गोरठाण आणि शेजारच्या चांदवड तालुक्यातील वडनेरभैरव भागात कोसळल्या.

रविवारी (दि. १३) दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसासह गारपीट झाल्यामुळे कांदा तसेच काढणीला आलेल्या गव्हाचे व भाजीपाला पिकांचे नुकसान झाले. या आठवड्यात दुसऱ्यांदा तालुक्यात अवकाळी पाऊस झाला. महसूल विभागाने या पीक नुकसानीचे पंचनामे करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

गेल्या आठ दिवसांपासून तालुक्यात उन्हाच्या तीव्रतेत मोठी वाढ झाली आहे. तापमानाचा पारा चाळिशीपार गेल्याने सामान्य नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. सध्या तालुक्यात द्राक्षबागांसह कांदा तसेच गहू काढणीचा हंगाम सुरू आहे. मात्र, हा हंगाम सुरू असतानाच रविवारी दुपारी तालुक्याच्या उत्तर पट्ट्यात वादळी वारे वाहू लागले अन् अचानक आकाशात /-...४

### येवल्यात दुसऱ्या दिवशीही गारपीट



**येवला : प्रतिनिधी**

शहर व तालुक्यात बेमोसमी पावसाने धडाका लावला असून, सलग दुसऱ्या दिवशी येवला तालुक्याला गारपिटीसह अवकाळी पावसाने झोडपले. दुपारी दोनच्या सुमारास राजापूर, पिंपळखुटे, ममदापूर, सोमठाणे या भागामध्ये अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतीपिकांचे नुकसान झाले. काढणीसाठी तयार असलेल्या गहू व कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अचानक आलेल्या गारपिटीने शेतकऱ्यांची धांदल उडाली.

# 'एनआयए' घेणार तहव्वूर राणाच्या आवाजाचा नमुना



**नवी दिल्ली :** राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) तहव्वूर राणाची चौकशी करीत असून, त्याच्या आवाजाचे नमुने घेऊन ते फॉरेन्सिक लॅबला पाठविणार आहेत. २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणा हल्ल्यादरम्यान फोनवरून सूचना देत होता का, हे एनआयए शोधून काढणार आहे. एनआयएच्या चौकशीदरम्यान एका 'एम्प्लॉई बी' चे नाव समोर आले होते, ज्याने राणाच्या सांगण्यावरून हेडलीला ऑपरेशन्स आणि लॉजिस्टिक्समध्ये मदत केली होती. आता एनआयए राणा आणि 'एम्प्लॉई बी' यांना समोरासमोर बसवून चौकशी करणार आहे. एजन्सीच्या मते, 'एम्प्लॉई बी' ला दहशतवादी कटाची माहिती नव्हती. तो राणाच्या सूचनेनुसार हेडलीसाठी स्वागत, वाहतूक, निवास आणि कार्यालयाची व्यवस्था करत असे. डेव्हिड हेडली हा मुंबई हल्ल्याचा मास्टरमाइंड होता. १० एप्रिल रोजी तहव्वूरला एका विशेष विमानाने अमेरिकेतून भारतात आणण्यात आले. यानंतर त्याला १८ दिवसांसाठी एनआयए कोठडीत पाठवण्यात आले आहे.

# कल्याण बलात्कारातील आरोपी विशाल गवळीची आत्महत्या

**नवी मुंबई :** कल्याणमध्ये अवघ्या १३ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करीन तिची निर्घृणपणे हत्या करणारा नराधम आरोपी विशाल गवळी याने नवी मुंबईच्या तळोजा मध्यवर्ती कारागृहात आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशाल गवळी याने तळोजा कारागृहात पहाटे चार ते पाच वाजण्याच्या सुमारास शौचालयात जाऊन गळफास लावून घेतल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे तळोजा कारागृहात एकच खळबळ उडाली आहे. विशाल गवळी याच्या आत्महत्येनंतर प्रशासन खडबडून जागे झाले आहे./-...४



### हत्या झाल्याचा वकिलांचा दावा

विशाल गवळी याला बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेप्रमाणे मारण्यात आले. विशाल गवळी याने आत्महत्या केलेली नाही. त्याला तुरुंगात कोणीतरी मारले आहे, असे गवळीचे वकील संजय धनके यांनी म्हटले.

### न्याय झाला : मुलीचे वडील

विशाल गवळीने आत्महत्या केल्याची बातमी समोर आल्यानंतर मृत मुलीच्या वडिलांनी आपल्या लेकीच्या तसबिरीला हार घालत आणि त्याच्यासमोर दिवा लावून पूजन केले. आमच्या दीदीसोबत नराधमाने जे कृत्य केले, त्यासाठी आम्ही कोर्टात लढत होतो. विशाल गवळीने जे काही कृत्य केले होते, त्याची शिक्षा त्याला देवाने दिली. त्याच्यासोबत 'जशास तसा' न्याय झाला, असे पीडितेचे वडील म्हणाले

# फटाक्यांच्या कारखान्यात स्फोटात ८ कामगारांचा मृत्यू



**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील कोटावुरुतला भागात फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट होऊन आठ कामगारांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिलांचाही समावेश आहे. स्फोट इतका भयंकर होता की, त्याचा आवाज अनेक किलोमीटर अंतरापर्यंत ऐकू आला. पोलीस अधीक्षक तुहिन सिन्हा यांनी घटनेला दुजोरा दिला असून, बचावकार्य सुरू असल्याचं सांगितलं.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेनंतर शोक व्यक्त केला आहे. चंद्राबाबू नायडू यांनी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक आणि राज्याच्या गृहमंत्री अनिता यांच्याशी फोनवरून संपर्क करून घटनेचा आढावा घेतला आहे. मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा देण्याचे आणि शोकग्रस्त कुटुंबांना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच घटनेची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# वाढत्या उन्हात टँकर दरवाढीचा चटका!

## पाण्याची मागणी वाढल्याने शुल्कात ५ टक्के वाढ

**पुणे :** एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यभरात उन्हाच्या झळा वाढत चालल्या आहेत. ऐन उन्हाळ्यात अनेक शहरांसह गावांमध्ये पाण्याची कमतरता भासत आहे. त्यामुळे पाण्याच्या टँकरची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मात्र, टँकरची मागणी वाढत असतानाच महापालिकेने टँकरच्या दरामध्ये वाढ केली आहे. त्यामुळे नागरिकांना वाढत्या उन्हात दरवाढीचा चटका बसत असल्याचे दिसत आहे.

पुणे महापालिकेने टँकरच्या दरामध्ये गतवर्षीपेक्षा पाच टक्के वाढ जाहीर केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी तब्बल ८७ हजार ८८८ टँकरच्या फेऱ्या वाढल्या आहेत. मार्च महिन्याचा विचार करता गतवर्षी ३८ हजार २९९ टँकरच्या फेऱ्या झाल्या होत्या. त्यात ९ हजार ५९७ टँकरची भर पडून एका महिन्यात ४७ हजार ८९६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी पुणे महापालिकेकडून खडकवासला धरणासह भामा आसखेड धरणातून पाणी उचलले जाते. ज्या परिसरात कमी पाणीपुरवठा होतो, त्या ठिकाणी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.



# राज्यात पुन्हा अवकाळीची शक्यता

**मुंबई :** महाराष्ट्र उन्हाळ्याच्या शिखरावर पोहोचला असताना आता भारतीय हवामान विभागाने अनेक राज्यांसह महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. अनेक भागात पावसाच्या इशाऱ्यांमुळे उष्ण व दमट हवामान होत असून, उष्णतेचा पारा गेल्या चार दिवसांच्या तुलनेत काहीसा घसरला आहे. आज वादळी वाऱ्यासह मुसळधारा येणार असून, तापमानात नागरिकांना थोडासा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. आता पुन्हा अवकाळीचा इशारा असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन दिवस राज्यात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला. हवामान खात्याने ११ जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट दिला आहे.

## महत्त्वाचे

### भालाफेकपटू डीपी मनूवर ४ वर्षांची बंदी!

**नवी दिल्ली :** भारताचे भालाफेकपटू आणि आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक विजेते डीपी मनूवर नॅशनल अँटी डोपिंग एजन्सीकडून ४ वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. ॲथलेटिक्स इंटिग्रिटी युनिटने नुकतीच याची घोषणा केली. मनूच्या सॅम्पलमध्ये मिथाइल टेस्टोस्टेरोन हा प्रतिबंधित पदार्थ आढळून आल्याने त्याला ३ वर्षांची बंदीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. डोप टेस्ट झाल्यानंतरही मनूने आणखी दोन स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता.

### जळगावमध्ये अवकाळी पाऊस

**जळगाव :** तालुक्यातील पूर्व भागात काल सायंकाळी वादळी पाऊस झाला. खेडीभाकरी, गोरगावले, मंगरूळ, लोणी, पंचक, वटार, सुटकार, गोरगावले, नारद खरद, धानोरा, बिडगाव, मितावली, मोहरद या पूर्व भागातील गावांना वादळी वारा व गारपिटीचा तडाखा बसला. गारपिटीचा फटका केळी बागेतील केळी झाडांची पाने फाटली आहेत. यामुळे केळी पिकाचे नुकसान झाले आहे. शेतात कापणी केलेला मका या पिकांना बसला असून, चाऱ्याचेही नुकसान झाले आहे.

### अग्निवीरांसाठी २५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**नवी दिल्ली :** देशसेवेचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांना इंडियन आर्मी अग्निवीर भरती २०२५ साठी अर्ज करण्याची शेवटची तारीख वाढवण्यात आली आहे. जे उमेदवार यापूर्वी काही कारणास्तव अर्ज करू शकले नव्हते त्यांना आता आणखी एक संधी मिळाली आहे. नवीन तारखेनुसार, इच्छुक उमेदवार आता २५ एप्रिल २०२५ पर्यंत अर्ज करू शकतात. वेबसाइटला भेट देऊन अर्ज ऑनलाइन भरता येईल. यापूर्वी या भरतीसाठी १० एप्रिल २०२५ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली होती.

### बंगळुरुचा राजस्थानवर विजय

**जयपूर :** विराट कोहली आणि फिल सॉल्टच्या जबरदस्त फलंदाजीच्या जोरावर बंगळुरुने राजस्थानला पराभूत केले. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने राजस्थानला ९ विकेटने पराभूत केले. विराट कोहलीने नाबाद ६२ धावा केल्या. फिल सॉल्टने ६५ धावा तर देवदत्त पडिक्कलने ४० धावा केल्या. राजस्थानच्या गोलंदाजांना आरसीबीला रोखण्यात अपयश आले. फलंदाजांच्या दमदार कामगिरीच्या जोरावर आरसीबीने विजय मिळवत गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर झेप घेतली. आरसीबीने सहापैकी ४ सामन्यात विजय मिळवत ८ गुणांसह तिसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. दुसरीकडे राजस्थान रॉयल्स ६ पैकी चार सामन्यात पराभूत झाल्यानं त्यांची ७ व्या स्थानावर घसरण झाली आहे.

### धुळ्यात तापमान चाळिशी पार कायम

**धुळे :** मागील आठवड्यात खानदेशात उष्णतेची लाट पसरलेली होती. धुळ्यासह जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील तापमान चाळीस अंशांच्या वर गेलेला होता. दरम्यान, धुळ्यातील तापमानात दोन दिवसांपासून घट झाली होती. मात्र, पुन्हा एकदा तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार गेल्याने उष्णतेत प्रचंड वाढ झाली आहे. तर जळगाव जिल्ह्यातील तापमान काहीसे खाली आल्याने उष्णतेच्या झळांपासून सुटका झाली आहे.

## महत्त्वाचे



### इगतपुरीत हनुमान प्रतिमेची मिरवणूक

**इगतपुरी :** इगतपुरी शहरातील गुप्ता व्यायामशाळेच्या मंडळाने बैलगाडीत हनुमानाची प्रतिमा ठेवून ढोलताशाच्या गजरात शोभायात्रा काढली होती. शोभायात्रेत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी लेझीम, लाठीकाठी प्रात्यक्षिके सादर केली. हनुमान जयंतीनिमित्त मुंबई-आग्रा महामार्गावरील दक्षिणमुखी हनुमान मंदिर, बजरंगवाडा येथील हनुमान मंदिर, तीन लकडी येथील हनुमान मंदिर, महावितरण कार्यालय येथील हनुमान मंदिर, खालची पेठ येथील हनुमान मंदिर, राठी पेट्रोलपंप येथील प्राचीन हनुमान मंदिर आदी मंदिरांत पहाटेपासूनच अभिषेक, शेंदूर लेपण, हनुमान चालिसा, मारुती स्तोत्र पठण, महाआरती करण्यात आली. तसेच प्रत्येक मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

### कोऱ्हाटे विद्यालयात फुले जयंती



**दिंडोरी :** कोऱ्हाटे येथील जनता विद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका रंजना घंगाळे यांनी प्रतिमापूजन केले. याप्रसंगी कुमारी समीक्षा कदम, अनुष्का कदम, शुभांगी कदम, तनुजा बोंबले, चंचल साठे, राम शिंदे, प्रज्वल कदम आदी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. ज्येष्ठ शिक्षक आबासाहेब शिंदे, नरेंद्र साळुंके, रत्ना जाधव, रूपाली जाधव आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विद्या कदम यांनी केले.

### डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम

**येवला:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज (दि.१४) येवला शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन डॉ. आंबेडकरनगर येथील सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे करण्यात आले असल्याची माहिती जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आकाश भालेराव यांनी दिली. तसेच मुलांच्या रेकॉर्ड डान्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सोमवारी (दि. १४) सकाळी ९ वाजता ध्वजारोहण तर सायंकाळी ६ वाजता भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. स्वाभिमानी जयंती उत्सव समितीतर्फे रविवार सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह शेजारील सभागृहात कविसंमेलन होणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन विजय घोडेराव, महेंद्र पगारे यांनी केले आहे.

### काळू पवार संस्थेची शंभर टक्के वसुली

**देवळा :** तालुक्यातील भऊर येथील काळू आनंदा पवार आदिवासी



विविध कार्यकारी सहकारी संस्थेने नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून २०२४-२५ या हंगामासाठी सात सभासदांना पीककर्ज वितरण केले होते. त्या सातही सभासदांनी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करून व शून्य टक्के व्याजदर सवलतीचा फायदा घेतला. त्यामुळे जिल्हा बँकेकडून घेतलेल्या कर्जाची संस्थेला संपूर्ण परतफेड केली. वसुलीसाठी संस्थेचे संस्थापक चेअरमन जगदीश पवार, व्हा. चेअरमन पोपट पवार व संचालक मंडळ यांनी प्रयत्न केले. संस्थेचे सचिव दत्तात्रेय पगार यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेने बँक स्थरावर संस्था १०० टक्के वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करत उत्कृष्ट कामकाज केल्याचा बहुमान पटकावला.

### पिंपळगाव बाजार समितीत स्वच्छता मोहीम



**पिंपळगाव बसवंत :** राज्यातील सर्व बाजार समित्यांचे आवार स्वच्छ करण्याची मोहीम पुढील १०० दिवस राबविण्याचे पणन विभागाने निश्चित केले आहे. त्यानुसार पिंपळगाव बसवंत बाजार समितीत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. बाजार समितीचे सभापती, आमदार दिलीप बनकर, उपसभापती ज्ञानेश्वर शिरसाट, संचालक जगन्नाथ कुटे, शिरीष गडाख, सोहनलाल भंडारी, शंकरलाल ठक्कर, नारायण पोटे, महेंद्र गांगुर्डे, दीपक बोरस्ते, रामभाऊ माळोदे यांसह बाजार समितीचे सचिव व सर्व कर्मचारी तसेच हमाल-मापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बाजार आवारात येथून पुढे असे नियमितपणे स्वच्छता अभियान राबविण्याचा मानस आमदार दिलीप बनकर व संचालक मंडळाने व्यक्त केला व तशा सूचना बाजार समिती प्रशासनास दिल्या.

### खंडोबाला शंभर किलोची द्राक्ष आरास

**ओझर :** महाराष्ट्राचे कुलदैवत श्री तीर्थक्षेत्र जेजुरी गडावर चैत्र



पौर्णिमा यात्रेनिमित्त द्राक्ष पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील वणी पाचोरे येथील प्रति जेजुरी मंदिरातील वाघे मंडळी व सेवेकरी यांनी जेजुरी येथील विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांच्या सहकार्याने व गुरुवर्य योगेश महाराज गवारे यांच्या आशीर्वादाने जेजुरी येथील मंदिरामध्ये मुख्य गाभाऱ्यातील देवांना १०१ किलो द्राक्षाचे हार व देवाचा गाभारा द्राक्षांनी सजवण्यात आला. यावेळी जेजुरी येथील विश्वस्त डॉ.राजेंद्र खेडेकर, जेजुरीचे मुख्य पुजारी, तसेच संपत काका गवळी, संतोष मामा गवारे, अमोल निफाडे, विलास काळे, नीलेश निफाडे, गणेश निफाडे, दत्तू गवांदे, विशाल डेरे आदी सर्व भाविक भक्त उपस्थित होते. या उपक्रमाला ओझर येथील माधवराव बोरस्ते विद्यालयाचे मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# श्री सिद्ध वीर हनुमान मित्रमंडळातर्फे लासलगावसाठी अग्निशमन टँकरचे लोकार्पण



लासलगाव : श्री सिद्ध वीर हनुमान मित्रमंडळ यांच्या वतीने लासलगावसाठी अग्निशमन टँकरच्या लोकार्पणप्रसंगी उपस्थित सपोनि भास्करराव शिंदे व मान्यवर. (छाया : समीर पठाण)

**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव शहरात मध्यंतरी आगीमुळे व्यापारीवर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. आग लागल्यानंतर ती विझविण्यासाठी इतर जवळच्या मोठ्या शहरातून अग्निशमन गाड्या बोलवाव्या लागतात. तोपर्यंत बराच उशीर होतो. याला पर्याय म्हणून शहरातील श्री सिद्ध वीर हनुमान मित्रमंडळ यांच्या वतीने पाण्याच्या टँकरपासून अग्निशमन वाहन तयार करून त्याचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले आहे.

लासलगाव येथील कांद्याचे प्रतिष्ठित व्यापारी स्व. हरिभाऊ राणा व त्यांचे चिरंजीव स्व. विशाल हरिभाऊ राणा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ लासलगाव शहरासाठी अग्निशमन पाण्याच्या टँकरची निर्मिती श्री सिद्ध वीर हनुमान मित्रमंडळाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.श्री हनुमान जन्मोत्सवाच्या पावननिमित्ताने परमपूज्य भगरीबाबा मंदिर येथे अग्निशमन टँकरचे लोकार्पण सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

मागील अनेक वर्षांपासून लासलगावकरांनी मागणी करूनही अद्याप शहरासाठी अग्निशमन वाहन मिळाले नाही. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या निधीतून लासलगाव शहरासाठी अग्निशमनचे वाहन मंजूर झाले आहे, मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे ते अद्याप मिळालेले नाही. याबाबत प्रशासनाची देखील उदासीनता दिसून येत आहे. लासलगाव शहरात यापूर्वी आगीच्या दुर्घटनांमुळे अनेक नागरिकांना व व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. या परिस्थितीची दखल घेत श्री सिद्ध वीर हनुमान मित्रमंडळ यांच्या माध्यमातून शहरासाठी अग्निशमन टँकरचे लोकार्पण करण्यात आले आहे.

> लासलगाव शहरात यापूर्वी आगीच्या दुर्घटनांमुळे अनेक नागरिकांना व व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. श्री सिद्ध वीर हनुमान मित्रमंडळ यांच्या माध्यमातून अग्निशमन टँकरच्या उपलब्धतेमुळे भविष्यातील घडणाऱ्या आपत्तींच्या वेळी तातडीने मदत मिळण्यास मदत होणार आहे. या मित्रमंडळाचा सदर उपक्रम अत्यंत प्रेरणादायी आहे.
> – **भास्करराव शिंदे,** सपोन, लासलगाव पोलीस ठाणे



नांदगाव : कामगारांना गृहोपयोगी वस्तूंचा संच देताना समाजसेविका अंजुमताई कांदे यांच्यासह शिवसेनेच्या महिला पदाधिकारी. (छाया : महेंद्र पगार )

## नांदगाव येथे नोंदणीकृत कामगारांना भांडीवाटप

**नांदगाव : प्रतिनिधी**

नांदगाव विधानसभा मतदारसंघातील बांधकाम कामगारांना कामगारांसाठी सुविधा केंद्र सुरू करण्यात आले असून, या सुविधा केंद्राच्या माध्यमातून नोंदणीकृत कामगारांना नांदगावचे आमदार सुहास कांदे तसेच समाजसेविका अंजुमताई कांदे यांच्या हस्ते भांड्यांच्या सेटचे वाटप करण्यात आले.

आमदार सुहास कांदे यांच्या मागणीनंतर कामगार विभागाने तालुकानिहाय हे केंद्र सुरू केल्याने कामगारांची होणारी गैरसोय दूर झाली आहे. याआधी नाशिक तसेच मालेगाव येथील बांधकाम नोंदणी सुविधा केंद्रात मोठी गर्दी होत होती. जिल्ह्यातील एकाच ठिकाणी भांडे वाटपासाठी दिवस दिवस थांबावे लागत असल्याने अडचणीचा सामना करावा लागत होता. मात्र, आता तालुकानिहाय भांडीवाटप केंद्र सुरू झाल्याने मजुरांची होणारी गैरसोय थांबण्यास मदत होणार आहे.

नांदगाव सेतू कार्यालयात पंधरा दिवसांत एक हजारापेक्षा अधिक बांधकाम कामगारांनी नूतनीकरण केले असून तसेच नवीन नोंदणी झालेल्या प्रत्येक कामगाराला सेफ्टी किट व नूतनीकरण झालेल्या कामगार कुटुंबांना गृहोपयोगी साहित्याचे वाटप यावेळी करण्यात आले.

यावेळी समाजसेविका अंजुमताई कांदे, युवासेनेचे तालुकाध्यक्ष सागर हिरे, प्रकाश शिंदे, सुनील जाधव, प्रशांत पगार, सेतू केंद्रचालक रवींद्र खैरनार, सोनू रौंदळ, देव गोसावी, दिनेश बच्छाव, हेमंत शेवाळे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

## देमको बँकेस दोन कोटी चाळीस लाखांचा नफा

### न्यूबा अवॉर्डसह ब्ल्यू रिबन अवॉर्डने सन्मानित

**देवळा : प्रतिनिधी**

देवळा शहराची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवळा मर्चंट बँकेस या आर्थिक वर्षात दोन कोटी ४० लाख ३९ हजार रुपये ढोबळ नफा झाल्याची माहिती चेअरमन कोमल कोठावदे यांनी दिली. नेट एनपीए शून्य टक्के राखण्यास बँकेस यश मिळत असून, भविष्यात बँकेला प्रगतीपथावर नेण्यासाठी व सभासदांना लाभांश देण्यासाठी बँक कटिबद्ध असल्याचे व्हा. चेअरमन डॉ. प्रशांत निकम यांनी सांगितले.

१९ जानेवारी १९६१ रोजी स्थापन झालेल्या या नागरी सहकारी बँकेचे भागभांडवल मार्चअखेर तीन कोटी ९६ लाख ९९ हजार रुपये असून, अ वर्ग सभासद ६८६२ आहेत. एकूण ठेवी १०५ कोटी ५५ लाख ६४ हजार असून, मागील वर्षीच्या तुलनेत १३ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. ७४ कोटी ३३ लाखांचे कर्ज वाटप केले आहे. बँकेने ५५ कोटी ४४ लाखांची सुरक्षित गुंतवणूक केली आहे. बँकेचा सीआर एआर ३१.०१ टक्के इतका असून, बँकेचा सीडी रेशो ७०.४२ टक्के आहे. कोमल कोठावदे पुढे म्हणाल्या की, सभासदांच्या कर्जाच्या रकमेचा विमा उतरविण्यात येणार आहे.

थकबाकी वसुली मोहिमेंतर्गत थकबाकीदारांच्या मिळकतीवर टाच आणली जात असल्याने वसुलीला यश मिळत आहे. बँकेने क्यूआर कोड सुविधा सुरू केली आहे. या आर्थिक वर्षात प्रत्येक सभासदास आकर्षक खुर्ची भेट देण्यात आली असून, बँक डिजिटल करणे, शाखा विस्तार करणे, इमारत नूतनीकरण करणे, बँकेचे प्रशासकीय कार्यालय कार्पोरेट करणे आदी कामांवर भर दिला जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी बँकेचे जनसंपर्क संचालक योगेश वाघमारे, संचालक राजेंद्र सूर्यवंशी, हेमंत अहिरराव, अनिल धामणे, केदारनाथ मेतकर, भगवान बागड, प्रमोद शेवाळकर, योगेश राणे, मयूर मेतकर, अमोल सोनवणे, सुभाष चंदन, मनीषा शिनकर, नलिनी मेतकर, तज्ज्ञ संचालक भारत कोठावदे, चैतन्य वडनेरे, प्रशांत मुसळे, तक्रार निवारण समितीचे कौतिक पवार, मंगलचंद जैन, अतुल आहेर, राजेंद्र ब्राह्मणकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील भालेराव, व्यवस्थापक नितीन बोरसे व कर्मचारी उपस्थित होते. बँकेच्या प्रगतीची दखल घेत लखनऊ येथे देमको बँकेस न्यूबा अवॉर्ड देत प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले तर लोणावळा येथे बँको ब्ल्यू रिबन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.



निफाड : तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी निंबा बोरसे तर व्हा. चेअरमनपदी कल्पना गोसावी यांची बिनविरोध निवड झाल्याप्रसंगी उपस्थित संचालक मंडळ व पदाधिकारी.

## निफाड तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी बोरसे

### व्हा. चेअरमनपदी कल्पना गोसावी बिनविरोध

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

निफाड तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी निंबा बोरसे तर व्हा. चेअरमनपदी कल्पना गोसावी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एस. के. मुरडनर यांनी काम पाहिले.

दोन वर्षांपूर्वी झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत आवर्तन पद्धतीने चेअरमन विजय कुशारे व व्हा. चेअरमन उज्ज्वला सोनवणे यांनी राजीनामा दिल्याने निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी चेअरमनपदासाठी एकमेव निंबा बोरसे व व्हा. चेअरमनपदासाठी कल्पना गोसावी यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध घोषित करण्यात आली.

यावेळी संचालक विजय कुशारे, मानस सचिव अमोल साळवे, भास्कर खेलूकर, संजय गुजर, सुरेश धारराव, गोरख देवडे, रामदास चोभे, उज्ज्वला सोनवणे, अविनाश बागडे, संजय गवळी, प्रदीप कुठे, तज्ज्ञ संचालक अर्जुन ताकाटे, प्राथमिक शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष माणिक कुशारे, सरचिटणीस शशिकांत बोरसे, तालुका नेते संतोष गांगुर्डे, दत्ता कांदळकर, संतोष मेमाने, विजय डेरले, बाजीराव कमानकर, प्रकाश शिरसाट, राजेश सांगळे, महेश खोसे, सोमनाथ मापारी, भाऊसाहेब पगारे, महेश खोसे, अरुण सोनवणे, विश्वास भवर, अमोल झोले, आनंद राजगुरू, वाल्मीक खापरे यासह जगन्नाथ कर्डिले, संदीप निकम सभासद उपस्थित होते.

## रेल्वेस्थानक हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव

**लासलगाव : वार्ताहर**

टाकळी (विंचूर) रेल्वेस्थानक परिसरात असलेल्या पुरातन श्री हनुमान मंदिरामध्ये श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त हनुमान चालीसा पठण तसेच गंगाजल कावड मिरवणूक काढण्यात आली होती. यानंतर येथील सामाजिक कार्यकर्ते केशवराव जाधव व त्यांच्या धर्मपत्नी यांच्या हस्ते रुद्राभिषेक करण्यात आला.

सायंकाळी संगीतमय प्रवचन संपन्न झाले. प्रवचनानंतर महाप्रसादाने जन्मोत्सव कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी टाकळी ग्रामपंचायत सदस्य राम बोराडे, सुभाष बोराडे, शुभम बोराडे, माधव



कुंभार्डे, भगवान बोराडे, बंडूमामा, राजाभाऊ जाधव, योगेश बोराडे, सजनभाई अग्रवाल, बाबा राजोळे, अजित धाडीवाल, नाना कवार, प्रकाश शर्मा, राजाराम बोराडे, यशवंत बोराडे, योगेश बोराडे,, शंकर कदम, आकाश कदम, पंकज बोराडे, गौरव गावडे, ऋषिकेश बकरे, गणेश जोशी, सचिन लचके, सुनील डचके, ऋषिकेश जोशी, नंदू जाधव, सचिन डुंबरे, नंदू डुंबरे, माधव रायजादे आदींसह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यस्तरीय ग्रीटिंग कार्ड स्पर्धेत जानोरी शाळेचे यश

**दिंडोरी : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जानोरीने आधार सोशल ट्रस्ट धायरी पुणेतर्फे आयोजित मायेचा एक घास सैनिकांसाठी या देशभक्तीपर राज्यस्तरीय ग्रीटिंग कार्ड स्पर्धेत यश संपादन केले.

या स्पर्धेसाठी राज्यभरातून तब्बल सोळा हजार ग्रीटिंग कार्ड आले होते. त्यात जानोरी शाळेतून इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांकडून सौ. मनीषा गायकवाड यांनी भेटकार्ड बनवून घेतले व स्वतःचे बनवलेले भेटकार्ड सैनिकांना पाठवून सहभाग नोंदवला. या ग्रीटिंग कार्डांचे पुण्यात प्रदर्शन आयोजित केले. त्यातून क्रमांक काढण्यात आले. विजेत्या स्पर्धकांचे नाव घोषित करण्यात आले. शाळेतून देशभक्ती रुजवण्यासाठी यशस्वी सहभाग नोंदवल्याबद्दल शाळेचा व शिक्षिका मनीषा गायकवाड यांचा पुण्यात बक्षीस समारंभात सत्कार करण्यात आला.

प्रसिद्ध बालसाहित्यिक व अखिल भारतीय बालकुमार राजीव तांबे, प्रसिद्ध कलाकार सिद्धेश्वर झाडबुके, बीएसएफचे कमांडर ऑफिसर हिम्मत सिंग रेगे, स्पर्धा प्रमुख सोपान बंदावणे, चाकणकर सर यांच्या उपस्थितीत निळू फुले पुणे सभागृहात मोठ्या दिमाखात कार्यक्रम झाला.

शाळेच्या प्रतिनिधी म्हणून शाळेत स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या शिक्षिका मनीषा गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला. तसेच या स्पर्धेत क्रमांक मिळाल्याबद्दलही सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

सहभागी शाळेतील ३० विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र दिंडोरी पंचायत समितीच्या शिक्षण विस्तार अधिकारी सुनीता अहिरे, कैलास पगार तसेच केंद्रप्रमुख विजय निकम, संदीप गुंजाळ यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक चंद्रकांत पवार व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

## इगतपुरी शासकीय कार्यालयांमध्ये हिरकणी कक्षच नाही

### स्तनदा मातांची होतेय गैरसोय

**इगतपुरी : प्रतिनिधी**

इगतपुरी शहरातील तहसील कार्यालय, पंचायत समिती, वनविभाग, बसस्थानकासह अनेक कार्यालयांत विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांसह महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. अनेक महिला नवजात बालकांना सोबत घेऊन येतात. मात्र, बालकांना स्तनपान करण्यासाठी हिरकणी कक्षच नसल्याने महिलांची कुचंबणा होत आहे.

कोणत्याही शासकीय कार्यालयात हिरकणी कक्ष सुरू करण्याची तसदी एसटी आगार व्यवस्थापकासह तहसीलदार, पंचायत समिती प्रशासनाने घेतली नसल्याने बालकांना स्तनपान करणाऱ्या महिलांची गैरसोय होत असून, याकडे लोकप्रतिनिधींबरोबरच प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. आदिवासी तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इगतपुरी शहरात तहसील कार्यालय, पंचायत समिती बसस्थानक, नगर परिषद येथे तालुक्याच्या विविध भागातून नागरिकांसह महिलाही मोठ्या प्रमाणात विविध शासकीय -निमशासकीय कामासाठी येत असतात. अशा महिलांना विविध ठिकाणी बाळाला दूध पाजताना महिलांची गैरसोय होऊ नये तसेच गर्भवती, नवजात बालकांच्या माता व सहा वर्षांखालील मुले व त्यांच्या मातांसाठी हिरकणी कक्ष उभारणे शासनाने १० मे २०१३ पासून बंधनकारक केले आहे.

या पार्श्वभूमीवर स्तनदा मातांची गैरसोय होऊ नये, म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने २०१३ पासून राज्यभरातील बसस्थानकांत हिरकणी कक्ष स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू केली. त्यानंतर राज्यातील सर्वच बसस्थानकांत हिरकणी कक्ष उभे करण्यात आले.

शहरातील नगर परिषद, पंचायत समिती, पोलिस स्टेशन, तहसील कार्यालय, विविध कार्यालयांत हिरकणी कक्ष नसल्याने बाळाला दूध पाजताना महिलांची गैरसोय होताना दिसत आहे. अनेक आदिवासी महिला शासकीय दाखले, उत्पन्नाचे दाखले घेण्यासाठी तसेच बँकेमधून पैसे काढण्यासाठी येत असतात, मात्र बाळाला स्तनपान करण्यासाठी आडोसा किंवा कोपरा पाहून स्तनपान करत असल्याचे चित्र दिसत आहे.

> ग्रामीण भागातील महिला कामानिमित्त मोठ्या संख्येने तालुक्याचे ठिकाण असलेल्या इगतपुरीत येतात. यात स्तनदा मातांचादेखील समावेश असतो. स्तनदा मातांना आपल्या तान्हुल्यांना स्तनपान करता यावे, यासाठी विविध कार्यालयांत हिरकणी कक्ष उभारला जातो, परंतु त्यांना त्याचा लाभ घेता येत नाही. एखाद्या मातेला वाटले तरी ती येथे तान्हुल्याला दूध पाजू शकत नाही. महिलांना हिरकणी कक्षाची माहिती व्हावी. तसेच याची जनजागृती करणे गरजेचे आहे.
> – **संजय खातळे,** युवानेते

## वणी येथे हनुमान जन्मोत्सव



**वणी : प्रतिनिधी**

'अंजनीच्या सुता तुला रामाचे वरदान, एकमुखाने बोला जय जय हनुमान' असा जयघोष करीत महाबली हनुमान जन्मोत्सव वणी व परिसरात मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला.

भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या वणी येथील देवी चौकातील पौराणिक असलेल्या हनुमान मंदिरात आकर्षक सजावट व विद्युत रोषणाईने मंदिराची सजावट करण्यात आली होती. जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन जय श्री हनुमान सेवा समितीतर्फे करण्यात आले होते. १२ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता महारुद्र अभिषेक पूजा, सकाळी ९ वाजता श्री सत्यनारायण पूजा, आरती व सकाळी अकरापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

हजारो भाविकांनी दर्शनाचा व जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला. जयंतीनिमित्त ठेवलेल्या महाप्रसादात तब्बल ११०० किलो आंब्यांचा रस व पुरणपोळ्या ठेवण्यात आल्या होत्या. त्यात वणीसह पंचक्रोशीतील ४ हजारपेक्षा जास्त भाविकांनी लाभ घेतला.

## महत्त्वाचे



## बुद्ध-शिव-शाहू-फुले-आंबेडकर सामान्यज्ञान आकलन परीक्षा

**सिडको :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्रिशरण यंग फ्रेंड कला, क्रीडा सामाजिक विकास संस्था प्रणित डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्या वतीने शिव-बुद्ध -शाहू -फुले -आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित सामान्यज्ञान आकलन परीक्षा-२०२५ संस्थेचे अध्यक्ष विनोद भडांगे, सचिव दीपक पवार, खजिनदार बाबासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिशरण बुद्धविहार प्रांगणात परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेला लहान गट म्हणजेच विद्यार्थी गटात ६६ व खुला गटातील ५७ जणांनी परीक्षेत भाग घेतला. सदरची परीक्षा अतिशय शिस्तबद्ध वातावरणामध्ये संपन्न झाली सदर परीक्षाचे डॉ. अनिल आठवले, एम. डी.प्रताप, बी.जी. बनकर, प्रभाकर तायडे, कल्पना नेरकर, पुष्पा कांबळे यांनी कामकाज पहिले.परीक्षा यशस्वी करण्यासाठी खंडु आहिरे, एस.वाय. खरे, हिरामण साळवे, अनंत हजारे, चंद्रकला तायडे, मिलिंद कळवणकर, पद्माकर सरोदे, मंदा साळवे मीनाक्षी कळवणकर एडवोकेट सुजाता चौदंते, शोभाताई केदारे, संभाजी साळवे आदींनी परिश्रम घेतले.

## आदित्य चौधरी राष्ट्रीयस्तरावर दुसरा



**जुने नाशिक : वार्ताहर** पीएमश्री केंद्रीय विद्यालयातील (नाशिकरोड कॅम्प) दहावीचा विद्यार्थी आदित्य चौधरी याने ७ व ८ एप्रिल रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या केव्हीएस राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात (आरएसबीव्हीपी) दुसरे स्थान पटकावले आहे. त्याने अ रेव्होल्यूशनरी लीप टू फ्युचरिस्टिक फ्युएल ऑक्सीहायड्रोजन नावाचे एक नावीन्यपूर्ण मॉडेल तयार केले आहे. दरम्यान केंद्रीय विद्यालय संघटन आयुक्त निधी पांडे यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे त्याचा व मार्गदर्शक शिक्षिका उज्ज्वला चांदोरकर यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच प्रभारी प्राचार्य गजराज मीना यांनी शाळेतर्फे देखील आदित्य आणि उज्ज्वला चांदोरकर यांचा सत्कार केला. तसेच आदित्यच्या वैज्ञानिक नवोन्मेष आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले. यावेळी विनोद चौधरी, ग्रंथपाल रोहित गौड, अमीतकुमार शुक्ला, वीणा गौडर आदींसह शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## महान भारत कार्यक्रमाचे आज आयोजन




**नाशिक :** विविध जाती, धर्म, पंथ यांना सामावून घेणाऱ्या भारत देशाची महानता उलगडून दाखवणाऱ्या 'महान भारत' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन आयाम नाशिक संस्थेतर्फे करण्यात आले आहे. हा कार्यक्रम आज १४ रोजी सायंकाळी ६.१५ ते ८.३० या वेळेत गुरुदक्षिणा सभागृह, कॉलेज रोड, नाशिक येथे होणार आहे. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ डव्होकेट आणि घटनातज्ज्ञ अश्विनी उपाध्याय यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नावनोंदणी अनिवार्य असून, इच्छुकांनी आपली जागा त्वरित निश्चित करावी, असे आवाहन आयाम नाशिकचे अध्यक्ष डॉ. भरत केळकर यांनी केले आहे.

## रसूलबाग कब्रस्तानात पक्ष्यांसाठी पाणी

**जुने नाशिक :** सध्या शहर परिसरासह संपूर्ण जिल्ह्यात अतिशय कडक उन्हाळा जाणवत असून, पाण्याअभावी पक्ष्यांचे हाल होऊ नयेत व त्यांना दाणापाणी वेळेवर उपलब्ध व्हावेत, यासाठी येथील जीपीओ रोडवरील ऐतिहासिक व प्राचीन रसूल बाग कब्रस्तान परिसरातील अनेक झाडावर विशिष्ट प्रकारची घरटी बसविण्याचे काम परिसरातील शुक्रुल्ला शाह बाबा कमिटीकडून करण्यात येत आहे, अशी माहिती कमिटीचे विश्वस्त असलम खान यांनी दिली आहे. दरम्यान या कामासाठी कमिटीचे पदाधिकारी राजा शेख, यकीन शेख, गाजी शेख, अरकान शेख, हसनैन शेख, असलम बाबा, मिजान पानसरे आदी परिश्रम घेत आहेत. दरम्यान हा कब्रस्तान खूप जुना असून, येथे अनेक जुनाट वृक्षे अजूनही उभी आहेत. हा कब्रस्तान काही एकरात पसरलेला असून, येथे मोठ्याप्रमाणात पक्ष्यांचा नेहमीच वावर असतो. रात्रीत देखील अनेक पक्षी येथे वास्तव्यास राहतात, अशी माहिती परिसरातील नागरिकांनी दिली आहे. दरम्यान या प्रकारची व्यवस्था इतर ठिकाणीही करण्यात यावी, जेणेकरून चिमुकली पक्ष्यांची सोय होईल, असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते असलम बशीर खान यांनी केले आहे.



## नैताळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी खरे

**निफाड :** नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सवाच्या निमित्ताने कार्यकर्त्यांनी बैठक झाली असून, बैठकित अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली १४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.३० ते १०.३० वाजेपर्यंत जयंती उत्सवानिमित्ताने पूजन व अभिवादन, भाषणे होतील व संध्याकाळी ६.३० ते १०.३० मिरवणूक होईल, अशी माहिती उत्सव समीतीच्या वतीने देण्यात आली आहे. नैताळे, ता.निफाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव समिती पुढीलप्रमाणे अध्यक्ष - सतीश खरे ,उपाध्यक्ष- नितीन पवार ,खजिनदार - जोगेंद्र पाठक ,सल्लागार -किरण खरे,शांताराम खरे ,सदस्य -सागर खरे,मानव पाठक ,अक्षय खरे ,तुषार पाठक,आदिनाथ जगताप ,विवेक खरे,करण जगताप ,प्रथमेश खरे,यश खरे,वैभव खरे,आयुष पाठक, सागर आहेर, अनिल कापसे ,हरिष खरे,रोहित पाठक ,आकाश खरे,आधारस्तंभ- कैलास खरे,प्रकाश पाठक,उत्तम खरे, सचिन खरे.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त दोन दिवस टूर सर्किट

## चैत्यभूमी, दीक्षाभूमी, मुक्तिभूमी यांसारख्या ठिकाणांचा समावेश



**मुंबई :** शासनाच्या पर्यटन संचालनालयामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून, त्यांच्या महान कार्याचे आणि जीवनाचे महत्त्व समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मुंबई, नाशिक आणि नागपूर येथे दि.१४ व १५ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किट सहलीचे आयोजन करण्यात येत आहे. टूर सर्किट अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित महत्त्वाच्या स्थळांचा समावेश असून, या सहली नागरिक, पर्यटकांसाठी विनाशुल्क आयोजित करण्यात येत आहेत, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. टूर सर्किटमध्ये मुंबईतील दादरमधील चैत्यभूमी, राजगृह, प्रिंटिंग प्रेस, परळ येथील बी. आय.टी. चाळ, वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, फोर्ट येथील सिद्धार्थ महाविद्यालय या स्थळांचा समावेश आहे. तर नाशिकमधील येवले मुक्तिभूमी, त्रिरश्मी लेणी आणि काळाराम मंदिर या स्थळांचा समावेश आहे. तर नागपूर येथील दीक्षाभूमी, डॉ. आंबेडकर संग्रहालय, कामठी येथील ड्रॅगन पॅलेस आणि नागलोक .विहार या स्थळांचा डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणादायी जीवनाचा आणि त्यांच्या सामाजिक समता, शिक्षण आणि संविधान निर्मितीतील योगदानाचे महत्त्व सर्व सामान्य नागरिक व पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा हा शासनाचा प्रयत्न आहे. सर्व नागरिक/ पर्यटकांना या सहलीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### अभिनव उपक्रम

प्रधान सचिव अतुल पाटणे म्हणाले की,डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पर्यटन संचालनालयाने आयोजित टूर सर्किट हा एक अभिनव उपक्रम आहे. बाबासाहेबांचे विचार, त्यांचे सामाजिक योगदान आणि भारतीय संविधान निर्मितीतील त्यांचे कर्तृत्व यांचा गौरव करणे हा या सर्किटचा उद्देश आहे. या सर्किटद्वारे पर्यटकांना बाबासाहेबांच्या जीवनाशी निगडीत महत्त्वाच्या स्थळांचा अनुभव घेता येईल, ज्यामुळे त्यांचा इतिहास आणि तत्त्वज्ञान समजण्यास मदत होईल. चैत्यभूमी, दीक्षाभूमी यांसारखी स्थळे केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची प्रेरणास्थाने आहेत. हा उपक्रम पर्यटनाला प्रोत्साहन देतानाच स्थानिक समुदायांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करेल. डॉ. बाबासाहेबांचा समतेचा संदेश सर्वदूर पोहोचवण्यासाठी हा प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरेल. पर्यटन संचालनालयाने यासाठी सखोल नियोजन केले असून, पर्यटकांना सर्वोत्तम अनुभव देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**– प्रधान सचिव अतुल पाटणे**

### सहलीसाठी संपर्क

| | |
|---|---|
| मुंबई | ९९६९९७६९६६, |
| नाशिक | ९६०७५२७७६३/ ९६५७०२१४५६ |
| नागपूर | ९७६४४८१९१३/ ७२१८७८३५१५ |

### टूर सर्किटची वैशिष्ट्ये

सुविधा : प्रत्येक शहरात दररोज दोन बसेसद्वारे सहल, टूर गाइड, अल्पोपाहार, प्रथमोपचार, पिण्याचे पाणी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित माहिती पुस्तिकेचे वितरण.

## शाळेच्या ताब्यासाठी संस्थेमधील दोन गटांमध्ये तुफान हाणामारी

**शहापूर : प्रतिनिधी**

कल्याण पूर्वेतील वालधुनी परिसरात असलेल्या शांती हिंदी विद्यालयाच्या ताब्यासाठी दोन संस्थेमधील दोन गटांचा वादातून राडा उफाळून आला. मैदानातच व्यवस्थापकावर लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करण्यात आली. शाळेवर ताबा मिळवण्यासाठी शाळेच्या मैदानावर दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाली. दांडक्याने व्यवस्थापकाला मारहाण करण्यात आली. शिक्षणाचे मंदिर असलेल्या शाळेच्या प्रांगणात गोंधळ, शिवीगाळ, मारहाण, कपडे फाडणे व दगडफेक असे प्रकार घडले आहे. कल्याण पूर्वेतील वालधुनी परिसरातील शांती हिंदी विद्यालयातील ही घटना आहे. या प्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्यात दोन्ही गटावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण पूर्वेतील वालधुनी परिसरात असलेल्या शांती हिंदी विद्यालयाच्या ताब्यासाठी दोन संस्थेमधील दोन गटाचा वादातून राडा उफाळून आला. शाळेच्या मैदानातच व्यवस्थापकावर लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करण्यात आली. कल्याण पूर्वेतील वालधुनी परिसरात असलेल्या शांती हिंदी विद्यालयाचे संस्थेचे स्वयंसेवक व केअरटेकर म्हणून काम करत असलेल्या विवेक श्रीकांत पांडे काम करत होते.

या वेळी शाळेचे आधीच्या संस्थेत असलेले विनोद पांडे, गगन जैस्वार, नीतू पांडे, श्वेता पांडे, सुष्मा पांडे आपल्या इतर साथीदारा शाळेच्या ग्राउंडमध्ये आलसे. त्यांनी विवेक पांडे यांना लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. इतकेच नाही तर त्याच्या तोंडावर काळे लावून एका खोलीत डांबून ठेवले. या जीवघेणा हल्लात ते गंभीर जखमी झाले आहे.शाळेच्या मुख्याध्यापिका सुमित्रा तिवारी यांनीही पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली त्यांच्या जबाबानुसार विवेक पांडे व इतरांनी त्यांच्यावरही हल्ला केला. त्यांचे कपडे फाडून लज्जास्पद कृत्य केले आणि ७ हजार रुपये बळजबरीने काढून घेतले. त्यांच्यासह अनेक महिलांनी शाळेच्या आवारात शिवीगाळ, आरडाओरडा केला. दगडफेक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तर याप्रकरणी महात्मा फुले पोलिसांनी दोन्ही संस्थेच्या १५ ते २० जणांना त्याचा प्रयत्न जबरी चोरीसह अनेक कलमांतर्गत गुन्हा दाखल केला.

## बांधकाम साइटवरील रंगांचे बकेट चोरी

**पंचवटी : वार्ताहर**

पेठरोडवरील शरदचंद्र मार्केट येथील यार्डाच्या संकुल क्रमांक ४ येथे उघड्यावर असलेले रंगांचे बॅकेट चोरी झाली असून, याबाबत पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दि.११ रोजी सायंकाळी ६ ते दि.१३ रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास शरदचंद्र मार्केट पेठरोड येथील यार्डाच्या संकुल क्रमांक ४ मधील सुमारे १ लाख ११ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल ९८ हजार रुपये किमतीचा एशियन अॅपेक्स सुप्रिम रंगाची बकेट २० लिटरचे २० बकेट, १३ हजार ५०० रुपये किमतीचे व्हाइट प्रायमर तीन बकेट असे चोरुन नेले. याबाबत गणेश बाळकृष्ण पगार, २७, रा. पाटील प्रेस्टिज, संभाजी चौक, उंटवाडी यांनी पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार गांगुर्डे करीत आहेत.

## एकीकडे नागरिकांची वणवण, दुसरीकडे गळती

### सिडकोतील पाणीपुरवठ्याची तऱ्हाच न्यारी!

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सिडको, इंदिरानगर, पाथर्डी फाटा परिसरात नागरिकांना दररोज पाण्यासाठी भटकंती करावी लागत असताना, दुसरीकडे मात्र मनपाच्याच भोंगळ कारभारामुळे लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे चित्र दिसत आहे.

याबाबत स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाकडे तक्रार करून देखील नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत नसल्याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सिडकोसह पाथर्डी फाटा तसेच इंदिरानगर परिसरातील पाणी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. काही ठिकाणी अतिशय कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. काही ठिकाणी पाणीपुरवठा होत नसल्यामुळे बहुतांश सोसायटीत राहणाऱ्या रहिवाशांना दोन दिवसाआड टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत आहे. पाण्याची समस्या दूर व्हावी, यासाठी अनेकवेळा हंडा मोर्चा तसेच ठिय्या आंदोलन करून नागरिकांनी मनपाच्या पाणीपुरवठा विभागाचे



वाभाडेच काढले आहे. अनेकवेळा आजी-माजी लोकप्रतिनिधींनी देखील पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर देखील धरले. परंतु अतिशय निर्ढावलेल्या अधिकाऱ्यांकडून पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही करताना दिसत नाही. एकीकडे पाणीटंचाईमुळे नागरिक हवालदिल झालेले असताना दुसरीकडे मात्र पाणीपुरवठा करणारी पाइपलाइन फुटून लाखो लिटर पाणी वाया जात असल्याची तक्रार करूनदेखील पालिका प्रशासनाकडून ही फुटलेली पाइपलाइन दुरुस्त केली नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. वडाळागाव विस्टा बिल्डिंग दोन, अशोका हॉस्पिटल मार्ग कॉर्पोरेशनची पाइपलाइन फुटलेली आहे. पाणीपुरवठा विभागाला कळवूनही दुरुस्तीचे काम केले नाही. ब्लूमुन सोसायटी इंदिरानगर पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन फुटून लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होत आहे. कलानगर चौक, इंदिरानगर येथे पाण्याची गळती होते. परंतु महापालिकेतील कर्मचाऱ्यांवर कुणाचाही अंकुश नसल्याने वारंवार दुर्लक्ष केले जाते. याबाबत शिवसेना उबाठा गटाचे पदाधिकारी ऋषी वर्मा यांनी तक्रार केली आहे. एकूणच परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत अपयशी ठरलेले पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी आता पाइपलाइन दुरुस्त करून पाण्याचा होणारा अपव्यय तरी थांबवतील का? असा सवाल स्थानिक नागरिकांनी केला आहे.

## समाज समंजस, सुजाण झाला तर आधाराश्रमाची गरज नाही

### सुनील बर्वे : आधाराश्रमाचा वर्धापनदिन साजरा

**नाशिक : प्रतिनिधी**

अनाथ बालकांचे संगोपन करणाऱ्या आधाराश्रम संस्थेतील बालकांची संख्या वाढू नये. संस्थेत अतुलनीय सेवाकार्य अखंडपणे सातत्याने सुरू आहे. येथील कर्मचारी आधारस्तंभ आहेत. येथे नकारात्मक वातावरणात सकारात्मक कार्य केले जाते याबद्दल समाधान वाटते. समाज समंजस, सुजाण झाला तर आधाराश्रम, वृद्धाश्रम यांची गरज राहणार नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते सुनील बर्वे यांनी केले.

कुसुमाग्रजांनी ज्या संस्थेचा मानवतेचे मंदिर म्हणून गौरव केला त्या आधाराश्रम संस्थेने सत्तर वर्षे पूर्ण केली आहेत. काल रविवारी (दि.१३) एक्काहत्तराव्या वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. लोकप्रिय ज्येष्ठ नाटक व चित्रपट अभिनेते सुनील बर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम सायंकाळी ५ वाजता संस्थेच्या घारपुरे घाटाजवळ असलेल्या इमारतीच्या प्रांगणात झाला. व्यासपीठावर अध्यक्ष प्रभाकर केळकर, उपाध्यक्षा सुनिता परांजपे, कार्यवाह कल्याणी दातार, हेमंत पाठक उपस्थित होते. प्रारंभी आश्रमकन्यांनी स्वागतगीत व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सुवर्णा दाबके यांनी करून दिला. हेमंत पाठक यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमात उत्कृष्ट कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी, देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, देणगीदार, हितचिंतक यांच्या एकत्रित कार्यातून संस्थेने दीर्घ वाटचाल केली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपाली पालेकर व कीर्ती थिटे यांनी केले. समन्वयक राहुल जाधव यांनी आभार मानले.

## भगूर, देवळालीत हनुमान जयंती साजरी

**देवळाली कॅम्प: प्रतिनिधी**

भगूर येथील गायकवाड गल्लीतील सत्व हनुमान जयंतीनिमित्त भाविकांची दर्शनासाठी अलोट गर्दी झाली होती.

यावेळी अभिषेक महापूजा,पूजा विधी अनिल बडदे यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. दुपारी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पालखी सोहळा मिरवणूक शहरातील करंजकर गल्ली, छत्रपती शिवाजी चौक, राम मंदिर रोड, शीतळा मंदिर, मेनरोड आदींसह विविध भागातून काढण्यात आली. सायंकाळी हनुमान भक्तांसाठी भजन कीर्तनाचे आयोजनासह भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येऊन हजारो भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला. येथील मेन स्ट्रीटरोडवरील हनुमान मंदिरात पहाटे पूजाविधी अजय चौधरी,



बोर्ड सदस्य सचिन ठाकरे, उत्तम टाकळकर यांच्या हस्ते महाअभिषेक करण्यात आला.

जय बजरंग फाउंडेशन, सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या येथील हनुमान मंदिरात पूजाविधी करण्यात येऊन संदीप शिंदे,गोकुळ मोजाड,राहुल गिते, धीरज मोजाड राहुल रोकडे, डॉ महेश शिंदे, किरण गावंडे, ज्ञानेश्वर शिंदे आदींनी भक्तांना खिचडी व फळे वाटप करण्यात आले.

**बनाचळ हनुमान मंदिर**

रेस्ट कॅम्प रोडवरील शांती सदन येथे हनुमान मित्र मंडळ श्री शिव महापुराण समिती लहवित रोडला कासार दाम्पत्याच्या हस्ते पूजाविधी करण्यात आली. यावेळी दीपक बलकवडे, वृक्षमित्र तानाजी भोर, सुरेश कदम,देवीदास गोडसे आदींनी महाप्रसादाचे वाटप केले यावेळी शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी देवळाली कॅम्प बजरंग मित्र मंडळाच्या वतीने येथील बालगृह रोडवरील दक्षिणमुखी श्री महारुद्र हनुमान मंदिरात पहाटे अभिषेक व महापूजा करण्यात येऊन सायंकाळी चारणवाडी येथील पाषाण तरुण मित्रमंडळाच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

## एका जोडप्याला बेदम मारहाण

**वाघोली :**

किरकोळ कारणावरून एका जोडप्याला बेदम मारहाण झाल्याची घटना घडली आहे. घरासमोरील रस्त्यावर ट्रॅक्टर उभा केल्याच्या कारणावरून हा वाद चिघळला आणि पाच ते सहा जणांनी मिळून दाम्पच्यावर हल्ला चढवला. या हल्लयात पती-पत्नी जखमी झाले असून, त्यांच्यावर जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या धक्कादायक घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

संपत रंगनाथ वांढेकर आणि त्यांची पत्नी आशाबाई संपत वांढेकर यांच्यावर हल्ला करण्यात आला आहे. काही गावगुंडांनी मिळून त्यांच्यावर हल्ला केला. घटनेच्या दिवशी अशोक देवराव कराळे यांचा ट्रॅक्टर डिझेल संपल्यामुळे वांढेकर यांच्या घरासमोर उभा करण्यात आला होता. या कारणावरून वांढेकर दाम्पत्य आणि कराळे यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. वाद विकोपाला गेला.



## चौकमंडईतील मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सव साजरा

**जुने नाशिक : वार्ताहर**

येथील चौकमंडई भागातील वझरे रोडवरील ऐतिहासिक मारुती मंदिर तथा श्रद्धाधाम (दक्षिणमुखी) येथे हनुमान जन्मोत्सव उत्साहात व धार्मिक पद्धतीने साजरा करण्यात आला.

यावेळी फुलमाळी पंच ट्रस्टचे अध्यक्ष सागर दीपकराव वझरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक नाईक, दिलीप भुजबळ, ज्येष्ठ नेते शशी हिरवे, अनिल गायकवाड, गिरीश कमोद, मारुती शिंदे, पुंडलिक दरोडे, राजेंद्र शिंदे, सचिन गायकवाड, नाना कर्पे, राजू दरोडे, सिद्धांत सागर वझरे, सनी वझरे, प्रसिद्ध मेकअप कलाकार माणिक कानडे, धीरज वझरे, संदीप जगझाप, गिरीश बच्छाव, रामभाऊ आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, हनुमान जन्मोत्सवानिमित्त संपूर्ण मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करून संपूर्ण परिसर सुशोभित करून मोठ्याप्रमाणात सजावट करण्यात आली होती.

# नाशिकरोड, देवळालीगाव, विहितगाव परिसरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

विहितगावात मथुरा रोडवर सोळा वर्षांपूर्वी गिरीश गुप्ता यांनी मध्य प्रदेशातील सागर येथील जय दादा दरबारची प्रतिकृती असलेली हनुमानाची भव्य मूर्ती बसविलेली आहे. सकाळी राम, लक्ष्मण, सीता यांची आरती करून पाळण्यात हनुमानाची बालमूर्ती ठेवून महाआरती करत जन्मोत्सव साजरा केला. भाविक महिलांनी हनुमानावरील पाळणा व गीते सादर केली. मूर्तीपुढे ५६ भोग चढवित गिरीश गुप्ता यांनी विधीवत होम हवन केले. त्याचे पौरोहित्य विनोद चतुर्वेदी यांनी केले. महाआरतीही उत्साहात पार पडली. मालधक्क्यावरील तक्षशिला विद्यालयाचे ८२ विद्यार्थ्यांना महाप्रसाद दिला. शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष योगेश गाडेकर यांनी या मुलांना नेण्या-आणण्याची



व्यवस्था केली होती. यावेळी गिरीष गुप्ता यांनी महाप्रसादाची उत्तम व्यवस्था केली होती. राजन दलवाणी, रमेश भिमाणी, चंद्रशेखर दंदणे, दुर्गेश दंदणे, मिलिंद कोठुळे, दीपांश गर्ग, गोविंद भगतानी, हरीश मंघनानी, अनिल साधवानी, गिरीश रामवानी, नंदकिशोर नगरकर, अनंत दंदणे, सुधाकर जाधव, विपुल परमार, सचिन कोठुळे, अभिषेक हांडोरे, प्रज्योत नागी यांनी दिवसभर महाप्रसाद वाटण्याची उत्तम व्यवस्था केली.

देवळाली गावाजवळील रोकडोबा हनुमान मंदिराची पूजा गत सव्वाशे वर्षांपासून नाशिकरोडचे जाजू परिवार करीत आलेले आहेत. रमेश जाजू हे त्यांचे वडील चंपालालजी जाजू यांचा वारसा पुढे चालवत या रोकडोबा हनुमान मंदिराची सेवा करत आलेले आहे. गत २८ वर्षांपासून त्यांनी पुढाकार घेऊन येथे महाप्रसादाचे आयोजन केले आहे. यावर्षी सुमारे सात हजाराचे वर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सकाळी निलेश जाजू यांनी सपत्नीक होमहवन पूजा केली. हनुमान चालीसा व सुंदरकांड पठण करण्यात आले. जाजू परिवारातील जगदीश जाजू, अतुल जाजू, सुनील जाजू, संजय जाजू, अमर जाजू, रामेश्वर जाजू, जाजू, विजय, बाळूशेठ, निखिल, किशन अनुज, विशाल या जाजू परिवारातील सदस्यांनी पहाटे हनुमानावर शेंदुर लेपन, ध्वजारोहण, मूर्तीवर साज शृंगार, मुकुट चढवून यथासांग विधिवत पूजा केली. शेखर लवटे आणि परिवारानेही यात सहभाग घेतला होता. दिवसभर भाविकांनी रांगा लावून दर्शन घेतले. यावेळी राष्ट्रवादीचे मनोहर कोरडे, निवृत्ती अरिंगळे, प्रदीप देशमुख, दिलीप भोसले, टिंकू खोले, रवींद्र अस्वले, शम्मीशेठ आनंद, चैतन्य देशमुख, बाळासाहेब मते, रितेश केदार आदींनी भाविकांच्या दर्शनाची व्यवस्था केली.

देवळालीगावात दोन हनुमान मंदिरे आहेत. दंड्या मारुती मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम सुरू असूनही भाविकांनी रांगा लावून महाबलीचे दर्शन घेतले. रेल्वे मालधक्का रोडवरील जियाउद्दीन डेपोत सागर प्लास्टिकचे संचालक हरीराम देवाणी यांनी येथील पिंपळ वृक्षाखाली २० वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या हनुमानाची पहाटे शेंदूर लेपन करून अभिषेक केला. फुटाणे, गुळ, केळी यांचा भोग दिला. देवानी परिवारातील सर्व सदस्यांनी भाविकांना महाप्रसादाची उत्तम व्यवस्था केली होती.

एकलहरा रोडवरील अस्वले मळ्यातील तीस वर्षांपूर्वी मळेकऱ्यानी स्थापन केलेल्या हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव संपन्न झाला. सूर्योदयाचे वेळी सामुदायिक आरती करण्यात आली. आरोग्य शिबिर घेण्यात आले. जय बजरंग मित्र मंडळाने महाप्रसादाचे आयोजन केले होते. अनिल अस्वले, गोकुळ अस्वले, मनोहर भोर, संजय बोंबले, अविनाश अस्वले, विकास शिंदे, सुशांत अस्वले, अभिषेक अस्वले, यश अस्वले, गणेश आव्हाड आदींनी उत्तम व्यवस्था केली होती.

जिजामातानगर, जिजामाता व्यायामशाळा, जेल रोड येथे हनुमान जयंतीनिमित्त भजन व हनुमान तांडव आयोजित करण्यात आले होते. आरोग्य शिबिर सह्याद्री हॉस्पिटलमार्फत राबविण्यात आले. संतोष गाडेकर, गायत्री गाडेकर आणि शिवरत्न मित्रमंडळाने सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन केले होते. गोरेवाडी, देवी चौकातील लक्ष्मीनारायण मंदिर, बिर्ला मंदिर, नाशिकरोड पोलिस ठाणे, विहितगावातील सार्वजनिक हनुमान मंदिर, सिन्नर फाटा महाबली हनुमान मंदिर येथेही हनुमान जन्मोत्सव उत्साहात संपन्न झाला.

# एल्गार संघटनेचा आज मंत्रालयावर हंडा मोर्चा

**नाशिक : प्रतिनिधी**

इगतपुरी, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेची अपूर्ण कामे तत्काळ पूर्ण करून निकृष्ट दर्जाच्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामांची चौकशी करून दोषीं ठेकेदारांवर कारवाई करावी, या मागणीसाठी एल्गार संघटनेच्या नेतृत्वात लाडक्या बहिणी आज मंत्रालयावर हंडा मोर्चा काढणार आहेत. एल्गार कष्टकरी संघटनेने याबाबत निवेदन दिले आहे.

ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती ही समिती जलजीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे कार्यभूत नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा करण्याची योजनेची नियोजन करणे गरजेचे असताना, मात्र या समितीने व या समितीला संबंधित ठेकेदार व अधिकारी यांनी विश्वासात न घेता कामे केली आहेत. नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक, इगतपूरी, नाशिक, पेठ, सुरगाणा व इतर तालुक्यातील अनेक कामे अपूर्ण आहेत. अशा सर्व कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी व पुढील बिले अदा करू नये, अशी मागणी एल्गार कष्टकरी संघटनेच्या वतीने अनेकदा केली आहे. अनेकदा रास्ता रोको आंदोलन करून मागणी केली होती. मात्र त्यावर काहीही कारवाई केली गेली नाही.अनेक ग्रामपंचायतमध्ये अजूनही नळ कनेक्शन दिले नाही. ग्रामसेवक यांच्यावर देखील शिस्तभंगाची कारवाई करावी. यासाठी आज मोर्चा काढण्यात येणार आहे. जिल्हाध्यक्ष भीमा गुंबाडे, सचिव वसंत इरते, काळू निरगुडे यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालयावर हा मोर्चा नेण्यात येणार आहे.

## घरगुती वादातून महिलेस मारहाण

### सात जणांविरोधात गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

शहरातील पखाल रोडवरील रॉयल कॉलनी परिसरात एका महिलेवर सात जणांनी मिळून मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी रिझवाना अब्दुलअलीम सय्यद (वय ५७ वर्षे, रा. रॉयल कॉलनी, पखाल रोड, नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तन्वी सोसायटीच्या इमारत क्रमांक २ मध्ये, फ्लॅट क्रमांक ७ आणि ५ च्या पोर्चमध्ये ही घटना घडली. फिर्यादी महिलेच्या आरोपानुसार, हिना बागवान, परवीन सय्यद, हुसैन सय्यद, हसन बागवान, नदीम बागवान, नुरऐन आणि रिझवाना अफझल या सात जणांनी त्यांच्यावर शारीरिक हल्ला केला. सर्व आरोपींची संपूर्ण ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही.

पोलीस आरोपींचा शोध घेत असून, पोलीस उपनिरीक्षक जी. एम. जाधव या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# यशवंत व्यायामशाळेत हनुमान जयंती उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**



नाशिकच्या महात्मा गांधी रोड येथील यशवंत व्यायामशाळा येथे सालाबादप्रमाणे यावेळीही हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. १०८ वर्षामध्ये पदार्पण केलेल्या या संस्थेचे नाशिकच्या सर्वच नागरिकांशी स्नेहसंबंध असल्यामुळे सर्व जुने सभासद आणि हितचिंतक आणि नव्या पिढीचे खेळाडू, सभासद असे सर्वच मोठ्या संख्येने उपस्थित होते. विधिवत पूजा करून आणि आरती गाऊन कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यानंतर सर्वांना हनुमानाचा प्रसाद आणि दूध वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष रघुनाथ महाबळ, डॉ. जयराम महाबळ, डॉ. सदाशिव गोसावी, विजय खरोटे, आनंद खरे, प्रशांत गायकवाड, विविध खेळांचे प्रशिक्षक, व्यायामपटू आणि खेळाडू यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सर्व जुन्या सभासदांची भेट झाल्यामुळे सर्वांनी आनंद व्यक्त केला आणि यशवंत व्यायामशाळेच्या उत्तरोत्तर प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

एक लाख देणगी - यशवंत व्यायामशाळेचे अध्यक्ष दीपक पाटील आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने एक लाख देणगी व्यायामशाळेला देण्यात आली. दीपक पाटील यांचे चिरंजीव डॉ. स्वप्निल पाटील यांचे दोन वर्षांपूर्वी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दीपक पाटील यांचे नातू विवान, त्यांची सून श्रीमती पल्लवी आणि पत्नी सौ. मंदाताई यांच्या वतीने ही देणगी संस्थेचे उपाध्यक्ष रघुनाथ महाबळ यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. मागील वर्षीदेखील मुलांच्या आकस्मित जाण्याचे दु:ख असूनही व्यायामशाळेच्या प्रेमापोटी आणि प्रगतीसाठी दीपक पाटील यांनी मागील वर्षीही एक लाख देणगी दिली होती. यशवंत व्यायामशाळेच्या माध्यमातून खेळाडूंना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न राहिलेला आहे, असे यावेळी अध्यक्ष दीपक पाटील यांनी सांगितले.



# सिन्नर महाविद्यालयातील झाडांना गोंदेश्वर रोटरी अन् ग्रीन रिव्होल्यूशनची जलसंजीवनी

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर महाविद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या झाडांना पाणी देण्यासाठी रोटरी क्लब गोंदेश्वर आणि ग्रीन रिव्होल्यूशन यांच्या वतीने ड्रीप इरिगेशनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, या ड्रीपच्या माध्यमातून झाडांना जलसंजीवनी मिळणार आहे.

रोटरी क्लब गोंदेश्वर आणि ग्रीन रिव्होल्यूशनचे काही सदस्य महाविद्यालयाच्या मैदानावर मॉर्निंग वॉकसाठी जात असतात. यावेळी त्यांच्या लक्षात आले की महाविद्यालयाने मोकळ्या जागेत खूप झाडे लावली आहेत, परंतु पाणी नसल्यामुळे झाडे सुकून वाळून चालली होती. ग्रीन रेवोल्यूशनचे अध्यक्ष नीलेश गावंड व रोटरी अध्यक्ष सुरेश जोंधळे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी या झाडांना पाणी द्यायची व्यवस्था करण्यासाठी ड्रीप इरिगेशन करण्याचे कल्पना मांडली. अनिल गोरडे यांनी साहित्य दिले व रोटरी सदस्य व ग्रीन रिव्होल्यूशन सदस्य यांनी प्रत्यक्ष श्रमदान करून एक आठवडाभरात सर्व झाडांना ड्रीपचे पाइप जोडून दिले. प्राचार्य पवार सर व जिम खाना प्रा. इंगळे तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांना ही माहिती देण्यात आली. कमीत कमी दीडशे झाडांसाठी पाण्याची व्यवस्था एका बटनावर एका वेळेस झाली. पाणी दिल्यानंतर सुकलेली झाडी टवटवीत दिसायला लागली. येथेही एक प्रकारची छोटी वनराई रोटरी क्लबमार्फत होणार आहे. माजी अध्यक्ष अनिल गोर्डे यांनी या प्रोजेक्टसाठी लागणारा सर्व खर्च स्वतः केला. याप्रसंगी सतीश नेहे, सुरेश जोंधळे, दत्ता नवले, विनोद दंताळ, प्रसाद पाटोळे, नीलेश काकड, अनिल गोरडे, दीपक वरपे, किरण भंडारी, ग्रीन रिव्होल्यूशनचे नीलेश गावंड, संदीप पोटे, डॉ. हांडोरे, डॉ. विनोद घोलप, डॉ.श्रीकांत, डॉ. आव्हाड उपस्थित होते.

## आईच्या बॉयफ्रेंडचा मुलीवर अत्याचार

**पुणे:** बॉयफ्रेंडच्या मदतीने आईने स्वतःच्या मुलीचे अश्लील व्हिडिओ काढत व्हायरल केल्याचा हादरवणारा प्रकार समोर आला आहे. एवढ्यावरच न थांबता महिलेने मुलीला स्वतःच्या बॉयफ्रेंडसोबत शारीरिक संबंध ठेवायला भाग पाडले. यानंतर आरोपी फरार झाले होते. पीडित मुलीने पोलिसांना या सगळ्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपी आई व तिच्या बॉयफ्रेंडला अटक केली आहे.



**मनमाड : शहरातील रेल्वे स्टेशन बाहेर असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला १४ एप्रिलनिमित्त बिहार राज्यातील महाबोधी महाविहाराचा देखावा करण्यात आला असून, हा देखावा अतिशय आकर्षक आणि सुरेख असा झाला आहे. सध्या हा सेल्फी पॉइंट झाला असून, सोशल मीडियावर आपले रील आणि स्टेट्स बनवण्यासाठी तरुणांची गर्दी होत आहे. (छाया : आमिन शेख)**

# सटाणा परिसरात ठिकठिकाणी हनुमान जन्मोत्सव साजरा

**सटाणा : प्रतिनिधी**



शहरासह परिसरात हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात पार पडला. सटाणा न्यायालयाच्या आवारातील श्री हनुमान मंदिरात पहाटे सटाणा न्यायालयाचे न्यायाधीश यू.पी. हिंगमिरे व न्यायाधीश सी.यू. चिपकुले यांच्या हस्ते विधिवत पूजा संपन्न होऊन जन्मोत्सव साजरा करण्यात आला. मंदिर परिसरात सडारांगोळी, फुलांनी, विद्युत रोषणाई सजविण्यात आले होते. जन्मोत्सवानिमित्त पहाटेपासून मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत होती. भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त वकील संघाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुमारे १५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना वकील संघाच्या वतीने न्यायाधीश हिंगमिरे, चिपकुले, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. पंडितराव भदाणे यांच्या हस्ते भेटवस्तू व प्रमाणपत्र देण्यात आले. ॲड. ए. एल. पाटील, ॲड. सतीश चिंधडे, ॲड. हिरामण सोनवणे, ॲड. यशवंत सोनवणे, ॲड. संजय सोनवणे, ॲड. गोसवी, करण पवार यांच्यासह पंकज नवगजे, प्रवीण सोनवणे, राकेश येवला, अंबादास सोनवणे, गोविंद येवला, वैभव कायस्थ, हर्षद वाघ, यश दशपुते, परेश भामरे आदी उपस्थित होते.

## शॉर्टसर्कीटमुळे ऊस जळाला

**पुणे :** सोनवडी सुपे येथे १५ दिवसात तिसऱ्यांदा शॉर्टसर्किटने दोन शेतकऱ्यांचा अर्धा एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना घडली. येथील शेतकरी सतीश महादेव गोंडगे व दत्तात्रय मनोहर गोंडगे यांचा अर्धा एकर उसाचे पाच ते सहा महिन्यांचे पीक होते. या ऊसाच्या शेतावरुन शेती पंपासाठी वीजेच्या तारा गेलेल्या आहेत. आज रविवारी रोजी दुपारी १च्या दरम्यान वाऱ्याने या शेतातील तारांचा एकमेकांना स्पर्श झाला, आणि ठिणग्या ऊसाच्या शेतात पडल्या. या ठिणग्यामुळे ऊसाच्या पाचटाने पेट घेतला. विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, वेगाने वारा असल्यामुळे आग आटोक्यात येऊ शकली नाही.

# क्षेत्रमंत्री अनिल सांबरे यांची टाकळी हनुमान मंदिरास भेट

**नाशिक : प्रतिनिधी**



विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामचे क्षेत्रमंत्री अनिल सांबरे यांनी श्री क्षेत्र टाकळी येथील समर्थ रामदास स्वामींच्या हनुमान मंदिरास भेट देऊन पाहणी केली व विश्वस्तांना मार्गदर्शन केले.

शुक्रवारी सकाळी साडेआठ वाजता बालाजी मंदिर कुर्तकोटी शंकराचार्य न्यास गंगापूर गाव येथे त्यांचे आगमन झाले. तिथे विभाग मंत्री अनिल चांदवडकर यांनी स्वागत केले. चर्चेला अध्यक्ष विश्व हिंदू परिषदेचे उपाध्यक्ष श्री द्वारकाप्रसाद तिवारी हे उपस्थित होते..नंतर मंदिर अर्चक पुरोहित नाशिक आयामाच्या कार्यकर्त्यांची बैठक अनिल सांबरेंबरोबर झाली. यावेळी प्रशांत कुलकर्णी, प्रदीप क्षीरसागर, प्रकाश शुक्ल,कौस्तुभ अष्टपुत्रे,भूषण देशपांडे उपस्थित होते. नंतर नंदकिशोर भावसार यांनी अनिलजींची भेट घेऊन त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. नंतर सतीश सातवणकर व सुधाकर बिंदू यांनी गोदावरी परिक्रमा या विषयावरती अनिलजींची चर्चा केली. दुपारी दोन वाजता आनंदालय या विश्व हिंदू परिषदेच्या जनजाती सेवा विभागाच्या प्रकल्पाला भेट दिली. दुपारी तीन वाजता परमहंस परिव्रजकाचार्य श्री लोकनाथ तीर्थ स्वामी महाराज महायोग ट्रस्ट या सी नारायणकाका ढेकणे यांनी बांधलेल्या आश्रमाला भेट दिली. तिथे काका महाराजांनंतर त्यांचे उत्तराधिकारी नारायण रत्न परमपूज्य श्री प्रभुणे महाराजांनी अनिलजींना न्यासाबद्दल संपूर्ण माहिती सांगितली व त्यांचा सत्कार केला. नंतर काका महाराजांचे फोटो दाखविले. तिथे प्रचार -प्रसिद्धी आयामाचे प्रमुख पद्माकर देशपांडे उपस्थित होते. संध्याकाळी सहा वाजता जय भवानी रोड येथील श्री तुळजाभवानी मंदिराला भेट दिली व तेथील विश्वस्तांना मार्गदर्शन केले. नंतर राजू टाऊनशिप येथील दत्त मंदिरात अनिलजींनी भेट दिली व तेथील विश्वस्त नितीन चाळके, महादेव जवळकर व सर्व मंडळींची चर्चा केली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तिथे विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष विराज लोमटे हेही उपस्थित होते.

# सटाण्यात नगरपरिषदेतर्फे महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी

**सटाणा : तालुका प्रतिनिधी**




नगरपरिषदेच्या वतीने महात्मा जोतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील महात्मा फुले चौकातील महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याचे पूजन नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष सुनील मोरे व नगर परिषदेच्या प्रशासकीय अधिकारी संजना अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. सनपाच्या महात्मा गांधी वाचनालयातील महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन नगर परिषदेचे लिपिक सचिन जाधव व बाळासाहेब देवरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक दीपक पाकळे, बाबूलाल मोरे, झीपा खैरनार, प्रकाश अहिरे, नाना मोरकर, ॲड. सोमदत्त मुंजवाडकर, डॉ. मनीष ढोले, पुरुषोत्तम खैरनार, सोमनाथ खैरनार, दुर्गेश गायकवाड, ग्रंथपाल ज्ञानेश्वर खैरनार, धनंजय भदाणे, विनायक पाकळे, धनंजय सोनवणे, विवेक सोनवणे, सागर मोरे, कृष्णा कासार, विवेक देसले, दगडू देवरे, लक्ष्मण सोनवणे, हिरालाल बुजवा आदींसह नागरिक, कर्मचारी उपस्थित होते.

# नायगावच्या सूर्योदय पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

## छाननीत दोघांचे अर्ज बाद, नव्याने १२ संचालकांची निवड

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील नायगाव येथील सूर्योदय ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत दोन जणांचे उमेदवारी अर्ज बाद झाल्याने संस्थेची निवडणूक बिनविरोध पार पडली. छाननीनंतर बारा उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्याने अविरोध निवडीची केवळ औपचारिकता बाकी राहिली आहे.

सर्वसाधारण गटाच्या ८ जागांवर अजय सुभाष हुल्लुळे, मोहन निवृत्ती कातकडे, रामनाथ बबन बोडके, त्र्यंबक दत्तात्रय भगत, संतोष शंकर दौंड, नितीन नारायण लोहकरे, भगवान रामनाथ बोडके यांचे अर्ज वैध ठरले. तर इतर मागास प्रवर्गात मनोज दादा जेजुरकर, अनुसूचित जाती जमाती गटात रोशन सुनील गायकवाड, भटक्या विमुक्त जाती जमाती व विशेष मागास प्रवर्गात चंद्रकांत महादू बोडके आणि महिला राखीवच्या दोन जागांमध्ये आरती जगदीश कडवे आणि अनिता राजेंद्र काकड या दोन महिला उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले.

त्यामुळे १२ जागांच्या संचालक मंडळाची ही निवडणूक बिनविरोध पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी सुदर्शन तांदळे यांनी छाननीनंतर यासंदर्भात अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध केल्याने संस्थेच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले.


# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर** ९८३४१०९३३७

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-**९८६०१३६५३६

### Name changed

My Old Name TABASSUM BANO AHMED SAHEB KOKNI has been changed to My New Name **TABASSUM AHMED SAHAB KOKNI** as per Aadhar Card.

---

My Old Name AHMED RAZA KOKNI has been changed to My New Name **AHMED RAZA ABDUL KADIR KOKNI** as per Aadhar Card.

### जमीन विकणे आहे

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-**८७८८०९२४१५

### विकणे आहे

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

### हरवले आहे

प्रतिनिधीचे नाव कार्तिक कांबळे कर्मचारी आयडी - २४११३६००३२०१४२३ एजन्सीचे नाव - ashpa global services pvt. एचडीएफसी बँकेचे ओळखपत्र हरविले आहे तरी सदरील आयकार्ड कुणाला आढळून आल्यास कृपया **अभिजीत खरात ९७३०२१७९०७** या क्रमांकावर संपर्क साधावा

### Lost & Found

Representative Name Karthik Kamble Employee ID - 241136003201423 Agency Name - ashpa global services pvt. HDFC Bank Identity Card is lost but if anyone finds the said I Card please contact Abhijit Kharat on 9730217907

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**




# सिंहस्थामध्ये आयएमएची भूमिका राहणार महत्त्वाची : आ. राहुल आहेर

**नाशिक : प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळा हा जागतिक स्तरावरील मोठ्या महोत्सवांपैकी एक असून, यानिमित्त देश व जगभरातून भाविक नाशिकला येणार आहेत. या कालावधीत स्थानिक प्रशासनाला वैद्यकीय सेवा पुरविण्याच्या अनुषंगाने मदत करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनची भूमिका महत्त्वाची राहणार आहे, असे प्रतिपादन आमदार डॉ. राहुल आहेर यांनी केले.

इंडियन मेडिकल असोसिएशन नाशिक शाखेच्या नूतन कार्यकारिणी पदग्रहण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षपदाची जबाबदारी डॉ. निलेश निकम यांनी तर सचिवपदाची जबाबदारी डॉ.मनिषा जगताप यांनी स्वीकारली. नाशिक पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, मावळते अध्यक्ष डॉ. सुधिर संकलेचा, सचिव डॉ. रविराज खैरनार, आगामी अध्यक्ष डॉ.विशाल पवार उपस्थित होते. समारोपाप्रसंगी नवनिर्वाचित सचिव डॉ. मनिषा जगताप यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निकीता पाटील, डॉ. नितीन वाघचौरे यांनी केले. आयएमए कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. प्रेरणा शिंदे, खजिनदार डॉ. अनिता भामरे, डॉ. शलाका बागूल यांचा समावेश आहे.

### रुग्णालयांना सहकार्य करणार: करिश्मा नायर

रुग्णालये नोंदणी व परवाना नूतनीकरणासाठी महानगरपालिकेच्या वतीने ऑनलाइन यंत्रणा कार्यान्वित केली आहे. डॉक्टरांच्या इतरही प्रश्नांवर महानगरपालिका प्रशासन सकारात्मकतेने विचार करत आहे. येत्या काळात रुग्णालयांना संपूर्ण सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही नाशिक महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांनी दिली.

पान १ वरून

## निफाड, चांदवडला गारपिटीचा तडाखा

ढगांनी दाटी केली आणि भर उन्हात पाऊसाच्या सरी बरसू लागल्या.पावसाच्या थेंबाबरोबरच गाराही पडू लागल्याने शेतकऱ्यांची धावपळ उडाली. सुमारे अर्धा तास बरसलेल्या गारांच्या पावसामुळे काढणीला आलेल्या द्राक्ष मण्यांना मोठ्या प्रमाणात तडे गेल्याने हातात आलेले पिक पूर्णपणे वाया गेले आहे.तर काढणीला आलेल्या कांदा पिकाला गारांचा फटका बसल्याने कांदा पात आडवी पडल्याने आता हा कांदा फार काळ दम धरणार नसल्याचे त्याची बे भावात विक्री करावी लागणार आहे. शासनाने नुकसानीचे तत्काळ पंचनामे करावेत, अशी मागणी शिरवाडे वणी येथील अमोल रामभाऊ निफाडे यांनी केली आहे.

## भूषण गवई सरन्यायाधीश

१९९० च्या सुमारास त्यांनी नागपुरात निवृत्त न्यायाधीश अधिवक्ता राजा. एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. त्यानंतर ते मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्यायाधीश झाले आणि नंतर त्यांना बढती देऊन सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशाची जबाबदारी देण्यात आली.

## विशाल गवळीची आत्महत्या

विशाल गवळी याने गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात कल्याणच्या कोळसेवाडी परिसरातील अल्पवयीन मुलीला फूस लावून स्वत:च्या घरी आणले होते. घरात त्याने मुलीवर लैंगिक अत्याचार केले. हा प्रकार कोणाला कळू नये म्हणून विशालने घरातच या मुलीची हत्या केली होती. त्यानंतर विशाल गवळीने या मुलीचा मृतदेह बापगाव परिसरात फेकून दिला होता. त्यानंतर विशाल गवळी हा शेगावला पळून गेला होता. शेगाव पोलिसांनी सापळा रचत शिवाजी चौकातील एका सलूनमधून त्याला ताब्यात घेतले होते. या घटनेनंतर कल्याण परिसरात संतप्त पडसाद उमटले होते.

गांवकरी



## महत्त्वाचे

### असोसिएशन ऑफ फिजिशियन्स संघटनेचा पदग्रहण सोहळा



**नाशिक :** असोसिएशन ऑफ फिजिशियन्स नाशिक या संघटनेचा पदग्रहण सोहळा नुकताच नाशिक येथे झाला. याप्रसंगी डॉ. समीर चंद्रात्रे यांनी अध्यक्षपदाची, डॉ. प्रीतम अहिरराव यांनी सचिव तर डॉ. राहुल पाटील यांनी खजिनदारपदाची सूत्रे हाती घेतली. या कार्यक्रमास मुंबई येथील प्रसिद्ध डॉ. विजय पनीकर व डॉ. विजय नेगलूर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. नारायण देवगावकर होते. या कार्यक्रमात डॉ. विजय पनिकर व डॉ. विजय नेगलूर यांनी संघटनेच्या नवीन कार्यकारिणीस व उपस्थित डॉक्टरांसाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. समीर चंद्रात्रे यांनी पुढील कालावधीत असोसिएशनतर्फे डॉक्टरांसाठी ज्ञान संवर्धनात्मक व सामान्य जनतेसाठी आरोग्य संवर्धन मार्गदर्शनपर विविध कार्यक्रम करण्याचे घोषित केले. संघटनेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष डॉ. समीर पेखळे यांनी संघटनेच्या सर्व कार्यकारिणी व फिजिशियन्स यांनी एकत्र येऊन संघटनेसाठी आणि समाजासाठी कार्य करावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन डॉ. सुवर्ण तांबडे व डॉ. राजश्री धोंगडे यांनी केले. आभार डॉ. प्रीतम अहिरराव यांनी मानले.

### अनधिकृत झोपड्या उभारल्याबद्दल गुन्हा

**पंचवटी :** मौजे ओढा, ता. नाशिक येथे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी महावितरण कंपनीला दिलेल्या जागेत बेकायदेशीररीत्या अतिक्रमण करून झोपड्या टाकल्याबाबत आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नीलेश अण्णा बत्तीसे (३०) धंदा-सेक्युरिटी सुपरवायझर, रा. मु पो. शिंदे भयाळे, ता. चांदवड, जि. नाशिक यांनी आडगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दि.८ रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास मौजे ओढा, ता. जि. नाशिक येथील गट नं. १७१ क्षेत्र ११.८० आर. चौ. मी. व गट नं. १७२ क्षेत्र ३.८४ आर.चौ. मी. या ठिकाणी शासनातर्फे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी महावितरण कंपनीला दिलेल्या जागेत बेकायदेशीररीत्या अतिक्रमण करून झोपड्या टाकल्या म्हणून संशयित जगन काशीनाथ मराडे, सुखदेव काशीनाथ मराडे, विठ्ठल कांबळे, पिंटू कांबळे, शिवराम काशीनाथ मराडे, शंकर लहाणु मराडे, लक्ष्मण खंडू मराडे, वाळू खंडू मराडे, विठ्ठल खंडू मराडे, मधुकर खंडू मराडे, सदाशिव खंडू मराडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार गांगुर्डे करीत आहेत.

### बसस्थानकातून सोन्याचे मंगळसूत्र चोरी

**सिडको :** शहरातील ठक्कर बाजार बसस्थानकावर सायंकाळच्या सुमारास गर्दीचा गैरफायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी एका महिला प्रवाशाचे दोन पदरी सोन्याचे मंगळसूत्र चोरीस गेल्याची घटना समोर आली आहे. सदर महिलेकडून अंदाजे दीड लाख रुपये किमतीचे, सुमारे पाच तोळे वजनाचे मंगळसूत्र गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे. लता देवीदास मोरे (वय ५९, सध्या राहणार खोणी पलावा, डोंबिवली पूर्व, (मूळ गाव केरसाणे, ता. सटाणा, जि. नाशिक) या त्यांच्या पतीसोबत नाशिक-नवापूर सटाण्याला जाण्यासाठी बसमध्ये चढत असताना ही घटना घडली. याप्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सरकारवाडा पोलीस करीत आहेत.



### रिक्षाचालक खूनप्रकरणी संशयित ताब्यात

**सातपूर :** येथील श्रमिकनगर भागात प्रकाश मधुकर सूर्यवंशी (३९) यांच्या खूनप्रकरणी सातपूर पोलिसांनी संशयितांना अटक केली आहे. घटनेतील ४ संशयित आरोपी डीबी पथकातील सागर गुंजाळ यांना मिळालेला माहितीनुसार चांदशी शिवारातून संघर्ष मोरे, प्रमोद भगत, प्रेम जाधव, भावेश अहिरे राहणार सर्व धर्माजी कॉलनी यांना सातपूर डिबी टीम दीपक खरवडे, भूषण शेजवळ, अनिल आहेर, रवी जाधव यांच्या पथकाने सायंकाळी साडे सहा वाजता ताब्यात घेतले



### ऑलिम्पियाड परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश

**नाशिक :** वणी येथील मविप्रच्या आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी एज्यूनो इंटरनॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत सुयश मिळविले. या स्पर्धेत शाळेतील एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यातील ६ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळविले. ४ विद्यार्थ्यांनी रौप्यपदक व २ विद्यार्थ्यांनी कास्यपदक मिळविले. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना सहशिक्षिका कु. डिंपल गांगुर्डे यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापिका एस. डी.काळे यांनी विद्यार्थ्यांना पदके देऊन सन्मानित केले. यावेळी मविप्रचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### बारावीपर्यंत मराठी विषय अनिवार्य करा

**नाशिक :** दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी पारित झालेल्या 'महाराष्ट्रामध्ये बारावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा करण्याबाबतच्या शासनादेशाची अंमलबजावणी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून करावी, अशा मागणीचे निवेदन मराठी विषय महासंघाने निवासी जिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना दिले. याप्रसंगी महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्राध्यापक चांगदेव खोले, उपाध्यक्ष प्रा. विनोद पवार, उपाध्यक्ष प्रा. चंदर बोरसे, सल्लागार प्रा. सविता सोनवणे, सहखजिनदार प्रा. वंदना रायते, इगतपुरी तालुका प्रतिनिधी प्रा.अर्चना पाटील आदी प्रतिनिधी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे कि, आक्टोबर महिन्यात केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा दिला आहे. १३ सप्टेंबर २०२४ रोजी राज्य शासनाने मराठी विषय इयत्ता बारावीपर्यंत सक्तीचा केलेला आहे. परंतु मराठी भाषा ही सर्व विद्या शाखेत अनिवार्य करून शासन आदेशाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून करावी, यासाठी राज्य महासंघाचे अध्यक्ष सुनील डिसले, कार्याध्यक्ष मनीषा रिठे, सचिव बाळासाहेब माने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष प्रा. चांगदेव खोले,उपाध्यक्ष प्रा. विनोद पवार, प्रा.चंदर बोरसे यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे आणि मराठी भाषा उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

# गंगापूररोडला झाडाने घेतला महिलेचा बळी

## धोकादायक वृक्षांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**शहरातील उच्चभ्रू लोकवस्ती म्हणून नामांकित असलेल्या गंगापूर रोडवरील वृक्षांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. रविवारी सकाळी नऊच्या सुमारास गंगापूररोडवरून शिवाजीनगरकडे येत असताना सोमेश्वर बसथांबा येथे वृक्षाची फांदी अंगावर पडल्याने महिलेला प्राण गमवावे लागण्याची घटना उघडकीस आली.**

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दीपक अनिल सोनवणे हे आईसमवेत गंगापूररोडवरून शिवाजीनगरकडे दुचाकीवरून जात होते. यावेळी दीपक व त्यांची आई अलका अनिल सोनवणे (वय ५५ वर्ष) यांच्या अंगावर



अचानक वृक्षाची फांदी कोसळली. यावेळी अलका यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना औषधोपचाराकरिता संदीप नवले यांनी जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. यावेळी डॉ. शिंदे यांनी अलका सोनवणे यांनी तपासून मयत घोषित केले. तसेच दीपक सोनवणे यांना देखील गंभीर मार लागला असून, त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, गंगापूर रोडवरील रस्त्यात येणारे वृक्ष व वृक्षांच्या विस्तारलेल्या फांद्या याबाबत महापालिकेच्या उद्यान विभागाने लक्ष घालून नागरिकांचे प्राण जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. विस्तारलेल्या फांद्या छाटाव्यात, अशी मागणी करण्यात आली. घटनेनंतर उद्यान विभागाने तात्काळ सोमेश्वर बसथांबा परिसरातील विस्तारलेल्या वृक्षांच्या फांद्या छाटल्या.

**गंगापूर रोड, पेठ रोड, दिंडोरी रस्त्याला धोकेदायक झाडे**

गंगापूर रोड, पेठ रोड, दिंडोरी रोड यांसह शहरातील बहुतांशी ठिकाणी रस्त्याच्या कडेला धोकेदायक झाडे आहेत. या झाडांमुळे अनेकवेळा छोट्या-मोठ्या अपघातांच्या घटनादेखील घडल्या आहेत. हे सर्वश्रुत असतानाही मनपाच्या उद्यान विभागाने हे धोकेदायक झाडे हटविणे उचित असतानाही संबंधित विभागाकडून दुर्लक्षित केले जात आहे. गंगापूर रोडवरील घटनेनंतरही पालिका प्रशासनाला जाग येत नसेल तर पालिका प्रशासन अजून काही नागरिकांचा बळी जाण्याची वाट बघणार आहे का? असा सवाल स्थानिक नागरिकांनी केला आहे.

## त्र्यंबकरोडवरील हुक्का पार्लरवर छापा सातपूर पोलिसांची कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सातपूर पोलीस स्टेशनच्या पथकाने त्र्यंबकरोडवरील हॉटेल डेझर्ट शिफ येथे छापा टाकत तब्बल सात हजार ३९०/- रुपयांचे हुक्का साहित्य जप्त केले असून, तिघांविरुद्ध विनापरवाना तंबाखूजन्य वस्तू विक्रीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी भूषण अशोक शेजवळ (३२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमेय अरविंद जैन (२८), निखिल राम पराते (२६), व कीपान बादाम रावत (वय २४) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांना हॉटेलमध्ये विनापरवाना हुक्का व सुगंधित तंबाखू विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी एमव्हीए ८०२ नावाचे ६ हुक्का पॉट,६ सुगंधित तंबाखूचे फ्लेवर्स, आणि हुक्का ओढण्यासाठी फिल्टर पाइप असा एकूण ७ हजार ३९०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी सध्या आरोपींना अटक करण्यात आलेली नसून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राकेश न्हाळदे करीत आहेत.

या कारवाईमुळे त्र्यंबकरोड परिसरात हुक्का पार्लर चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, नाशिक शहर पोलिसांकडून अशा बेकायदेशीर व्यवसायावर यापुढे देखील कारवाई करण्यात येणार असल्याचे सातपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत नलवडे यांनी सांगितले.

## शारीरिक तंदुरुस्तीसाठी योग महत्त्वाचा : डॉ. मीनाक्षी गवळी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सिडको व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्ष बी.एस्सी. आणि बी.सी. एस. च्या विद्यार्थ्यांसाठी शारीरिक तंदुरुस्ती आणि योग या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

केटीएचएम महाविद्यालयाच्या योगतज्ज्ञ आणि क्रीडा संचालिका डॉ. मीनाक्षी गवळी यांनी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. किशोरवयात योगाचे असलेले महत्त्व, त्याचे विविध फायदे आणि योगासनांच्या नियमित सरावाने शारीरिक तंदुरुस्ती कशी राखता येते, याबद्दल त्यांनी सखोल माहिती दिली. यावेळी बोलताना डॉ. गवळी यांनी संतुलित आणि पौष्टिक आहाराचे महत्त्व विशद केले. तसेच, बाहेरचे जंक फूड आणि तेलकट पदार्थ खाण्याचे शरीरावर होणारे नकारात्मक परिणाम त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. कुशारे यांच्या मार्गदर्शनाखाली या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. सोपान कुशारे यांनी आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, असे सांगून शारीरिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त जुन्या नाशकात उत्साह

### ठिकठिकाणी झळकले शेकडो बॅनर्स; संपूर्ण परिसर झाला निळा

**जुने नाशिक : वार्ताहर**

भारतरत्न महामानव तथा भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त येथील विविध भागात डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करणारी शेकडो बॅनर्स, फलक व स्वागत कमानी उभारण्यात आल्याने हा संपूर्ण परिसर निळा झाला आहे. याशिवाय बाजारातदेखील मोठ्या प्रमाणावर डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विविध प्रकारच्या सजावटीच्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे. दरम्यान, जयंतीनिमित्त भीमसैनिकांमध्ये अमाप उत्साहाचे वातावरण पसरल्याचे दिसून येत आहे.



अभिवादनचे बॅनर्स लावण्यात प्रामुख्याने यश शिंदे, मोहन अढांगळे, शशी हिरवे, माजी नगरसेवक गजानन शेलार, काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे शहराध्यक्ष हनीफ बशीर, गज्या तेजाळे, युवा नेता मोईन शेख, माजी नगरसेवक मुशीर सय्यद, आनंद सोनवणे, शरद काळे, संकेत आहिरे, विशाल सोनवणे, आकाश कोळे, अख्तर शेख, राहुल काळे तसेच सिध्दार्थ मित्र मंडळ, भीम-ए-क्रांती मित्र मंडळ, भीम-ए-कोहिनूर मित्र मंडळ यांचा समावेश आहे. सारडा सर्कल येथे आकर्षक विद्युत रोषणाई करून वडाळानाकापर्यंत रोषणाई करण्यात आली आहे. दरम्यान गंजमाळ शहर बसस्थानक ते शालिमार सिग्नलदरम्यान मोठ्या प्रमाणावर विविध मित्र मंडळे, सामाजिक संस्था व विविध राजकीय पक्षांकडून मोठमोठी बॅनर्स लावण्यात आली आहेत. या भागात रस्त्याच्या दुभाजकांमध्ये देखील मोठ्या कुशलतेने बॅनर्स लावण्यात आली आहेत. याशिवाय रस्त्याच्या दुतर्फा अनेक बॅनर्स लावण्यात आल्याने येथून मार्गक्रमण करताना वेगळाच अनुभव येत आहे. अनेक वेळा आपण शहरातील कोणत्या भागातून जात आहोत, याचा थोडा वेळ विसर पडत असल्याचे अनुभव काही वाहनचालकांनी बोलून दाखविले आहे. याचबरोबर मोठा राजवाडा, वडाळानाका, रेणुकानगर कॉर्नर, द्वारका सर्कल, सारडा सर्कल, चौक मंडई, महात्मा फुले मार्केट, देवळाली नाका, मुंबई-आग्रा महामार्गावरील वडाळा नाका, मुंबई नाका, गडकरी चौक आदी भागात बॅनर्स लावण्यात आले आहेत.



## सामाजिक समता सप्ताहानिमित्त समाजकल्याणची स्वच्छता मोहीम

**नाशिक : प्रतिनिधी**

समाजकल्याण विभागामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह राबविण्यात येत असून, त्या अंतर्गत विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. दि. १३ रोजी सकाळी ९ वाजता समतानगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून स्वच्छता मोहिमेला प्रारंभ करण्यात आला होता. समतानगर, टाकळी परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

स्थानिक रहिवासी, सामाजिक कार्यकर्ते आकाश साळवे व इतर स्थानिक नागरिकांनी सहभाग घेतला. समतानगर परिसर स्वच्छता मोहीम नंतर समाजकल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन परिसरात देखील साफसफाई मोहीम राबविण्यात आली. यावेळी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण देवीदास नांदगावकर, कार्यालय अधीक्षक अनिल तिदमे, समाजकल्याण निरीक्षक लक्ष्मीकांत पाटील यांच्यासह समाजकल्याण कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, समतादूत व क्रिस्टल कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सामाजिक समता सप्ताहानिमित्त ज्येष्ठ नागरिक मंडळ, सिडको यांच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास जिल्हा ज्येष्ठ नागरिक व सनियंत्रण समितीचे सदस्य चकोर, दीपमाला सोनार व शांतीलाल सावकार इत्यादींसह स्थानिक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. सामाजिक समता सप्ताहाचा समारोप सकाळी ११ वाजता सामाजिक न्याय भवन येथे होणार आहे. कार्यक्रमाप्रसंगी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग देवीदास नांदगावकर यांनी केले आहे.

## दि ओझर मर्चंट्स को-ऑप. बँकेला १ कोटी ८७ लाखांचा नफा

### अध्यक्ष राजेंद्र शिंदे यांची माहिती

**दिक्षी : वार्ताहर**

निफाड तालुक्यातील प्रमुख अर्थवाहिनी असलेल्या दि ओझर मर्चंट्स को-ऑप. बँक लि., ओझर (तांबट) या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात १ कोटी ८७ लाख इतका ढोबळ नफा झालेला असून, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निकषानुसार रु. ९८ लाख ९९ हजार इतक्या रकमेच्या तरतुदी करून निव्वळ नफा ८७ लाख ८४ हजार इतका झाल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष राजेंद्र शिंदे यांनी दिली. बँकेच्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस बोलवण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत अध्यक्ष राजेंद्र शिंदे बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष प्रवीण लड्डा, जनसंपर्क संचालिका मंगलाताई कदम व सर्व संचालक उपस्थित होते.

बँकेची स्थिती विशद करताना शिंदे म्हणाले की, २०२४-२५ या आर्थिक वर्षात बँकेच्या ठेवी ११८ कोटी ७२ लाख इतक्या झालेल्या आहे. तसेच कर्ज वाटप ७५ कोटी ८० लाख झालेले असून, सी.डी. रेशो ६३.८५% आहे. बँकेच्या एकूण व्यवसायात मागील वर्षाच्या तुलनेत ८ कोटी ८९ लाख रुपयांनी वाढ होऊन बँकेचा एकूण व्यवसाय १९४ कोटी ५२ लाख इतका झालेला आहे. बँकेची अ वर्ग सभासद संख्या १०७११ असून, वसूल भाग भांडवल ४ कोटी ७ लाख इतके आहे. स्वनिधी २० कोटी ४७ लाख असून, गुंतवणूक ६१ कोटी ४० लाख इतकी आहे. बँकेच्या सद्यस्थिती मुख्य कार्यालयासह एकूण ७ शाखा व १ विस्तारीत कक्षासह बँकेचे कामकाज



राजेंद्र शिंदे अध्यक्ष | प्रवीण लड्डा उपाध्यक्ष | मंगला कदम संचालिका

चालू आहे. बँकेच्या व्यवसायात वाढ होणेसाठी संचालक मंडळ, अधिकारी सेवक प्रयत्नशील आहेत.

चालू वर्षी बँकेचा नेट एन.पी.ए. ४.३८% इतका खाली आलेला असून, मागील वर्षापेक्षा तो २.५३% नी कमी झालेला आहे. चालू वर्षी एन.पी.ए. कमी करण्यासाठी संचालक मंडळ सुरुवातीपासूनच कसोशीने प्रयत्नशील राहणार आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष राजेंद्र शिंदे, उपाध्यक्ष प्रवीण लड्डा, जनसंपर्क संचालिका सौ. मंगलाताई कदम, संचालक सर्वश्री भालचंद्र कासार, रविंद्र भट्टड, विजय शिंदे, भारत पल्हाळ, लक्ष्मण सोनवणे, नंदलाल चोपडा, योगेश चांडक, प्रवीण वाघ, रऊफ पटेल, शरद सिन्नरकर, निळकंठ कदम, श्रीकांत कदम, गणेश बोरस्ते, जिजाबाई रास्कर, डॉ. मेघा पाटील, ज्योती भट्टड, कार्यलक्षी संचालक अरुण पवार, तज्ज्ञ संचालक रोहनकुमार गंगवाल, भूषण जाजू, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्ष संदीप अक्कर सदस्य नवनाथ मंडलिक ॲड भारत आहेर (प्र). मुख्य कार्यकारी अधिकारी शरद वालझाडे, महाव्यवस्थापक दिनकर पुंड, मनसुखलाल छाजेड व इतर अधिकारी व सेवक वर्ग उपस्थित होते.

## मविप्र माजी विद्यार्थी संघटनेच्या उपक्रमाला प्रतिसाद

**नाशिक :** मविप्र माजी विद्यार्थी संघटना व नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई यांच्या सहकार्याने भ्रमणशील विज्ञान प्रयोगशाळा त्र्यंबकेश्वर तालुक्यातील काचुर्ली येथील मविप्र समाजाच्या आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या भेटीला आली होती.

यावेळी या प्रयोगशाळेत विविध प्रकारचे २० प्रयोग-प्रात्यक्षिके -प्रतिकृती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बघायला तसेच अनुभवायला मिळाल्या.

प्रत्यक्ष प्रतिकृती हाताळताना विद्यार्थ्यांना कुतूहल निर्माण होऊन कृतीचा आनंद होत होता. यावेळी विविध प्रात्यक्षिकांतील वैज्ञानिक तत्त्वे विद्यार्थ्यांना स्पष्ट करण्यात आले. तसेच काही विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत प्रयोगांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

# संविधानापुढे कुणीही लहान-मोठे नाही, सर्व समान आहेत : डॉ. रमेश पांडव

**इंदिरानगर : वार्ताहर**

संविधानापुढे कुणीही लहान -मोठे नाही, सर्व समान असल्याचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त समरसता गतिविधी, इंदिरानगर गट, नाशिक यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या विषयावर बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अभ्यासक डॉ. रमेश पांडव यांनी गौरवोद्गार काढले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिकमधील सामाजिक कार्यकर्ते रमेश साळवे होते. कार्यक्रमात पुढे बोलताना डॉ.पांडव म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेबांनी संविधान निर्मिती करताना, समाजातील सर्व घटकांचा विचार केला होता. त्यामुळे संविधानापुढे सर्वजण समान आहेत. तसेच संविधानिक मूल्यांची स्पष्टता दिली.

तसेच संविधानाचा अभ्यास समाजातील सर्व घटकांनी खोलवर केला पाहिजे, असेही ते म्हणाले. प्रत्येकाच्या घरात संविधान असले पाहिजे आणि त्याचा अभ्यास झाला पाहिजे, असेही मत त्यांनी व्यक्त केले. संविधान हे समाजाला एकत्र ठेवण्यासाठी महत्त्वाचे ठरते. अध्यक्षीय भाषणात रमेश साळवे यांनी संविधान निर्मितीतील डॉ. बाबासाहेबांची भूमिका स्पष्ट केली. सदर कार्यक्रमाप्रसंगी नाशिक शहरातील समाजकार्यात सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. त्यात अनिल निरभवणे, तुलसी मरसाळे, भीमराव मरसाळे, विनोद भडांगे, मोहिते, हर्षद बुचुडे, नयन शेजवळ, शरद काळे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाप्रसंगी मंचावर समरसता गतिविधीचे इंदिरानगर गटसंयोजक जयभारत यरमल उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिरुद्ध जोशी यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. मृणाल राजगुरू यांनी केले. कार्यक्रमाचा शेवट बुद्धवंदनेने झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शहरातील समरसता गतिविधीच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.



## इंदिरानगर कलानगर चौकात बसथांबा नसल्याने विद्यार्थी, प्रवासी त्रस्त

**नाशिक : प्रतिनिधी**

वडाळा ते पाथर्डी रस्त्यावरील कलानगर चौकात बसथांब्याअभावी भरउन्हात विद्यार्थी व प्रवाशांना उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. असुविधेमुळे विद्यार्थी, प्रवाशांची गैरसोय होत असून, तातडीने बसथांब्याची व्यवस्था करण्याची मागणी त्रस्त नागरिकांनी केली आहे.

कलानगर परिसरातून माध्यमिक व महाविद्यालय शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने रोज ये-जा करतात. नोकरदारसुद्धा रोज शहरात ये-जा करतात. त्यासाठी सिटीलिंक बससेवेचा पर्याय परवडणारा असल्याने मोठ्या संख्येने सिटीलिंकला मागणी आहे. मात्र, कलानगर सिग्नललगत शहरात जाताना बसथांबा करण्यात आला होता. एक वर्षापूर्वी दुरवस्था झाल्याचे कारण दाखवून हा बसथांबा कोणातरी राजकीय नेत्याच्या आदेशाने बांधकामाचा शो जातो म्हणून काढण्यात आला आहे.

परंतु, अद्यापपर्यंत नवीन बसथांबा उभारण्यात आला नसल्याने प्रवाशांना भरउन्हात ताटकळत उभे राहावे लागत आहे.

शिवाय, बसथांबाच नसल्याने पाथर्डी गावाकडून येणाऱ्या बसेस सुसाट निघून जातात आणि प्रवासी, विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याच्या प्रवाशांच्या तक्रारी आहेत.

## महत्वाचे



### महावीर इंटरनॅशनलची झोन कॉन्फरन्स उत्साहात

**नाशिक :** महावीर इंटरनॅशनल रीजन-८ अंतर्गत मुंबई झोनची कॉन्फरन्स गरवारे क्लब येथे यशस्वीरीत्या पार पडली. चेअरपर्सन वीरा सुमनजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. मुंबई झोनच्या सर्व ९ सक्रिय शाखांनी यात भाग घेतला. या भव्य कॉन्फरन्समध्ये आंतरराष्ट्रीय अध्यक्ष सीए अनिल जैन, के. के. टाटेड, माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष आर. एस. कुमट, शांतिलालजी कंवाड, विजय बाफना आणि माजी आंतरराष्ट्रीय महासचिव नवरतनजी पारख अशा अनेक वरिष्ठ आणि प्रेरणादायी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली. या कॉन्फरन्सला मंगल प्रभात लोढा प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी झोन सेक्रेटरी दलपत राज जैन, कोषाध्यक्ष नरेश संघवी, मुंबई शाखा चेअरमन घनश्यामजी मोदी, राजेंद्र सिंघवी, रिकब बोथरा, अशोक मेहता, माणक मेहता, वर्षा बैद, रितेश पोरवाल, लुब्धा पोरवाल, सचिन सिंघवी, विपुल जानी, नवी मुंबईचे बलवंत चोरडिया, वीर मनीष जैन, वीर डी. सी. सुराणा, प्रेमचंदजी गोलीया यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात माजी झोन अध्यक्ष वीर नवरतन पारख, वीर डॉ. नेमिचंद छाजेड, वीर किशोर खाबिया, वीर सतीश सुराणा यांचीही उपस्थिती होती. सूत्रसंचालन बाबूलाल बाफना यांनी केले.

### खिदमत-ए-खल्ककडून रोजगार प्रशिक्षण



**जुने नाशिक :** येथील खिदमत-ए-खल्क मूव्हमेंट कमिटीकडून महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरण करण्याकरिता तसेच सर्व समाजातील निराधार, गोरगरीब, होतकरू व गरजू महिला व युवतींना रोजगार व स्वयंरोजगार मिळावे, यासाठी विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण व उपक्रम राबविले जात आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे तीस महिलांना नुकतेच रोजगार उभे करून देण्यात आले. तसेच चोवीस महिलांना लेडिज टेलरिंग व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. जस्मिन बेग, रहेनुमा उर्दू शाळेचे मुख्याध्यापिका शिरीन सय्यद, मोटिव्हेशनल स्पीकर नाजनीन खान व इतर उपस्थित होते. दरम्यान, ज्येष्ठ धर्मगुरू तथा ऑल इंडिया सुन्नी जामिअतुल उलेमाचे अध्यक्ष मौलाना मोईनमिया अशरफी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कमिटी कार्यरत असून, कमिटीच्या माध्यमातून महिला व युवतींना कुटुंबाचा सांभाळ करून स्वत:च्या मेहनतीने आर्थिक पाठबळ प्राप्त करून देण्यासाठी मार्गदर्शन करून त्यांच्या समस्या व अडीअडचणी सोडविण्याचे काम सुरू आहे. लेडिज टेलरिंग व फॅशन डिझायनिंगचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या निराधार, गोरगरीब, होतकरू व गरजू महिला व युवतींना प्रमाणपत्र व स्वयंरोजगारासाठी कमिटीतर्फे मोफत शिलाई मशीन देण्यात येत आहे, अशी माहिती कमिटीकडून देण्यात आली आहे. येथील बागवानपुरा परिसरातील रजा पार्कमधील कमिटीच्या सेंटरवर लेडिज टेलरिंग व फॅशन डिझायनिंग कोर्सचे मोफत प्रशिक्षणासाठी नाव नोंदणीस सुरवात झाली असून, इच्छुकांनी तत्काळ नावनोंदणी करावी. यासाठी पासपोर्ट साइज फोटो, दहावी पास प्रमाणपत्र व आधार कार्डाची झेरॉक्स सोबत आणावी, असे आवाहन कमिटीकडून करण्यात आले आहे.

### मनमाडला इंदूर-पुणे महामार्गात बदल

**मनमाड :** भारतातील नंबर तीनची भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



जयंती ही मनमाड शहरात साजरी केली जाते. यानिमित्ताने देशभरातून लोक आंबेडकर जयंतीचा जल्लोष बघण्यासाठी येतात. याशिवाय शहरातून जाणाऱ्या इंदूर-पुणे महामार्गावरून मोठ्या प्रमाणावर चित्ररथ व मिरवणूक येतात. यामुळे वाहतूक कोंडी होऊ नये व कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये म्हणून या महामार्गावर येणारी वाहतूक ही दिनांक १४ एप्रिल सकाळी ११ वाजेपासून वळवण्यात आली असल्याची माहिती मनमाड शहर पोलीस निरीक्षक विजय करे यांनी दिली. याबाबत सविस्तर माहिती अशी की, मनमाड शहर हे आंबेडकर चळवळीचे माहेरघर आहे. या शहराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोठा इतिहास लाभला आहे. यामुळे या शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. देशभरातील लोक हा उत्सव बघण्यासाठी शहरात येतात. यामुळे शहरातून जाणाऱ्या इंदूर-पुणे महामार्गावर मोठ्या प्रमाणावर भीमसैनिक असतात. यामुळे या महामार्गावर अहिल्यानगर येथून येणारी वाहतूक ही येवला येथून विंचूर-लासलगाव-चांदवड मार्गे मालेगावकडे वळवण्यात आली आहे तर धुळे, इतर ठिकाणांहून येणारी वाहतूक ही मालेगाव, चांदवड, लासलगाव, विंचूर, येवला मार्गे वळवण्यात आली आहे. दिनांक १४ एप्रिल सकाळी ११ ते १५ एप्रिलपर्यंत हा महामार्ग बंद असेल, अशी माहिती पोलिस निरीक्षक विजय करे यांनी दिली.

### सरपंचपद आरक्षणासाठी २१ रोजी बैठक

**निफाड :** निफाड तालुक्यातील ५ मार्च २०२५ ते ४ मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या सर्व ११७ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली २१ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, रसलपूर शिवार, निफाड येथे बैठक हॉलमध्ये बैठक आयोजित करण्यात आलेली आहे, अशी माहिती तहसीलदार कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे. तत्राप ५ मार्च २०२० ते ४ मार्च २०२५ या कालावधीतील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींकरिता माहे जानेवारी २०२५ मध्ये सरपंच आरक्षण काढण्यात आलेले आहे. त्यानुसार निफाड तालुक्यातील एकूण ३२ ग्रामपंचायतींच्या निवडणुका या आरक्षणानुसार झालेल्या नाहीत. त्यामुळे ते आरक्षण कायम ठेवून उर्वरित ग्रामपंचायतीचे आरक्षण काढण्यात येणार आहे. तसेच तालुकानिहाय ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण निश्चित झाल्यानंतर (३२ ग्रामपंचायतींचे आरक्षण कायम ठेवून) उपविभागीय अधिकारी निफाड यांच्या अध्यक्षतेखाली महिलांसाठीचे सरपंच आरक्षण सोडत दि.२३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, रसलपुर शिवार निफाड येथिल बैठक हॉल (वरचा मजला) येथे येथे बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. तरी तालुक्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य/पदाधिकारी तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच/सदस्य व ग्रामस्थ यांनी वरील दोन्ही बैठकीस उपस्थित राहावे.

## निधन वार्ता

### नंदा तुपकरी

**येवला :** येथील नंदा रवींद्र तुपकरी (६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. येवला नगरपालिकेचे माजी नगरसेवक रवींद्रआप्पा तुपकरी यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

# जामुंडा-धारवाडी शिवारात अज्ञातांकडून पोलिसांना झालेल्या मारहाणप्रकरणी पोलीस ॲक्शन मोडवर

## पाच आरोपी ताब्यात घेत उर्वरित आरोपींचा शोध सुरू

**इगतपुरी : प्रतिनिधी**

पोलिसांना मारहाण करणे महागात पडले असून, आत्तापर्यंत ५ आरोपींना अटक केली असून, उर्वरित आरोपींचा इगतपुरी पोलीस पथकाकडून शोध घेतला जात आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, ३० मार्च रोजी इगतपुरी तालुक्यातील जामुंडे परिसरातील धारवाडी येथे पोलीस तपासासाठी गेले असता, अज्ञात जमावाने पोलिसांचे कपडे फाडत त्यांना जमावाने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली होती. धामडकी येथील भावली धारवाडी येथील २८ मार्च रोजी बेपत्ता असलेला तरुण भाऊ सखाराम दरवडे, वय १८ वर्षे, रा. धारवाडी हा भावली धारवाडी शिवारात आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन मयत अवस्थेत आढळून आला होता. मयताचा घातपात झाल्याच्या संशयावरून परिसरात वातावरण निर्माण झाले असता, घटनास्थळी पोलीस पथक तपासासाठी गेले असता तेथे जमलेल्या अज्ञात जमावाने पोलिसांच्या तपासात अडथळा निर्माण करून तपासातील सहायक पोलीस उपनिरीक्षक रामदास जाधव व सहकारी पोलीस यांना जमावातील लोकांनी शिवीगाळ करीत लाथाबुक्क्यांनी व काठी-दगड मारीत शर्ट फाडून हाताच्या चापटींनी मारझोड केली होती.

या प्रकरणी ३७ अज्ञात व्यक्तींवर इगतपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचे चित्रिकरण सोशल मीडियावर पसरताच पोलिसांनी शूटिंगचा आधार घेत जमावातील आरोपींचा शोध घेत असताना पोलिसांना मारहाण करणाऱ्या पाच आरोपींची चौकशी करून इगतपुरी न्यायालयात हजर केले असता, या पोलिसांना मारहाण करणारे पाच आरोपी भाऊ तुळशीराम दरवडे, वय ५२ वर्षे, व्यवसाय शेती, संतोष उर्फ कमळू भाऊ दरवडे, वय २५ वर्षे, धर्मा भाऊ दरवडे, वय ३१ वर्षे, पंढरीनाथ जीवन आगविले, वय ४० वर्षे, राजू पंढरीनाथ आगविले, वय २० वर्षे, सर्व रा. धारवाडी या आरोपींना न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कस्टडी दिली होती.

पाच दिवसांची पोलीस कस्टडी संपल्यावर त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्यानंतर त्यांची जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली. या आरोपींकडून पोलिसांवर हल्ला करणाऱ्या जमावातील आणखी काही आरोपींची नावे समोर येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक राहुल तसरे यांनी दिली.

या घटनेमुळे तालुक्यातील जामुंडा, धारगाव, भावली परिसरात शुकशुकाट दिसत असून, अनेक सामाजिक, धार्मिक, लग्नसोहळे आदी कार्यक्रमांत नातेवाईक व ग्रामस्थ नसल्याने गाव ओसाड झालेले पहावयास मिळत आहे.

पोलिसांना मारझोड करणे महागात पडले असून, पोलिसांच्या तपासात जमावातील उर्वरित आरोपींचा कसून तपास सुरू असून, या घटनेत पोलीस उपअधीक्षक हरीश खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल तसरे यांच्यासह पोलीस पथक करीत आहेत.



## आडगाव येथे एसएनएफच्या ३३ व्या जलप्रकल्पाचे लोकार्पण!

**दिंडोरी : प्रतिनिधी**

ग्रामीण व अतिदुर्गम भागातील आरोग्य, शिक्षण, पाणी व रोजगार या प्रमुख नागरी गरजांवर काम करणाऱ्या सोशल नेटवर्किंग फोरम या संस्थेच्या माध्यमातून पेठ तालुक्यातील आडगाव (भू) येथे एसएनएफ ३३ व्या जलप्रकल्पाचे लोकार्पण उत्साहपूर्ण झाले.

प्रारंभी गावाच्या वेशीवरून पारंपरिक नृत्याच्या गजरात गावातून मिरवणूक काढण्यात आली. मनपाचे निवृत्त आयुक्त जीवन सोनवणे, ॲस्ट्रल फाउंडेशनचे अनिकेत धुरी यांनी शेकडो महिलांच्या उपस्थितीत लोकार्पण केले. या लोकार्पणाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील ३३ व्या दुर्गम गावात एसएनएफने पाण्याची कायमस्वरूपी सोय केली. समन्वयक रामदास शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

याप्रसंगी जीवन सोनवणे, अनिकेत धुरी, सरपंच रेखा गावित, एसएनएफचे अध्यक्ष प्रमोद गायकवाड, प्रशांत बच्छाव, विजय भरसट, रामदास शिंदे, जयदिप गायकवाड, राहूल गाडगीळ, व्यवस्थापक संदिप डगळे, प्रमिला भांगरे, रामदास गवे , रामा जाधव, शिवराम गवे, तुकाराम वाघमारे, तुकाराम बागुल, हरी खुरकुटे आदी उपस्थित होते.

**ॲस्ट्रल फाउंडेशनने जपली सामाजिकता!**

सोशल नेटवर्किंग फोरमच्या सामाजिक कार्यात ॲस्ट्रल फाउंडेशनने सतत योगदान देऊन सामाजिकता जपली असून, पेठ–त्र्यंबकेश्वर –सुरगाणा यांसारख्या अतिदुर्गम भागतील गावांना पिण्याचे पाणी व अभ्यासिका सुरू करण्यासाठी सातत्याने आर्थिक मदत पुरवल्याने हजारो महिला व तरुणांच्या आयुष्यात आनंद पेरल्याचे दिसून येते.

## अंदरसूल अर्बन बँकेस एक कोटी पन्नास लाखांचा नफा

**येवला : प्रतिनिधी**

अंदरसूल येथील अंदरसूल अर्बन को. ऑप. बँक लि. अंदरसूल बँकेस सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात १ कोटी ५० लाखांचा ढोबळ नफा झाला असून, बँकेने नेट एनपीए ५.३३ टक्के राखण्यात यश मिळविले असल्याची माहिती अंदरसूल अर्बन बँकेचे चेअरमन ॲड. भरतकुमार शहा यांनी दिली.

अंदरसूल बँकेस सर्व तरतुदी वजा जाता रुपये ६८ लाख ३६ हजार निव्वळ नफा झाला आहे. बँकेचे वसूल भागभांडवल ६ कोटी ५८ लाख ६४ हजार रुपये रिझर्व्ह व इतर निधी १२ कोटी २६ लाख ८० हजार असून, ठेवी रु. ९२ कोटी ४१ लाख ६९ हजार तर गुंतवणूक रुपये २८ कोटी १७ लाख ६६ हजार रुपये असून, सभासदांना रुपये ५१ कोटी ४९ लाख ६१ हजारांचे कर्ज वाटप केले आहे. बँकेचा सी.डी. रेशो ५५.७२% इतका आहे व संमिश्र व्यवसाय रु. १४३ कोटी ९१ लाख ३० हजार इतका आहे. तसेच खेळते भांडवल रु. ११४ कोटी ६४ लाख २१ हजार इतके आहे. बँकेला अधिक नफा झाल्याबद्दल अर्बन बँकेचे व्हा. चेअरमन अभिजित अट्टल, कार्यकारी संचालक अमोल सोनवणे, संचालक मकरंद सोनवणे, प्रदीपचंद्र गुजराथी, रमेश करवा, कैलास परदेशी, डॉ. किरण पहिलवान, सीए राजेश जाखोटिया, सीए राजेंद्र आहेर, अशोक एंडाईत आदींनी अभिनंदन केले आहे.

## मोतीवाला महाविद्यालयात होमिओपॅथी दिन उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

होमिओपॅथी प्रणालीचे प्रणेते डॉ. सॅम्युअल हॅनेमॅन यांच्या जयंतीनिमित्त मोतीवाला होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक होमिओपॅथी दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एफ. एफ. मोतीवाला, ट्रस्टी डॉ. सहार मोतीवाला सिंह, उपप्राचार्य डॉ. मिता घरटे, तसेच ट्रस्टी कर्नल राकेश चड्डा यांच्यासह सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग आणि सुमारे ६०० विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व डॉ. हॅनेमॅन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पारंपरिक व भक्तिभावाने करण्यात आली. यावेळी होमिओपॅथी संशोधनावर आधारित माहितीपूर्ण चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. प्राचार्य डॉ. एफ. एफ. मोतीवाला यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना संशोधनात्मक विचारशैली अंगीकारण्याचे महत्त्व विशद केले. तसेच, महाविद्यालयामध्ये संशोधनासाठी अत्याधुनिक व सर्वसमावेशक सुविधा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रमात मेडिसिन विभागाचे प्रा. डॉ. तपस कुंडू यांनी मार्गदर्शन केले.

गंगापूर रोड, इंदिरानगर यांसारख्या परिसरात मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यासोबतच नामवंत तज्ज्ञांचे वेबिनार, शैक्षणिक कार्यशाळा आणि माहितीपटांचे सादरीकरण यामुळे विद्यार्थ्यांना होमिओपॅथीच्या सखोल आणि वैज्ञानिक ज्ञानाची समृद्ध देण मिळाली. या सप्ताहाचे यशस्वी आयोजन करण्यामध्ये ऑर्गनॉन विभागाच्या डॉ. गायत्री निंभोरे, डॉ. स्वाती पाटील, डॉ. शिवानी पाटील, मटेरिया मेडिका विभागाचे डॉ. सोनाली रोहम, डॉ. अंकिता थेटे,रिपर्टरी विभागाचे डॉ. विशाल निंभोरे, डॉ. अदिती शिंदे यांचे योगदान उल्लेखनीय ठरले.

## नाशिक येथे एकदिवसीय आयसीटी मार्गदर्शन कार्यशाळा

### जिल्ह्यातील ४७१ शाळांमध्ये संगणक प्रशिक्षण

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई आणि स्किल ट्री कन्सल्टिंग लिमिटेड यांच्या वतीने नाशिक विभागातील धुळे, जळगाव, नंदुरबार, अहिल्यानगर आणि नाशिक या सर्व जिल्ह्यांतील ४७१ शाळांमधील जवळपास २६० संगणक प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी नाशिक येथे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन आयसीटी स्टेट प्रोजेक्ट हेड राफिया रेशी यांच्या हस्ते झाले.

या प्रशिक्षण शिबिरास जामनेर पंचायत समितीतील संभाजी हावडे, नाशिक व अमरावती विभागप्रमुख अजित धसाडे, पुणे विभागप्रमुख सुबोध नांदेश्वर, सेंट्रल ऑपरेशन हेड सचिन पताडे आणि नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हा समन्वयक, तालुका समन्वयक आणि सर्व संगणक प्रशिक्षक उपस्थित होते.

समग्र शिक्षांतर्गत ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्व मुलांना संगणक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम हाती घेतलेला आहे. दैनंदिन अध्यापनात संगणक विषयाचे अध्यापन, प्रशिक्षकांची शाळेतील भूमिका आणि जबाबदारी काय असावी, आयसीटी पोर्टलचा वापर करून मुलांना डिजिटल कन्टेन्टच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञानाची ओळख याबद्दल राफिया रेशी यांनी मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थीही मागे न राहता कशा पद्धतीने संगणक शिक्षणाच्या माध्यमातून आपला विकास करू शकतो याबद्दल अजित धसाडे यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षकांनी आपण मिळवलेल्या तांत्रिक ज्ञानाचा उपयोग मुलांना कसा करून देता येईल व प्रत्येक विद्यार्थी संगणक साक्षर कसा होईल, यावर भर देण्याचे या कार्यशाळेत सांगण्यात आले.

यावेळी वर्षभरात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



## भक्तिगीतांच्या सुरेल मैफलीतून हनुमान जन्मोत्सव

**नाशिक : प्रतिनिधी**

हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात सगळीकडे पार पडला. राजीवनगरमधील एकवीरा इलेक्ट्रिकल आणि सिद्धकला वाद्यवृंद तेजस कन्सारा यांच्या वतीने राजीवनगर टाउनशिपमध्ये हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी तेजस कंसारा प्रस्तुत सिद्धकला वाद्यवृंदाने 'अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान' ही भक्तिगीतांची सुरेल मैफल सादर केली.

कार्यक्रमाची सुरुवात हनुमान चालिसा पठणाने करण्यात आली. अवध मे राम आये है, नादातुनी या नाद निर्मितो, अच्युतम केशवम, श्रीराम चंद्र कृपाळू भज मन, मेरे झोपडी के भाग, अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान, कुणी लंका जाळली, भगवा रंग, बघ उघडूनी दार, अंबाबाई लाड लाड ये ग, गार डोंगराची हवा, भारत का बच्चा बच्चा, शिवरायांची घाटोळी, शिवरायांची आरती ही गाणी सादर करण्यात आली. गायक कृष्णा जाधव, राम इंगळे यांनी सुरेल आवाजात गाणी सादर केली. गायिका भक्ती नांदुर्डीकर, प्रांजल महालपुरे यांनी सुरेल आवाजात अभंग, भजन सादर केले. या कार्यक्रमाची संकल्पना तेजस कंसारा यांची होती तर खुशाल आणि माधव बिरारी यांनी आयोजन केले होते. देवानंद बिरारी यांचे मार्गदर्शन लाभले. तबल्याची साथ तेजस कंसारा, पखवाज देवेंद्र दाणी, बासरी शुभम बागुल, ढोलकी निखिल शिरसाठ, तालवाद्य सागर मोरस्कर, कीबोर्ड अतुल गांगुर्डे, ऑक्टोपॅड शशी निकम यांनी केली.

# शिवसेनेच्या दोनच अधिकृत कामगार संघटना : जेरीभाई डेव्हिड

**नाशिक : प्रतिनिधी**

शिवसेना पक्षवाढीसाठी शोषित कामगार वर्गासाठी, त्यांच्या न्याय्यहक्कासाठी महाराष्ट्रातील युती सरकार विविध योजना राबवण्यात आहेत या विषयाची महत्त्वाची माहिती सर्व स्तरावरील कामगारांना देणे व त्यांना माहीत होणे गरजेचे आहे. कामगारांनी फक्त संघटना उभारणे, शाखा उघडणे हेच काम नसून, कामगारांच्या समस्या जाणून, त्यावर योग्य उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत महाराष्ट्र राज्य कामगार सेना अध्यक्ष जेरीभाई डेव्हिड यांनी सांगितले. तसेच शिवसेनेच्या दोनच अधिकृत कामगार संघटना असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.



शिवसेनेची अधिकृत कामगार संघटना - महाराष्ट्र राज्य कामगार सेना अध्यक्ष जेरीभाई डेव्हिड यांच्या उपस्थितीत शिवसेना नाशिक जिल्हा पदाधिकारी यांची महत्त्वाची शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर - जिल्हा, मायको सर्कल येथे झाली. सर्व मान्यवर प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये जेरीभाई डेव्हिड यांचा नाशिक शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना उपनेते, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, माजी खा. हेमंत गोडसे, नाशिक लोकसभा संपर्कप्रमुख, निरीक्षक जयंत साठे, सहसंपर्कप्रमुख राजाभाऊ सोनवणे, जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे, अनिल ढिकले, लोकसभा संघटक योगेश म्हस्के, उपजिल्हाप्रमुख शिवाजी भोर, दिगंबर मोगरे, प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, शशिकांत कोठुळे, महेश जोशी, सुदाम डेमसे, विधानसभा प्रमुख प्रताप मेहरोलिया, विनायक आढाव, रोशन शिंदे, जीवन दिघोळे, उपमहानगरप्रमुख सुधाकर जाधव, आनंद फरताळे, उमेश चव्हाण, सचिन दीक्षित, शिवा ताकाटे, सचिन दीक्षित, युवासेना जिल्हाप्रमुख रूपेश पालकर, सदानंद नवले, आदित्य बोरस्ते, विशाल खैरनार, भिवानंद काळे, सनी रोकडे, प्रकाश सोनवणे, नितीन देशमुख, नगरसेवक जॉय कांबळे, भागवत आरोटे, दीपक दातीर, अमोल जाधव, श्याम खोले, नितीन खर्जुल, उत्तम दोंदे, हरीश भडांगे, नगरसेविका रंजना बोराडे, मंदाकिनी जाधव, आकाश पवार, शरदचंद्र नामपूरकर आदी शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेनेच्या कामगारांच्या संबंधात राष्ट्रीय कामगार सेना व महाराष्ट्र राज्य कामगार सेना या दोनच अधिकृत संघटना असल्याचे आवर्जून नमूद केले. नाशिक शहरात सातपूर व अंबड या दोन औद्योगिक वसाहती असून, यातील सर्वाधिक कामगार सिडको, सातपूर परिसरात राहतात. त्यांच्या त्यांचे घरांचे प्रश्न, कामाचे प्रश्न, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न, वैद्यकीय सुविधा या सर्व प्रश्नांची कमागारांकडून घेऊन त्यावर संघटनेच्या माध्यमातून त्वरित उपाययोजना केल्या जातील. महानगरपालिका, महामंडळे, आस्थापना, विविध खासगी व सार्वजनिक कंपन्या, संस्था अशा सर्वच ठिकाणी शिवसेना कामगार सेनेची स्थापन करणार असल्याचे उपनेते जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी सांगितले. कामगारांसाठी कामगार सेनेच्या माध्यमातून ज्यांना संघटनेत निः स्वार्थ काम करायचे आहे अशा प्रतिनिधींची लवकरच संघटनेच्या माध्यमातून लवकरच नेमणूक करण्यात येईल. संघटनेची पदे ही फक्त भूषवण्यसाठी नाही तर प्रसंगी रस्त्यावर येऊन काम करावे लागेल, असे जयंत साठे यांनी सांगितले. कामगारांना त्यांच्या हक्काच्या सुविधा मिळाल्या पाहिजे त्यासाठी शिवसेना सदैव कामगारांसाठी त्यांच्या कल्याणासाठी काम करेल. सरकारच्या माध्यमातून कामगारांसाठी ज्या काही सुविधा राबवण्यात येतात त्या सर्व सुविधांचा लाभ मिळण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने लढू, असे हेमंत गोडसे यांनी सांगितले व संघटनेच्या पुढील कामकाजास शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील प्रामुख्याने सिन्नर औद्योगिक वसाहत व दिंडोरी औद्योगिक वसाहत येथील कामगारांच्या समस्या जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे व अनिल ढिकले यांनी मांडल्या.

तसेच एसटी कर्मचारी संघटनेचे नितीन जगताप, शिक्षक संघटनेचे प्रकाश सोनवणे, युवासेनेचे रूपेश पालकर, वैद्यकीय संघटनेचे योगेश मस्के, सातपूरच्या नगरसेवक भागवत आरोटे, जॉय कांबळे, प्रताप मेहरोलिया, सचिन भोसले यांनी आपल्या क्षेत्रातील कामगारांच्या समस्या व त्यावर उपाययोजना सुचविल्या. तसेच आज क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्ताने शिवसेना नाशिक जिल्ह्याच्या वतीने शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर-जिल्हा येथे अभिवादन करण्यात आले.

## महत्त्वाचे

### मुसळगाव एमआयडीसीच्या कारखान्यातून ४२ हजारांच्या कॉपर स्ट्रीप चोरीला

**सिन्नर :** तालुक्यातील मुसळगाव एमआयडीसीच्या इटरनिस फाइन केमिकल या कारखान्यातून अज्ञात चोरट्यांनी ४२ हजार ८०० रुपयांच्या इ. आर. कॉपर स्ट्रीप व अन्य साहित्य चोरून नेले. याप्रकरणी कंपनीचे कर्मचारी प्रणाम उत्तमराव कांडेकर यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरोधात चोरीची तक्रार दिली आहे. हवालदार गायकवाड अधिक तपास करीत आहेत.

### प्रा. शरद निरगुडे यांना पीएच.डी.

**सिन्नर :** तालुक्यातील पांगरी येथील भूमिपुत्र व नाशिक येथील



भुजबळ नॉलेज सिटी, मेट इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, यंत्र अभियांत्रिकी विभागातील सहाय्यक प्राध्यापक शरद किसन निरगुडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. शरद निरगुडे यांनी विज्ञान व तंत्रज्ञान शाखेच्या यंत्र अभियांत्रिकी विषयात 'ॲनालिसिस ऑफ ॲल्युमिनियम अलॉय अँड कॉपर जॉइंट प्रॉपर्टीस युसिंग अल्ट्रासॉनिक अस्सिस्टेड फ्रिकशन स्टर वेल्डिंग' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. डॉ. शरद निरगुडे यांच्या संशोधनामुळे यंत्र अभियांत्रिकी विषयाच्या अभ्यासक्रमात नव्या दृष्टिकोनाची भर पडली आहे. त्यांच्या या संशोधनासाठी मेट इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, यंत्र अभियांत्रिकी विभागातील विभागप्रमुख डॉ. श्यामकुमार काळपांडे यांनी मार्गदर्शन केले. पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल प्राचार्य डॉ. व्ही. पी. वाणी, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### सागर मुठाळ यांची निवड

**सिन्नर :** सिन्नर तालुका गाव कामगार पोलीसपाटील संघटनेच्या अध्यक्षपदी वडगाव पिंगळा येथील सागर मुठाळ यांची सलग दुसऱ्यांदा निवड झाली आहे. उपाध्यक्षपदी दापूरचे पोलीसपाटील ज्ञानेश्वर साबळे तर सचिवपदी धोंडबारचे पोलीसपाटील चंद्रभान खेताडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सिन्नर तालुका गाव कामगार पोलीसपाटील संघटनेच्या पदाधिकारी निवडीची बैठक नुकतीच सिन्नर येथे पार पडली. या बैठकीत तालुकाध्यक्षपदासाठी वडगाव पिंगळाचे पोलीसपाटील सागर मुठाळ यांच्या नावावर सर्वानुमते शिक्कामोर्तब करण्यात आले. कार्याध्यक्षपदी कैलास ढोले, भाग्यश्री पाटोळे, उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर साबळे, ज्योत्स्ना पानसरे, सचिवपदी चंद्रभान खेताडे, सहसचिव भाऊराव बिन्नर, खजिनदार हेमंत माळी, कार्यकारी अध्यक्षपदी विक्रम भगत, संघटकपदी रामदास वारुंगसे, स्वाती गायकवाड, सुनील चांदोरे, संघटकपदी गुलाबराव, बिन्नर महिला प्रतिनिधी म्हणून सुनंदा शेळके, संगीता काकड, अर्चना भगत यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी संदीप कुटे, संगीता दळवी तर मार्गदर्शक म्हणून शिवाजी पोमनर हे काम बघणार आहेत. नव्याने निवडलेली कार्यकारिणी ही तीन वर्षांसाठी राहणार आहे. निवडीनंतर सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी आणि सदस्यांचा पोलीसपाटील संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### पंचाळे विद्यालयाचे इंग्रजी संभाषण स्पर्धेत यश

**सिन्नर :** तालुक्यातील पंचाळे येथील सिन्नरभूषण सूर्यभानजी गडाख विद्यानिकेतनने लक्ष्मी शैक्षणिक संस्था मुंबई आणि शिवाजी शेंडगे मित्र मंडळ मुंबई यांच्यातर्फे आयोजित राज्यस्तरीय संभाषण स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. मातृभाषेच्या शाळेतसुद्धा आधुनिक सोयीसुविधा आहेत. समाजाला हे दाखवण्याचा उद्देश ठेवून मातृभाषा शाळांसाठी इंग्रजी संभाषण स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत पंचाळे विद्यालयातील इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक दीपक गंगावणे यांचा समाजभूषण नानजीभाई खिमजी ठक्कर, ठाणावाला ज्वेलर्स ऑफ इंडिया अवॉर्ड भारतीय उद्योगरत्न अवॉर्ड, प्राइड ऑफ इंडिया पुरस्कार महाराष्ट्र भूषण अवॉर्ड, इंटरनॅशनल गोल्ड स्टार मिलियन अवार्ड राष्ट्रीय रत्न अवॉर्ड, शिक्षण महर्षी अवॉर्ड यांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. या यशाबद्दल लक्ष्मी शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष सुनील आहेर, माध्यमिक लोकशिक्षण मंडळाचे सेक्रेटरी राजेश गडाख, विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास पवार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक नवनाथ थोरात, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रमुख प्रवीण शेलार, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गडाख व विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे अभिनंदन केले.



### उद्योजक मुकुंद काकड यांचा गौरव

**सिन्नर :** तालुक्यातील ठाणगाव येथील भारत भूषण सांस्कृतिक कला नाट्य संस्थेच्या वतीने ठाणगावचे भूमिपुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे भटक्या विमुक्त आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, उद्योजक मुकुंद काकड यांना महात्मा जोतिबा फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिक येथील महाकवी कालिदास कलामंदिरात कवी, शाहीर बाळासाहेब आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्त या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्राध्यापक रवींद्र कदम, निर्माता दिग्दर्शक सुनील ढगे, अटल फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष रामदास भोर, छत्रपती संभाजीनगर येथील माजी सभापती मारुती साळवे आदी उपस्थित होते. जनसेवा सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून कलाकारांना प्रोत्साहन देण्याचे काम आम्ही नेहमी करत आलो आहोत. इतरही सामाजिक कार्यात संस्थेचा हातखंडा असून, यापुढेही जनसेवेचा वसा अविरत सुरू राहील, अशी ग्वाही भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मुकुंद काकड यांनी सत्काराला उत्तर देताना दिली. भारत भूषण सांस्कृतिक कला नाट्य संस्थेने हा पुरस्कार देऊन आपल्या कार्याची दखल घेतली. या पुरस्कारामुळे सामाजिक कार्याची जबाबदारी आणखी वाढल्याची भावना काकड यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी स्वागत अध्यक्ष भीमसेन साळवे, विनायक आव्हाड, अजित मोमीन, रामनाथ मेंगाळ, दामू मेंगाळ, ज्ञानेश्वर दराडे, राहुल आव्हाड आदींसह भारतभूषण सांस्कृतिक कला नाट्य संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# घरकुल अनुदानात ५० हजारांची वाढ, १५ हजारांच्या अनुदानासाठी सौर यंत्रणा आवश्यक

**सिन्नर : भरत घोटेकर**

**प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या घरकुल लाभार्थ्यांना बांधकामांसाठी दिले जाणारे १ लाख २० हजारांचे अनुदान तुटपुंजे असल्याने शासनाने त्यात ५० हजारांची वाढ केली आहे. त्यातील ३५ हजार रुपये हे बांधकामासाठी तर १५ हजार रुपये अनुदान हे प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून घरावर १ किलोवॅटपर्यंत सौर यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी दिले जाणार आहेत.**



सौरऊर्जा यंत्रणा कार्यान्वित न करणाऱ्या लाभार्थ्यांना १५ हजारांच्या अनुदानाचा लाभ देय राहणार नाही. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ तसेच विविध राज्यपुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टामधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्श्यातून ५० हजार रुपये अतिरिक्त वाढ करण्यास शासनाने ४ एप्रिल २०२५ च्या अध्यादेशान्वये ग्रामविकास विभागाने मान्यता दिली आहे. या ५० हजार रुपये रकमेमधून ३५ हजार रुपये अनुदान हे घरकुल बांधकामासाठी तर १५ हजार रुपये इतके अनुदान हे प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून छतावर १ किलो वॅट मर्यादेपर्यंत सौरऊर्जा यंत्रणा उभारणीकरिता केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाव्यतिरिक्त अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय राहील.

**२०३० पर्यंत साध्य करणार शाश्वत विकास ध्येय**

राज्यात, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व इत्तर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मंजूर उद्दिष्टांकरिता असलेले दायित्व पूर्ण करून यापुढे नव्याने वेगळे उद्दिष्ट देण्यात येणार नाही. प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ ते २०२८-२९ मध्ये प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टांसाठी आवश्यक निधी संबंधित प्रशासकीय विभागाच्या अर्थसंकल्पात तरतूद करून राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ हा कार्यक्रम राबविल्यामुळे राज्यात शाश्वत विकास ध्येय हे सन २०३० पर्यंत साध्य करण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होणार आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून एक किलोवॅट क्षमतेची सौरऊर्जा यंत्रणा घरावर कार्यान्वित करण्यासाठी सुमारे ५० ते ५५ हजार रुपये खर्च येतो. त्यासाठी केंद्र शासनाकडून एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये इतके अनुदान दिले जाते. प्रधानमंत्री आवास योजनेतून त्या व्यतिरिक्त आणखी १५ हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. त्यामुळे दोन्ही मिळून ४५ हजार रुपये इतके अनुदान मिळणार आहे. वरचा १० हजार रुपयांपर्यंतचा खर्च घरकुल लाभार्थ्यांना सोसावा लागणार आहे. मात्र, त्यातून त्यांची कायमस्वरूपी वीजबिलातून मुक्तता होणार आहे.

### असे मिळणार घरकुलासाठी अनुदान

यापूर्वी घरकुल बांधकामासाठी शासनाकडून १ लाख २० हजार रुपये इतके अनुदान दिले जात. याशिवाय त्यात २७ हजार रुपये मजुरीपोटी लाभार्थ्यांना मिळत असे. आता घरकुल बांधकामाच्या अनुदानात ३५ हजारांची वाढ केल्याने १ लाख ५५ हजार रुपये इतके अनुदान मिळेल. एप्रिल २०२५ पासून रोजगार हमीची प्रतिदिन ३१२ रुपये इतकी मजुरी महाराष्ट्रात सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार ९० दिवसांच्या मजुरीचे २८,०८० रुपये लाभार्थ्याच्या खात्यात जमा होईल. तर घरावर सौर यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी १५ हजार रुपयांचे अनुदान दिले जाईल. एकूण १ लाख ९८ हजार रुपये एकत्रित अनुदान घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होईल.

### जिल्ह्यात मोफत ५ ब्रास वाळूची प्रतीक्षा

प्रधानमंत्री आवास योजनेतून नाशिक जिल्ह्यात १ लाख ४५ हजार ७२७ घरकुले मंजूर आहेत. पैकी निम्म्या लाभार्थ्यांना १५ हजारांचा पहिला हप्ता जमा झाल्याने त्यांचे बांधकाम सुरू आहे. पण, मोफत वाळू न मिळाल्याने बांधकामाचे बजेट वाढले आहे. आता राज्य सरकारच्या सुधारित वाळू धोरणांतर्गत मोफत वाळू मिळणार का, जिल्हा प्रशासन त्यासाठी काय उपाययोजना करणार, याची घरकुल लाभार्थ्यांना प्रतीक्षा आहे.

# शहा येथे तडीपार गुंडाकडून घरफोडी

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील शहा येथे तडीपार गुंड प्रवीण उर्फ भैया गोरक्षनाथ कांदळकर याने तीन साथीदारांसह घरफोडी करत घरातील महिलेसह मुलाला मारहाण करून डब्यात ठेवलेली १७ हजारांची रोकड घेऊन पोबारा केल्याची घटना शनिवारी (दि.१२) पहाटे ४ वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी, शहा येथील वैशाली आण्णासाहेब गोराणे (४०) ही महिला व तिचा मुलगा सौरव दोघे घराच्या दरवाडा व खिडकीची आतमधून कडी लावून घरात झोपलेले असताना शनिवारी पहाटे ४ वाजेच्या सुमारास तडीपार गुंड प्रविण उर्फ भैया गोरक्षनाथ कांदळकर हा तिघा साथीदारांसह दोन मोटारसायकलने गोराणे यांच्या घराजवळ आले. हातातील लोखंडी रोडने कांदळकर याने घराचा दरवाजा व खिडकी तोडून आत प्रवेश केला. कांदळकर याने गोराणे यांना झोपेतून उठवून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी मुलगा सौरव मध्ये आला असता त्याच्या डोक्यावर लोखंडी हत्याराने वार करुन जखमी केले.

घरातील सामानाची उचकापाचक करून डब्यात ठेवलेले १७ हजार रुपये काढून घेतले. बाहेर पडण्यापुर्वी गौराणे व मुलगा सौरव यांना शिवीगाळ व दमदाटी करुन बाहेर येण्यास प्रतिबंध केला. बाहेर पाळत ठेलींन असलेल्या दोघांसह त्यांनी मोटारसायकलवरून पोबारा केला.

याप्रकरणी वैशाली गोराणे यांनी वावी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून प्रवीण उर्फ भैया गोरक्षनाथ कांदळकर व ३ अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कोठावळे करीत आहेत.

### मुक्त विद्यापीठात महात्मा फुले जयंती साजरी

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महात्मा जोतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्या पा. संजीवनी महाले आणि संचालक डॉ. रश्मी रानडे यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्याचप्रमाणे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, संचालक डॉ. प्रकाश देशमुख, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र, संचालक डॉ. मधुकर शेवाळे, डॉ. प्रकाश देशमुख, प्र. प्रमुख, ज्ञानस्त्रोत केंद्र डॉ. प्रकाश बर्वे, वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, डॉ. वाय. डी. कलेपवार, विजयकुमार पाईकराव आदी मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिन्नर पालिकेत दीनदयाळ जन आजीविका योजनेची बैठक

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सिन्नर नगरपरिषद कार्यालयात दीनदयाळ जन आजीविका योजना - शहरी अंतर्गत शहर उपजीविका कृती आराखडा (सीएलटीएफ) समितीची बैठक मुख्याधिकारी रितेश बैरागी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा अग्रणी बँक प्रतिनिधी, सामाजिक संस्था प्रतिनिधी, कामगार संघटना, पथ विक्रेता समिती, एकात्मिक बालविकास प्रतिनिधी, तालुका शिक्षणाधिकारी प्रतिनिधी, व्यापारी संघटना प्रतिनिधी, ट्रान्स्पोर्ट संघटना प्रतिनिधी, पुरवठा विभाग प्रतिनिधी तहसील कार्यालय, सिन्नर नगरपरिषद कार्यालयातील सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. शहर अभियान व्यवस्थापक अनिल जाधव यांनी शहरी भागात वास्तव्यास असलेल्या शहरी गरीब नागरिकांना तसेच बांधकाम कामगार, वाहतूक कामगार, घरेलू कामगार, काळजी घेणारे कामगार, गिग कामगार व कचरा वेचक कामगार यांच्यासाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करून देण्यासाठी दीनदयाळ जनआजीविका योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती समितीपुढे सादर केली. तसेच कृती आराखड्याचे वाचन केले. त्यास सर्व समिती सदस्यांनी शहर उपजीविका कृती आराखड्याला मंजुरी दिली.

# सिन्नरला प्रार्थनास्थळ प्रवेशद्वारावर खोडसाळ लिखाण

## अज्ञात समाजकंटकाकडून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न

**सिन्नर : प्रतिनिधी**

शहरातील शिंपीगल्ली परिसरात असलेल्या जामा मशीदच्या संरक्षक भिंतीच्या पत्र्याच्या प्रवेशद्वारावर अज्ञात समाजकंटकाने लाल रंगाने जय हनुमान-जय श्रीराम असे लिहून हिंदू-मुस्लिम समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याची घटना शनिवारी (दि.१२) मध्यरात्री २.१५ ते २.३० च्या सुमारास घडली. याप्रकरणी सिन्नर पोलिसांनी अज्ञात समाजकंटकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सिन्नर शहरात सर्वधर्मसमभाव प्रामुख्याने जपला जातो, राज्यातील इतर शहरांच्या तुलनेत सिन्नर शहरासह तालुक्यातील हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये एकोपा, सामंजस्याची भावना वेळोवेळी दिसून येते. तथापि काही समाजविघातक प्रवृत्तींकडून शहरातील एकोपा नष्ट करून कायदा-सुव्यवस्था बिघडविण्याच्या उद्देशाने शनिवारी मध्यरात्री २.१५ ते २.३० च्या सुमारास शिंपीगल्ली परिसरात असलेल्या जामा मशीदच्या संरक्षक भिंतीच्या पत्र्याच्या प्रवेशद्वारावर अज्ञात समाजकंटकाने लाल रंगाने जय हनुमान-जय श्रीराम असे लिहून हिंदू-मुस्लिम समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर मुस्लिम समाज संघटनेने सिन्नर पोलिस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली.

याप्रकरणी वसीम हुसेन सय्यद, रा. शिंपीगल्ली यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात समाजकंटकाविरोधात भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम २९८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक राठोड करत आहेत. दरम्यान, शहरातील दोन समाजात तेढ निर्माण करून कायदा-सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्याविरोधात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी मुस्लिम समाजबांधवांना दिले असून, शांततेचे आवाहन केले आहे. शहर ए खतिब मुजाहिद खतीब यांनी देखील झालेल्या प्रकाराचा निषेध व्यक्त करत समाजबांधवांनी शांतता राखावी, असे आवाहन केले आहे.

# धोंडवीरनगरला आगळावेगळा संयुक्त जयंती सोहळा

## शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचारमंचतर्फे पुरोगामी विचारवंतांचा गौरव

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील धोंडवीरनगर येथे शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचारमंचच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती सोहळा आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमंत थोरले पेशवे बाजीराव पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायणशेठ वाजे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ नाट्यकर्मी तथा पुरोगामी विचारवंत दत्तात्रय गोर्डे अण्णा, निवृत्त नायब तहसीलदार महामित्र दत्ता वायचळे, प्रा. राजाराम मुंगसे, प्रा. के. आर. वेलजाळी, उद्योजक नारायण शिरसागर, डॉ. सौ. सुजाता लोहारकर, डॉ. भरत गारे, डॉ. विष्णू अत्रे, सी.ए. भारत सोनवणे, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विठ्ठलराजे उगले, इलाही शेख, अरुणशेठ वारुंगसे, हरिभाऊ तांबे, सुभाष कुंभार आदी उपस्थित होते.

युवा नेते उदयभाऊ सांगळे यांच्या हस्ते फुले स्मारकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सायंकाळी सहा वाजेपासून ढोल पथकाच्या गजरात व शालेय विद्यार्थी युवा-युवती यांच्या विविध भारतीय संस्कृतीच्या पेहराव, महामानवांच्या वेशभूषेत मिरवणूक काढण्यात येऊन महात्मा फुले व डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. सायंकाळी सात वाजता युवा- संमेलन, संवाद सत्र व सिन्नर तालुक्यातील महाराष्ट्र पुरोगामी ज्येष्ठ विचारवंतांचा सन्मान सोहळा पार पडला. यात



ज्येष्ठ नाट्यकर्मी तथा पुरोगामी विचारवंत दत्तात्रय गोर्डे अण्णा, निवृत्त नायब तहसीलदार महामित्र दत्ता वायचळे, प्रा. राजाराम मुंगसे, प्रा. के. आर. वेलजाळी यांना सन्मानचिन्ह वृक्ष व पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर संवाद सत्र प्रश्नोत्तराच्या तासाने अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यामध्ये प्रश्नोत्तर स्वरूप होते. श्रुतिका पवार, श्रावणी पवार, प्रगती माळी, संस्कृती पवार, धनश्री पवार, साक्षी पवार, तेजस्विनी पवार, ईश्वरी पवार या युवतींनी विविध प्रश्न विचारले. त्यास उद्योजक नारायण शिरसागर, डॉ. सौ. सुजाता लोहारकर, डॉ. भरत गारे, डॉ. विष्णू अत्रे, सी.ए. भारत सोनवणे यांनी समर्पक उत्तरे देऊन मार्गदर्शन केले. श्रुतिका पवार, भाऊसाहेब पवार, धनश्री पवार, संस्कृती पवार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रास्ताविक स्नेहल पवार यांनी केले तर सूत्रसंचालन प्राध्यापक कृष्णा सोनवणे यांनी केले. यावेळी धोंडवीरनगरमधील शैक्षणिक क्षेत्रात भरारी घेऊन उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तरुणांना सन्मानित करण्यात आले.




## महात्मा फुले यांना अभिवादन

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सिन्नर महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. प्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

अठराव्या शतकातील चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि ज्ञानाच्या दृष्टिकोनातून बहुजनांसाठी अंधकारमय झालेले वातावरण नष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांनी अहोरात्र प्रयत्न केले. भारतीयांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी प्रसंगी समाजकंटकांचा छळ सहन केला.

मराठा विद्या प्रसारक समाज, रयत शिक्षण संस्था यासारख्या अग्रगण्य शिक्षण संस्थांची पायाभरणी महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी विचारांमधूनच झाली असल्याचे प्रतिपादन प्राचार्य पवार यांनी केले. याप्रसंगी प्रा. ए. ए. पोटे, प्रा. एस. टी. पेखळे, डॉ. सी. ई. गुरुळे, कार्यालयीन अधीक्षक के. सी. गोसावी, श्रीमती गडाख, मुकुंद रायते, विरकर, सोनवणे, सुधाकर म्हस्के, पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# भैरवनाथ यात्रोत्सवात २७ वर्षांपासून मोफत चरणसेवा

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर शहराचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराजांच्या यात्रेच्या निमित्ताने शहरातीलच नव्हे तर पंचक्रोशीतील भाविक व परगावी स्थायिक झालेले सिन्नरकर यात्रेच्या निमित्ताने आवर्जून भक्तिभावाने दर्शनाला येत असतात. भाविकांची अलोट गर्दी असल्यामुळे भाविकांना दर्शन सुलभ व सुकर व्हावा म्हणून शहरातील सिन्नर सांस्कृतिक मंडळ व सिन्नर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी भाविकांसाठी मोफत चरणसेवा उपक्रम राबवला जातो. गेल्या २७ वर्षांपासून उपक्रम नित्यक्रमाने सुरू आहे.

भाविकांचे विनामोबदला चपल, बूट सांभाळत त्यांना




देवदर्शन व यात्रेचा निःसंकोच आनंद देण्याचे सेवाभावी कार्य मंडळाकडून सातत्याने २७ वर्षांपासून केले जात आहे.

या वर्षीही शुक्रवारी भैरवनाथ महाराज यात्रोत्सवात अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने भाविकांच्या चरणसेवेचा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या सामाजिक उपक्रमाची दखल घेत अनेक मान्यवर, भाविकांनी कौतुकाची थाप देत मंडळाचे आभार मानले. या उपक्रमात सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष कृष्णाजी भगत, प्रकाश नवसे, प्रा. राजाराम मुंगसे, सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. राजेंद्र पवार, प्रा. जावेद शेख, प्रा. आर. बी. गायकवाड, शाहिर स्वप्नील डुंबरे, सारंग इंगळे, चेतन धनगर, कृष्णा आहेर आदी सहभागी झाले होते.

### चरणसेवेचे समाधान लाखमोलाचे

ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराजांच्या यात्रेच्या निमित्ताने भक्तिभावाने आलेल्या भाविकांची चरणसेवा करण्याचे समाधान लाखमोलाचे आहे. भैरवनाथ महाराजांचे दर्शन करून आलेल्या भाविकांच्या चेहऱ्यावरचे समाधान व कौतुकाची थाप हा आनंददायी अनुभव आहे.

**- कृष्णाजी भगत,** अध्यक्ष, सिन्नर सांस्कृतिक मंडळ

नंदूशेठ मुत्रक, वीरेंद्र परदेशी, माजी नगरसेवक मनोज भगत, छायाचित्रकार दत्ता जोशी यांचे या उपक्रमास मोलाचे सहकार्य लाभले.



शिवसेनेच्या दोनच अधिकृत कामगार संघटना : डेव्हिड

पान ६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी




एसएनएफच्या ३३ व्या जलप्रकल्पाचे लोकार्पण!

पान ६

gavakari.in gavkarinews.com

नाशिक, सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५


## महत्त्वाचे



### कविवर्य नारायण सुर्वे वाचनालयात कवी कट्टा येथे संविधान अमृत महोत्सव साजरा

**सिडको :** सिडकोतील राजे संभाजी स्टेडियमजवळील कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालयात कविवर्य नारायण सुर्वे कवी कट्टा मंचावर संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त संविधान विशेष खुले कविसंमेलन घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. राजू देसले, आयटक कामगार नेते उपस्थित होते. तर संमेलनाध्यक्ष म्हणून प्रा. नागार्जुन वाडेकर उपस्थित होते. यावेळी ३० कवींनी सहभाग नोंदवला. यावेळी कवी शिवराज शिरसाठ यांच्या संविधान जागर या कवितेस प्रथम क्रमांक मिळाला. द्वितीय क्रमांक निशांत गुरू यांच्या संविधान पोवाडा त्याचबरोबर तृतीय क्रमांक प्रशांत आंबरे यांना मिळाला व दोन उत्तेजनार्थ क्रमांक उमेश जाधव आणि सीमाराणी बागुल यांच्या कवितेला देण्यात आले. यावेळी कवी रविकांत शार्दूल, कवी माणिकराव गोडसे, मुकुंद बेनी, कवयित्री कविता बिरारी, सुशीला संकलेचा, ज्योती अहिरे, रेखाताई सोनवणे आदींनी संविधानविषयक कविता सादर केल्या. कवी अरुण घोडेराव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कवयित्री शुभांगी माळी यांनी सूत्रसंचालन केले. तसेच कवी संजय आहेर यांनी आभार मानले.

### राजमुद्रा फाउंडेशनतर्फे वह्यांचे वाटप

**सिडको :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त पाथर्डी येथील भारतीय जनता पार्टी प्रणीत राजमुद्रा वेल्फेअर फाउंडेशनतर्फे गरजू विद्यार्थ्यांना पाच हजार वह्यांचे वाटप केले जाणार आहे. मंगळवार दि. १५ एप्रिल रोजी पाथर्डी गाव येथील खंडेराव मंदिर सभागृहात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. पाथर्डी गाव व पाथर्डी फाटा परिसरातील महापालिका शाळा व इतर शाळांमधील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत व्हावी, या उद्देशाने ५ हजार वह्यांचे वाटप केले जाणार आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन राजमुद्रा वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष बाळकृष्ण शिरसाठ यांनी केले आहे.

# अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना आजपासून साड्यांचे वाटप

**जिल्ह्यात १ लाख ७६ हजार ९२४ लाभार्थी**

**नाशिक : प्रतिनिधी**

अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना आज(दि.१४)पासून साड्यांचे वाटप करण्यात येणार आहे. राज्य शासनाकडून मागील वर्षापासून एक साडी मोफत देण्यात येते. यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधत साडीचे वाटप होणार आहे.

जिल्ह्यातील सुमारे एक लाख ७६ हजार ९२४ लाडक्या बहिणींना साडीवाटप करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत दिंडोरी आणि पेठ तालुक्यांना साड्या प्राप्त झाल्या असून, त्यांचे वाटप रेशन दुकानात आजपासून सुरू होणार आहे. या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची नोडल संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. महामंडळाने सार्वजनिक वितरण व्यवस्था यंत्रणेकडील गोदामापर्यंत साड्यांचा पुरवठा केल्यानंतर तेथून अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबापर्यंत साडी वाटप करण्याची व त्यावर देखरेख करण्याची जबाबदारी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाची राहणार आहे.

त्याअनुषंगाने साडीवाटपचे नियोजन जिल्हा पुरवठा विभागाकडून सुरू आहे. रेशन दुकानांमार्फत प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला साडी मोफत देण्यात येणार आहे. मागील वर्षी अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना मोफत साड्यांचे वाटप करण्यात आले होते. मात्र, महिलांनी एकाच रंगाची साडी मिळावी, असा आग्रह धरल्याने रेशन दुकानदारांचे टेन्शन वाढले होते. त्यामुळे यंदाही साडी वाटपास सुरुवात झाल्यानंतर लाभार्थी महिलांकडून अशाच स्वरूपाची मागणी होण्याची शक्यता आहे.

### दिंडोरी, पेठ तालुक्यांना साड्या प्राप्त

दिंडोरी आणि पेठ तालुक्यांना साड्या प्राप्त झाल्या आहेत. त्यांचे वाटप आजपासून सुरू करण्यात येणार आहे. इतर तालुक्यांचे वाटपही आंबेडकर जयंतीपासूनच सुरू करण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत. साड्यांचे नग जसे प्राप्त होतील तसे वाटप करण्यात येतील, अशी माहिती जिल्हा पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे.

**जिल्ह्यातील अंत्योदय लाभार्थी**

| | | | |
|---|---|---|---|
| बागलाण | १३२४८ | चांदवड | ६४१६ |
| देवळा | ५०६० | दिंडोरी | १३१२७ |
| धाविअ मालेगाव | १६५९७ | धाविअ नाशिक | १०६०६ |
| इगतपुरी | १०७३८ | कळवण | ८६१७ |
| मालेगाव | ११२७६ | नांदगाव | ५४२५ |
| मनमाड | ३३२३ | नाशिक | ८५८० |
| निफाड | १०७८६ | पेठ | १०७८२ |
| सिन्नर | ८२२८ | सुरगाणा | १५२८८ |
| त्र्यंबकेश्वर | ८८१८ | येवला | १०००९ |

एकूण - १७६९२४

## काँग्रेसतर्फे पेनाच्या प्रतिकृतीचे अनावरण




**नाशिक : प्रतिनिधी**


भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त काँग्रेस जयंती महोत्सव समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिताना वापरलेल्या पेनाच्या प्रतिकृतीचे अनावरण खा. शोभा बच्छाव व शहराध्यक्ष आकाश छाजेड यांच्या हस्ते करण्यात आले. काँग्रेस जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष वसंत ठाकूर व समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यासाठी मेहनत घेतली. नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे खा. शोभा बच्छाव यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमाला माजी गटनेते शाहू खैरे, माजी नगरसेवक लक्ष्मण धोत्रे, अल्तमश शेख, संदीप शर्मा, बबलू खैरे, सिद्धार्थ गांगुर्डे, धोंडीराम बोडके, भालचंद्र पाटील, अरुण दोंदे, उमेश चव्हाण, संतोष हिवाळे, स्वरूप पिसे, रोहित वाघ, प्रकाश खळे, लहू जाधव, संदीप वाघ, नंदकुमार सूर्यवंशी, उषा साळवे, कुसुम चव्हाण, समिना पठाण, साजिया शेख, शबाना अत्तार, राजकुमार जेफ, मुश्ताक कुरेशी, ओंकार पिसे, दत्ता कासार, राजेश गुजर, जावेद इब्राहिम, असलम पहेलवान, शहाबाज मिर्झा, अण्णा मोरे, जावेद पठाण, पोपटराव नागपुरे, दीपक परदेशी, लकी नागरे उपस्थित होते.

# अंतर्मुख मनानेच देवाची मानसिक उपासना शक्य

**प.पू. स्वामी स्वरूपानंद सरस्वती : अथर्वशीर्ष व्याख्यानमालेचा समारोप**

**नाशिक : प्रतिनिधी**

मन सतत वेगवेगळ्या विषयांचंच चिंतन करतं, डोळे उघडले तरी विचार सुरू असतात. डोळे बंद केले तरी विचार सुरू असतात. देवाची श्रद्धा करताना मनाला सर्व विचारांपासून निवृत्त करत नकळत विषयवृत्तीरहित मन करायला हवं. अंतर्मुख होऊन देवाची मानसिक उपासना करायला शक्य आहे, असे प्रतिपादन प. पू. स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी शंकराचार्य न्यास, गंगापूर रोड येथे रविवार दि. १३ रोजी आयोजित व्याख्यानमालेच्या समारोपाच्या दिवशी केले.




ते पुढे म्हणाले, सगुण ईश्वराची पूजा झाली पाहिजे. सगुणाविषयीची ओढ भाव निर्माण झाला पाहिजे. मनात श्रद्धा असेल तर प्रतिमा, मूर्तीच्या रूपात माझ्या अधिष्ठान देवतेचे रूप दिसायला लागतं. उपासना करण्याच्या आधी देवतेविषयी भाव निर्माण झाला पाहिजे.

सगुण रूपाची प्रथम पूजा करा, ज्या मूर्तीची पूजा करतो त्याविषयी उत्कट प्रेमाचा भाव, श्रद्धा निर्माण होते. व्यक्तिगत हेवेदावे, राग, लोभ नाहीसा होतो, तेव्हा शुद्ध प्रेमभाव निर्माण होतो. भरकटणारं मन आपोआप शांत होईल. दैवतेच्या रूपात मन स्थिर व्हायला लागलं की तद्रूप, तल्लीन व्हायला लागतं.

देवाची पूजा करताना तन्मय तल्लीन होता यायला हवं. मनातील इतर सर्व विषय विचारांचा नाश पूजा करतेवेळी झाले पाहिजे. उपासना करताना ध्यान समाधी अवस्था निर्माण झाली पाहिजे. ध्यान समाधी अवस्थेत मंत्रजप करताना जी साधना होते त्याला नामस्मरण म्हणतात. मूर्तीतील तेजोमय चैतन्य रूप अंतःकरणाला तेजोमय करून मनातील जळमटं नाहीसे होतात. ही अवस्था भाव समाधी अवस्था होय. देवाची साधना, उपासना करताना भाव समाधी अवस्था प्राप्त झाली की, पूर्णरूपी साधक होता येते, असे विवेचन प.पू. स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी केले.








आरओसी-2025-26/क्र-5/C१८९



◂◂ एलआयसी एमएफ फ्लेक्झी कॅप फंड ◂◂ पान न.३

नाशिक आज
# गांवकरी



◂◂ पीबीपार्टनर्सकडून शपथ ४.० विशेष बिझनेस मीट ◂◂ नाशिक आज

■ नाशिक, सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे



### रांगोळीतून साकारले डॉ. आंबेडकर

**सिडको :** कर्मवीर भाऊसाहेब हिरे विद्यालय, गंगापूर रोड, नाशिक येथील कलाशिक्षक संजय जगताप यांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ५ फूट बाय ६ फूट अशा सप्तरंगी रांगोळीच्या चित्रातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना साकारले. सुमारे चार ते पाच तासांच्या अथक परिश्रमातून बाबासाहेबांवर असलेली निष्ठा आणि श्रद्धेपोटी कलाशिक्षक संजय जगताप यांनी भव्य अशी रांगोळी साकारलेली आहे आणि या रांगोळीच्या माध्यमातून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिली आहे. विद्यार्थ्यांना देशासाठी केलेल्या महापुरुषांच्या अनोख्या कार्याची माहिती होणे आणि त्यांनादेखील या चित्रातून कलेची आवड निर्माण व्हावी, या उदात्त हेतूने हे रांगोळी चित्र साकारले असल्याचे कलाशिक्षक जगताप म्हणाले. त्यांच्या या कलाविष्काराबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पवार, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सुजाता शिंदे, पर्यवेक्षक धनंजय देवरे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

### लायन्सची विभागीय परिषद उत्साहात



**नाशिक :** लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४-डी २ अंतर्गत नाशिक रिजन-६ ची 'रामराज' विषयावरील विभागीय परिषद रिजन चेअरमन राजू व्यास यांच्या नेतृत्वाखाली उत्साहात पार पडली. प्रांतपाल विजय सारडा, गिरीश मालपाणी यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमात झोन चेअरमन सतीश अलई, विकास बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व क्लब्स्नी रामायण-थीम्ड बॅनर सादर केले. प्रांतपालांनी लायन्स क्लब ऑफ पिंपळगाव बसवंत या नव्या क्लबचे उद्घाटन केले. रिजन चेअरमन ला. राजू व्यास यांना इंटरनॅशनल प्रेसिडेंट सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास नाशिक रिजनमधील २२ क्लबचे प्रतिनिधी, माजी प्रांतपाल आणि विविध पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सचिन शाह, अजय सानप, रितू चौधरी, मोनिका व्यास यांसह विभागीय टीमचे योगदान लक्षणीय होते. यावेळी राजेंद्र मुछाल, प्रथम उपप्रांतपाल राजेश अग्रवाल, द्वितीय उपप्रांतपाल श्रेयस दीक्षित, माजी प्रांतपाल राजेश कोठावदे, ला. विनोद कपूर, ला. मिलिंद पोफळे, अभय शास्त्री तसेच मोनिका व्यास, अंजली सारडा, सुनीता मालपाणी आदींची उपस्थिती होती.

### आंबेडकरांची ज्ञानसाधना विषयावर आज व्याख्यान

**नाशिक :** सावानाच्या वतीने महात्मा जोतिराव फुले यांच्या १९८ व्या आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ज्ञानसाधना या विषयावर सेवानिवृत्त जिल्हाधिकारी बी. जी. वाघ यांच्या व्याख्यानाचे आयोजन आज सोमवार दि. १४ रोजी सकाळी ११ वाजता मु. शं. औरंगाबादकर सभागृहात करण्यात आले आहे. नागरिकांनी व्याख्यानाला उपस्थित राहावे असे आवाहन सावानाच्या कार्यकारी मंडळाच्या वतीने करण्यात आले.

# शहरात अवतरली निळाई!

## भीमजयंतीनिमित्त आज विविध कार्यक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज सोमवार दि. १४ रोजी जयंती साजरी होणार आहे. बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त शहरात निळे वादळ संचारले आहे. सर्वत्र तयारीस वेग आला आहे. आज शहरात विविध कार्यक्रम व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. राजकीय पक्ष व आंबेडकरप्रेमी यांच्या वतीने विविध भागांतून रॅली काढण्यात येणार आहेत. दोन दिवसांपासूनच जयंतीच्या पार्श्वभूमीवर स्टेज उभारणी करण्यात आली होती. तसेच वाहनांवर, घरांवर निळे झेंडे लावण्यात आले होते.**

तसेच शहरातील चौकाचौकात स्टेज उभारण्यात आले आहे. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विविध आस्थापनांतही बाबासाहेबांना अभिवादन करण्यात येणार असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण जाणवत आहे. शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### ढोलसह कलावंत देणार मानवंदना

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज ५१ ढोलसह कलावंत महापुरुषांना मानवंदना देणार आहेत. अखिल भारतीय कलावंत न्याय्य हक्क समिती या कलावंतांच्या संघटनेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा शालिमार येथे साजरा करण्यात येणार आहे. यंदा प्रथमच मुंबई नाका येथे महात्मा फुले, जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील छत्रपती शिवाजी महाराज व शालिमार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर शहरातील ५१ ढोलसह कलावंत मानवंदना देणार आहे, अशी माहिती संयुक्त जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संतोष साळुंके यांनी दिली. या सोहळ्याचे उद्घाटन श्रमिक सेनेचे संस्थापक सुनील बागूल यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन गायक सोमनाथ गायकवाड, बलराज आहेर, प्रतिभा जगताप, रंजना देसले, अलकाताई आरणे, रेखा सांगळे, सदाशिव भुजंगे, श्याम वैष्णव, विनोद वुईके यांनी केले आहे.



### युज नॅशनलमध्ये पोलिसांचा सत्कार

**जुने नाशिक : वार्ताहर**

येथील सारडा सर्कल परिसरातील युज नॅशनल हायस्कूल फॉर गर्ल्स, बॉइज अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज प्रशासनातर्फे शाळा परिसरात अर्थात सारडा सर्कल भागात कार्यरत ट्रॅफिक पोलीस कर्मचारी मारुती घुले, रवींद्र खोडे व वनिता बर्डे यांचा शाल, पुष्पगुच्छ व मिठाई देऊन सत्कार करण्यात आला. बॉइज हायस्कूलचे प्रिन्सिपल तौसिफ शेख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका मुसर्रत शेख, उपमुख्याध्यापिका शगुफ्ता शेख, शगुफ्ता खान, उपप्राचार्य डॉ. नूरे इलाही शाह, पर्यवेक्षक जाकिर शेख, सईद खान आदी व्यासपीठावर उपस्थित होते.







# नाशिकरोडला स्वागत कमानी सजल्या

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

विश्वरत्न प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक, नाशिकरोड येथे राजगृह देखावा साकारण्यात आला आहे. नाशिकरोड, जेलरोड, देवळालीगाव, विहितगाव, उपनगर, चेहेडी आदी भागात ठिकठिकाणी स्वागत कमानी, पताका, विद्युत रोषणाई, होर्डिंग लावण्यात आले आहेत. विविध सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. विद्युत रोषणाई, सजीव देखावे आणि



ऐतिहासिक माहितीने परिपूर्ण अशा या प्रदर्शनामुळे नाशिकरोड शहरात जयंतीनिमित्त एक आगळीवेगळी जयंती उत्सव दिसून येत आहे. सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे मुख्य संयोजक सुनील काबंळे, समिती अध्यक्ष मुकेश वीर, माजी न्यायाधीश प्रकाश ताजनपुरे, अशोक आव्हाड, संजय पगारे, अजित दिवेकर, अशोक आव्हाड, अतुल भावसार आदी संयोजन करीत आहेत.

### हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी

सोनवणे फाउंडेशनतर्फे आज शालिमार, नाशिकरोड, सातपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. दुपारी तीन ते चार या वेळात ही पुष्पवृष्टी करण्यात येणार असल्याची माहिती बापूसाहेब सोनवणे यांनी दिली.

### पेठ तालुक्यात नवीन बसेसचा शुभारंभ

#### ना. झिरवाळ, मा.आ. महाले यांच्या पाठपुराव्यास यश

**पेठ :** पेठ येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ पेठ डेपो या ठिकाणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या माध्यमातून व अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व माजी आमदार धनराज महाले यांच्या पाठपुराव्यामुळे पेठ तालुक्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने नवीन बस उपलब्ध करून देण्यात आल्या. त्या शुभारंभप्रसंगी माजी आमदार धनराज महाले, मा. जिल्हा परिषद सदस्य श्याम गावित, शिवसेना तालुकाप्रमुख पद्माकर कामडी, भा.ज.पा. तालुकाप्रमुख पंकज पाटील, शहरप्रमुख त्र्यंबक कामडी, युवासेना शहरप्रमुख अनिल पवार, कांतिलाल राऊत, महेश टोपले, मोहन कामडी, संदीप बेलघर, अनिल निमसे यांच्यासह वाहतूक नियंत्रक आर.के. आवारे, आर. आर. माळगाणे, एम. डी. तलवारे, सुनील भरसट, हिरामण मौळे, सोमनाथ गवळी, बसचालक संतोष अहिरे, चालक एकनाथ बुधवन, सचिन गवळी, गावंडे, शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.


# सोने लाखात देखणे! वर्षभरात घसघशीत परतावा

## भाव ९६ हजारांवर; गुंतवणुकीसाठी प्राधान्य

**नाशिक : प्रतिनिधी**

**जागतिक बाजारपेठेत सोनेदराने उसळी घेतली असून, अमेरिकेने अतिरिक्त आयात शुल्क आकारण्यास तीन महिन्यांची स्थगिती दिल्याने देशांतर्गत बाजारात सोन्याचे भाव प्रतितोळा ९५ हजार ९९६ रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. लाखाचा टप्पा गाठण्यासाठी अवघ्या तीन हजारांचा फरक आहे. सोन्याचे भाव आगामी काळात वाढतच जाणार असल्याने गुंतवणुकीसाठी सोन्याला प्राधान्य दिले जात आहे.**

२४ कॅरेट सोन्याचा दर सध्या ९६ हजार ५००, २२ कॅरेट ८८ हजार ८०० प्रति दहा ग्रॅम आणि चांदीदर ९७ हजार ३०० प्रतिकिलो जीएसटीसह आहे. सोनेदरात चार दिवसांपासून संभ्रमाचे वातावरण पाहावयास मिळाले होते. दरात घसरण होऊन सोने पंचावन्न हजार होणार, असा मेसेज व्हायरल होत होता. त्यामुळे अनेक ग्राहकांनी घाबरून आपल्याकडील सोने विकण्यास सुरुवात केली होती. सध्याच्या जागतिक परिस्थिती पाहता सोने दरात गेल्या एक वर्षात ४५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गुढीपाडव्यानंतर उच्चांकी ९४ हजार ३४८ रुपयांपर्यंत पोहचलेल्या सोने दरात आठ एप्रिलपर्यंत २ हजार ८८४ रुपयांनी घसरण झाली होती. त्यातच सोशल मीडियातील मेसेजमुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु पुन्हा वाढ होत राहिल्याने सोन्याचे दर शनिवारी ९६ हजार ५००



### तज्ज्ञांचे विश्लेषण

आर्थिक विश्लेषक यावर जोर देतात की, सोन्याच्या सध्याच्या वाढीमध्ये जागतिक अस्थिरतेत स्थिरता शोधणाऱ्या गुंतवणूकदारांचा व्यापक दृष्टिकोन दिसून येतो. बाजार विश्लेषकांनुसार, सोन्याची सुरक्षित मालमत्ता म्हणून ऐतिहासिक भूमिका सध्याच्या आर्थिक वातावरणातून अधिक मजबूत होत आहे. भूराजकीय धोके आणि महागाईचा दबाव यामुळे सोन्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे.

सध्याच्या जागतिक परिस्थितीकडे पाहता, सोने भावात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. टेरिफ वॉरमुळे जागतिक व्यापार अस्थिर झाला आहे, तर रशिया–युक्रेन तसेच इराण–इस्रायल यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीने सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून सोन्याला मागणी वाढली आहे. त्यात अमेरिकेत महागाई दर पुन्हा वाढताना दिसत आहे, जे डॉलरवर दबाव आणत असून, परिणामी सोने अधिक आकर्षक बनत आहे. तांत्रिक विश्लेषणानुसार ६८,५०० रुपयांच्या वर स्थिरावल्यास पुढील टप्पा ७०,००० चा सहज गाठता येईल.

– **चेतन राजापूरकर,** गुंतवणूक विश्लेषक

ट्रम्प टेरिफवॉरमुळे जागतिक शेअरबाजार कोसळले आहेत. युद्धाचा परिणाम, त्यामुळे सोन्यात गुंतवणुकीस प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे मागणी वाढल्याने दरात वाढ झाली आहे. गेल्या वर्षी सोनेदर ७४ हजारांवर होते. यंदा ९४ ते ९६ हजारांवर पोहोचले आहेत. जवळपास एका वर्षात २७ ते ३० टक्के रिटर्न सोन्यातून मिळाले आहे. त्यामुळे ग्राहकांनी गरज नसल्यास सोने मोडू नये.


– **मयुरेश शहाणे,** संचालक, मयूर अलंकार

सोन्याच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. गेल्या १५ वर्षांत वार्षिक किमान ९% वाढ नोंदवली गेली आहे. यामुळे गुंतवणूकदार आणि अर्थशास्त्रज्ञांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे. जागतिक आर्थिक आणि भूराजकीय घटकांमुळे ही वाढ झाली आहे, ज्यामुळे गुंतवणूकदार सोन्यासारख्या सुरक्षित मालमत्तेकडे वळले आहेत.

सोन्याची मागणी वाढली आहे. जगभरात अस्थिरतेचे वातावरण, टेरिफकार्ड या सर्वांचा परिणाम सोनेदर वाढण्यात झाली आहे. ग्राहकांनी दर कमी झाल्यास खरेदी सुरू ठेवावी. सोन्याने चांगला परतावा दिला असून, गुंतवणूक म्हणून सोने खरेदी केली जात आहे.

– **गिरीश नवसे,** अध्यक्ष, सराफ असोसिएशन




























अग्रलेख

# दक्षिणेतील जुना मित्र

भारतीय जनता पार्टीने दक्षिणेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. दक्षिणेत पक्षाला म्हणावा तसा जनाधार नाही. मात्र, पक्षाची मतांची टक्केवारी हळूहळू वाढत आहे. दक्षिणेतील कर्नाटक, तेलंगणा या राज्यांत पक्षाचे अस्तित्त्व असून, आंध्र प्रदेशात मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसम पक्षाशी भाजपाची युती आहे. तमिळनाडू आणि केंद्रशासित पोदुचेरी प्रदेशात भाजपाला म्हणावा तसा जनाधार नाही. केरळमध्येही तीच स्थिती. लोकसभा भाजपाला काहीच यश मिळाले नाही. तामिळनाडूतील दुसर्या क्रमांकाचा सर्वांत मोठा पक्ष असलेल्या ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघहम (अण्णा द्रमुक) या पक्षाशी लोकसभा निवडणुकीत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांनी अण्णा द्रमुक पक्षाच्या नेत्यांवर टीका केल्याने युती होऊ शकली नव्हती. गेल्या आठवड्यात अण्णामलाई यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अर्थात, राजीनामा घेतला गेला असेल. राजीनाम्यानंतर अण्णा द्रमुक-भाजपा युतीचा मार्ग सुकर झाला. गेल्या शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत युतीवर शिक्कामोर्तब झाल्याने भाजपाला दक्षिणेतील एका मोठ्या राज्यात पाय रोवण्याची एक संधी मिळाली आहे. पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणार्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने ही युती करण्यात आली आहे. अण्णा द्रमुकने प्रथमच भाजपाशी युती केली असे काही नाही. यापूर्वी सन १९९८ साली या द्राविडी पक्षाने भाजपाशी युती करुन राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी पक्षाची सूत्रे जयललिता यांच्याकडे होती. जयललिता आता हयात नाहीत. त्यांच्या जाण्यानंतर पक्षात फूट पडली असली, तरी पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली पक्ष ताकदवान आहे. सन २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत अण्णा द्रमुकने राज्यात ३९ पैकी ३७ जागा जिंकल्या होत्या. सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने या पक्षाशी युती करुनही काही फायदा झाला नाही. या युतीला केवळ एक जागा मिळाली होती. भाजपाशी युती केल्याने अण्णा द्रमुकच्या मतसंख्येत कमालीची घट झाली होती. तामिळनाडूमध्ये हिन्दी लागण्याच्या प्रश्नावरुन भाजपाच्या विरोधात एक वातावरण निर्माण करण्यात द्रमुकचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यशस्वी होत आहेत. सध्या भाजपा विरुध्द द्रमुक यांच्यात नवीन शैक्षणिक धोरण, हिंदी भाषा, राज्यपालांची भूमिका यावरुन वाद होत आहेत. भाजपाशी युती केल्यानंतर अण्णा द्रमुकला तमिळ भाषा, तमिळ संस्कृती जपावी लागणार आहे. भाजपाशी युती करण्याचे कारण द्रमुकला सतेवरुन हटविणे हे असले, तरी या नव्या युतीसमोर आव्हान आहे. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अण्णा द्रमुकशी भाजपाची युती होऊ शकली नाही. त्यावेळी द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीने (इंडिया आघाडी) सर्व ३९ जागा जिंकल्या होत्या. अण्णा द्रमुक-भाजपा युती असती, तर १२ ते १५ जागा मिळाल्या असत्या, असे राजकीय विश्लेषकांचे मत त्यावेळी होते. भाजपाने आता केलेली युती केवळ विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी नाही, तर सन २०२९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये तामिळनाडूत मजबूत पाय रोवण्याच्या हेतूने आहे. राज्यात भाजपाने पलानीस्वामी यांना मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून मान्यता दिली असली, तरी पुढे लोकसभा भाजपा आपल्या पदरात जास्तीतजास्त जागा पाडून घेण्याचा प्रयत्न करेलच. तूर्त विधानसभा निवडणुकीचा विचार करता भाजपाला द्रमुकच्या नेतृत्वाखालील स्टॅलिन यांचे सरकार खाली खेचायचे आहे. पण, ही गोष्ट म्हणावी तितकी सोपी नाही. तामिळनाडूतील लोकप्रिय अभिनेता विजय यांनी तमिलगा व्हेट्री कळघहम (टीव्हीके) पक्षाची स्थापना केलेली आहे. या पक्षाला लोकांचा चांगला पाठिंबा मिळत आहे. अलीकडेच एका संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात मुख्यमंत्री म्हणून २८ टक्के मतांसह एम. के. स्टॅलिन आघाडीवर आहेत, तर टीव्हीके पक्षाचे नेते विजय १८ टक्के मतांसह दुसऱ्या स्थानावर आहेत. अण्णा द्रमुक-भाजपा युतीला १९ टक्के लोकांचे समर्थन आहे. पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी भाजपाला या युतीचा राज्यात फायदा होऊ शकेल. दुसरीकडे विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी करणारे व्हीटीके पक्षाचे नेते विजय यांनाही नव्याने रणनीती आखावी लागेल. व्हीटीकेची मते कमी होण्याची शक्यता नव्या युतीमुळे बळावली आहे. विजय यांचा पक्ष सत्ताधारी द्रमुक आणि भाजपा या दोन्ही पक्षांना लक्ष्य करत आहे. यामुळे विधानसभा निवडणुकीत द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी (इंडिया), अण्णा द्रमुक-भाजपा युती, व्हीटीके आणि अस्तित्वासाठी संघर्ष करणारे लहान पक्ष यांच्यात लढत पाहायला मिळणार आहे. प्रश्न अण्णा द्रमुकचा आहे. जयललिता यांच्या निधनानंतर पक्षात फूट पडली. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने सर्व गटांना एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जयललिता यांचे ५ डिसेंबर २०१६ रोजी निधन झाल्यानंतर पक्षात गट निर्माण झाले. तत्कालीन अर्थमंत्री ओ. पन्नीरसेलवम काही काळासाठी मुख्यमंत्री झाले. जयललिता यांच्या विश्वासू व्हीके शशिकला या पक्षाच्या हंगामी सरचिटणीस म्हणून पुढे आल्यानंतर पन्नीरसेलवम यांना राजीनामा द्यावा लागल्यानंतर काही आमदारांना घेऊन ‘धर्मयुद्धम्’ च्या नावाने ते वेगळे झाले. शशिकला यांनी काही आमदारांची जमवाजमव करुन सरकार स्थापन करण्यासाठी आपणास पाचारण करावे म्हणून राज्यपालांना विनंती केली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने बेहिशेबी संपत्ती प्रकरणात त्यांना दोषी ठरविले असल्याने मुख्यमंत्री होण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. यानंतर पलानीस्वामी मुख्यमंत्री झाले. दरम्यान शशिकला यांचे पुतणे दिनकरन यांची पक्षाचे उपसरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी पक्षावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला. पक्षातील या गटबाजी वाढली आणि काही कायदेशीर प्रश्न उपस्थित झाले. दोन पाने या पक्षाच्या चिन्हावरुन पलानीस्वामी आणि पन्नीरसेलवम यांच्यात सुरू असलेला वाद निवडणूक आयोगासमोर आहे. निवडणूक आयोगाने पलानीस्वामी यांच्या गटाला तूर्त मान्यता दिलेली आहे. अशा परिस्थितीत पक्षाच्या सर्व गटांना एकत्रित आणण्यासाठी प्रयत्न सुरू असताना पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने भाजपाशी युती करण्याचा निर्णय घेतला आहे. अण्णाद्रमुकच्या अंतर्गत वादात भाजपा हस्तक्षेप करणार नाही, असे अमित शहा यांनी स्पष्ट केले आहे. सर्व गट एकत्र आलेच, तर भाजपाशी युती करण्याचा पलानीस्वामी यांचा निर्णय सर्वांना मान्य होईल काय? हा प्रश्न आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता!

विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे, मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात, त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे.



जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलित उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषीतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहासतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात. म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक धोरण यामागील दोन लेखांत डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती. आज मी डॉ. बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायकपासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारतपर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतः चे वर्तमानपत्र असावे असे डॉ. बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादकपदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. ‘मूकनायक’ पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. ‘मूकनायक’ एप्रिल १९२३ मध्ये बंद पडले.

**श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

इ.स. १९२४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी आम्ही शासनकर्ती जमात बनणार या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झाली, कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की, त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, या मूकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते.

# अष्टविनायक मंदिरांतील ड्रेसकोड स्वागतार्ह!

मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरात ड्रेसकोड लागू झाल्यानंतर आता राज्यातील अष्टविनायक मंदिरांतही ड्रेसकोड लागू करण्यात आला आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी कोणते कपडे परिधान करून यावेत आणि कोणते कपडे परिधान करून मंदिरात प्रवेश निषिद्ध असेल याची सूचीच या मंदिरांच्या बाहेर लावली जाणार आहे. मंदिरातील सात्त्विकता अबाधित राहावी यासाठी मंदिर समित्यांनी घेतलेला हा निर्णय नक्कीच स्वागतार्ह आहे. गेल्या ३-४ वर्षांत राज्यातील अनेक सुप्रसिद्ध मंदिरांत ड्रेसकोड लागू करण्यात आले आहेत. याचे श्रेय हिंदू जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाला द्यावे लागेल. गेल्या काही वर्षांत त्यांनी राज्यातील मंदिरांच्या विश्वस्तांचे तसेच पुजाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात संघटन घडवून आणले. राज्यातील समस्त मंदिरांत भक्तांच्या सुविधेसाठी आणि मंदिराचे पावित्र्य अबाधित राहावे यासाठी काय काय करता येईल याविषयी चर्चा घडवून आणण्यासाठी आणि राज्यस्तरावर ध्येयधोरणे आखण्यासाठी अधिवेशने आणि शिबिरे यांचे आयोजन केले. ज्याची फलश्रुती आज विविध मंदिरांत दिसून येत आहे. आजवर या देशावर अनेक आक्रमकांनी हल्ले



करून येथील वैभव लुटून नेले, मात्र येथील संस्कृतीच्या खुणा त्यांना मिटवता आल्या नाही. या खुणा आणि त्यांचे पावित्र्य जतन करून ठेवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी मोठे योगदान दिले आहे, त्यामुळे ते पावित्र्य टिकवून ठेवण्याचे दायित्व आता आपल्या खांद्यावर आहे. महाराष्ट्रात जेव्हा मंदिरांतून वस्त्रसंहिता लागू करण्याचा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा समाजातून जसे या भूमिकेचे स्वागत झाले तसा यास काही पुरोगामी मंडळींकडून विरोधही करण्यात आला. तरीही मागील दोन वर्षांत राज्यातील अनेक मंदिरांनी ड्रेसकोड लागू केले आहेत. गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव काळात राज्यातील काही उत्सव मंडळांनीही श्रींच्या मंडपात वस्त्रसंहितेचे पालन करणे बंधनकारक केले. दक्षिण भारतातील अनेक मंदिरांत मागील शेकडो वर्षांपासून वस्त्रसंहिता लागू करण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी महाराष्ट्रातून जाणारे भाविक त्याचे तंतोतंत पालन करतात, मग राज्यातील वस्त्रसंहितेला विरोध का? मंदिरांच्या गाभाऱ्यात जाताना पुरुषांनी सोवळे आणि स्त्रियांनी साडी नेसावी ही प्रथा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे, हे आपणा सर्वांना ज्ञात आहे, मग मंदिर परिसरातील वस्त्रसंहितेला आक्षेप नेमका कशासाठी? मुळात मंदिरे ही काही सहलीची ठिकाणे नाहीत की, ज्या ठिकाणी कोणी मौजमजेसाठी यावे. मंदिरात येणाऱ्या प्रत्येकाला त्या देवतेचे दर्शन घ्यायचे असते, देवतेच्या मूर्तीतून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करायचे असते, आपले मागणे देवापुढे मांडायचे असते याचाच अर्थ तिथे देव प्रत्यक्ष आहे आणि तो आपले म्हणणे ऐकणार आहे, अशी श्रद्धा येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात असते. मग त्या देवतेच्या ठिकाणचे पावित्र्य जपणे आपले कर्तव्य नव्हे का? मुलांना शाळेत पाठवताना आपण शाळांनी ठरवून दिलेला गणवेश घालून त्यांना पाठवतो. कार्पोरेट कार्यालयांतही कपड्यांच्या बाबतीत कंपनीने घालून दिलेले नियम कर्मचाऱ्यांना पाळावे लागतात. रुग्णालये, न्यायालये, पोलीस, टपाल कार्यालय सर्वच ठिकाणी ड्रेसकोड आहेत आणि वर्षानुवर्षे या ड्रेसकोडचे पालन होत आलेले आहे, मग देवालयांत जाताना आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा कशी बरे येते? कोरोना काळात कोरोना रुग्णांना भेटायला जाताना पीपीई किट परिधान करून जाणे बंधनकारक करण्यात आले होते. त्यावेळी ते नियम डॉक्टरांनी केले होते म्हणून आपण सर्वांनीच ते पाळले. मग धार्मिक स्थळांच्या बाबतीत धर्म आणि अध्यात्मशास्त्र जाणणाऱ्या मंडळींनी केलेले नियम आपल्याला मान्य का होत नाहीत? देशाचे पंतप्रधानसुद्धा विविध मंदिरांत जाताना तेथील ड्रेसकोडचे पालन करतात. चित्रपटात अंग प्रदर्शन करणाऱ्या हॉलिवूड-बॉलिवूडमधील नायिकाही मंदिरांत जाताना साजेशी वस्त्र परिधान करतात. डोक्यावर पदर घेतात मग आपण या नियमांना विरोध करून नेमके कोणते पुढारलेपण दाखवत आहोत? पुरातन मंदिरे ज्यावेळी निर्माण करण्यात आली त्यावेळी सामान्य लोकांचे पोशाख हे सात्त्विक आणि धर्माला अनुसरून होते. त्यामुळे त्यावेळी वस्त्रसंहिता बनवण्याची गरजच निर्माण झालेली नव्हती. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा पगडा, धार्मिक स्थळांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला गेल्याने वस्त्रसंहिता लागू करणे आज अनिवार्य झाले आहे. मंदिरे ही पर्यटनाची केंद्रे नसून, ती धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी योग्य ती शुचिर्भूतता पाळली जावी, मंदिरांचे पावित्र्य राखले जावे, मंदिरांत येणाऱ्या भाविकांचा देवतेप्रतीचा भाव टिकून राहावा यासाठी तोकडे आणि निषिद्ध कपडे परिधान करून मंदिरांत प्रवेश करण्यास अनेक देवस्थानांकडून घालण्यात आलेली बंदी स्वागतार्ह आहे.

**जगन घाणेकर**
**९६६४५५९७८०**

# चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दि. १४ एप्रिल २०२५ रोजी १३४ वी जयंती. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जवळपास सर्वच प्रमुख क्षेत्रांमध्ये मोलाची कामगिरी केली. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण पूर्ण झाले. आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या दोन्हीतून अर्थशास्त्रातील डायरेक्ट पदव्या मिळविल्या. भारताच्या स्वातंत्र्यासाठी ते प्रचार व चर्चांमध्ये सामील झाले.

महापुरुष हे धर्म, समाज, देश यांच्या बंधनापलीकडे गेलेले असतात. त्यांना फक्त मानवता धर्मच माहीत असतो. त्यांच्या कर्तृत्वाला ओळखण्यासाठी आणि जाणून घेण्यासाठी आपली बुद्धीपण किमान त्याच पातळीची असायला हवी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आणि कार्याची सर्वसमावेशकता प्रत्येकाच्या हृदयात आणि मेंदूत जपली जावी.



बाबासाहेबांचा वाचनाचा छंद आणि त्यांचे ग्रंथप्रेम आपणास ज्ञात आहेच. पुस्तके म्हणजे समयरूपी सागरात उभे केलेले दीपस्तंभ होत. तासन्तास तहानभूक हरपून ग्रंथालयात बाबासाहेब वाचन करत बसत. त्यांच्या या मेहनतीचे वास्तव नव्या पिढीला निव्वळ सांगून चालणार नाही. त्याचा अनुनय करण्याची ऊर्जा सर्वांत निर्माण झाली पाहिजे.


डॉ. बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी प्रत्येक तरुणाने आपल्या डोक्यात त्यांचे विचार आणि आचारात प्रामाणिकपणा ठेवून खरीखुरी स्वतःची जडणघडण केली पाहिजे. त्यासाठी पालकांचेही कर्तव्य आहे की, आपल्या पाल्यांसमोर वास्तव बाबासाहेब आणि त्यांचा स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्वासाठीचा अविरत प्रयत्न याबाबतचा इतिहास पुन्हा पुन्हा पुढे मांडला पाहिजे. त्यांचा संघर्षमय, सचोटीपूर्ण, मेहनतीयुक्त जीवनप्रवास अनुभवून नवी पिढी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिशेने मार्गस्थ होईल.

एवढ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वासारखे आपण स्वतः व्हावे, अशी आस असणे स्वाभाविक आहे. अठरा अठरा तासांची मेहनत आणि जिज्ञासा व अपार यातना ज्या मनाला डसत असतात त्याच बाबी असे एखादे व्यक्तिमत्त्व घडत असते. आपण त्यांचे विचार आचरणात आणून त्यांच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यांच्या कार्याची दखल घेत १९९० साली त्यांना मरणोत्तर ‘भारतरत्न’ हा भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. जयंती दिनानिमित्ताने त्यांना मानाचा मुजरा!

**प्रभाकर वारुळे**
**७५८८१७६२७१**

# संत आपल्याला जागे करतात

प्रत्यक्ष विषयापेक्षा विषयी माणसाची संगत फार वाईट असते, हे ज्याप्रमाणे संसारात, तसेच परमार्थातही लागू आहे. संगतीचा परिणाम नेहमी मनावर होतो; म्हणून चांगल्या विचारांच्या माणसाची संगत धरावी. चांगले-वाईट हे नेहमी आपल्यावरूनच ओळखावे. स्वत:ला सुधारण्याऐवजी आपण जगाची सुधारणा करायला जातो हेच आपले चुकते. जगात संत असतील असे पुष्कळांना वाटतच नाही. संताला ओळखायला आपल्या अंगी थोडेतरी भगवंताचे प्रेम असायला पाहिजे. आपल्याला आपल्या ध्येयाचा विसर पडला, परंतु संतांनी आपल्याला जागे केले. चुकीची वाट चालत असताना, ‘अरे, तू वाट चुकलास,’ अशी जागृती संतांनी आपल्याला दिली. तेव्हा जिकडे पाठ होती तिकडे आपण तोंड केले आणि पुन: चालू लागलो तर आपण योग्य स्थळी जाऊ.




संत आनंदरूप झाल्यावर स्वस्थ बसत नाहीत. ते ज्या लीला करतात त्या जगाच्या कल्याणासाठी असतात. त्या वेळीही ते आपल्या मूळच्या आनंदातच असतात. ते स्वस्थ बसलेले दिसले तरी जगाचे कल्याण करीतच असतात. आपण धडपड करून फुकट मरतो, त्यापेक्षा ते स्वस्थ बसून जिवंत राहतात, हे केव्हाही चांगलेच होय. संत आनंदरूप झालेले असल्यामुळे त्यांच्या वचनानुसार आपण जाऊ या. लोकांना उपदेश करण्यामध्ये संतांचा हेतू एकच असतो आणि तो हा की, ‘जे मला कळले आहे ते लोकांना कळून लोक सुखी होऊ द्या.’ संत आपल्या स्वार्थासाठी सांगत नसल्याने, त्यांचे म्हणणे आपल्याला खोटे कसे म्हणता येईल? प्रपंच हा दु:खमय आहे हे कळल्यावर त्यावर काहीतरी उपाय केला पाहिजे. तो संतांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या वाचनाने कळतो. त्या ग्रंथात सांगितलेले आपण करावे. आपण ग्रंथामध्ये जे वाचतो ते जर आचरणात आणले नाही तर त्या वाचनाचा उपयोग नाही. वाचनाचे मनन झाले पाहिजे. साधन व वाचन बरोबर चालावे.

ज्या संतांचा ग्रंथ आपण वाचतो त्यांच्या कृपेवाचून तो नीट समजणार नाही. ज्याच्यावर त्यांची कृपा आहे त्याला अंगी विद्वता नसताना देखील त्या ग्रंथांचा बरोबर अर्थ अगदी स्वाभाविकपणे कळेल. विद्वान् हा कल्पनेने सत्यस्वरूपाचे वर्णन करतो, पण संत मात्र निश्चयाने, खात्रीने आणि अनुभवाने ते रूप काय आहे हे सांगतात. सत्पुरुषांच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे.

# मोबाइल्स, टॅब्लेट्स, संगणक हे वाढविणार मायोपियाचा प्रादुर्भाव

**जनमनाचे प्रतिध्वनी**

जगभरात होत असलेल्या तंत्रज्ञानाची, यंत्रांची प्रगती मानवाच्या उद्धाराला जेवढी पूरक आहे असे वाटते, तेवढीच त्यांच्या अतिरेकी वापरामुळे मानवी आरोग्याला धोकादायक ठरू शकते. याची प्रचिती येऊ लागली आहे. या काळात तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे मोबाइल, टॅब्लेट्स, संगणक यांच्या स्क्रीनचा अतिवापर माणसांना दृष्टीच्या आजारांना सामोरे जाण्यास भाग पडत आहे. या तीनही सुविधांच्या अतिवापराने मायोपिया म्हणजेच दूरचे धूसर दिसण्याच्या आजाराने जगातील ३० टक्के लोकांना या प्रकारच्या दृष्टिदोषाने ग्रस्त केले आहे. या प्रकारच्या दृष्टिदोषाने जगातील २.२ अब्ज लोक बाधित झाले असून, त्यातील काही लोक उपचारांपासून वंचित आहेत. वर्तमानात कार्यालये, व्यवसाय येथील सर्व प्रकारचे व्यवहार मोबाइल्स, टॅब्लेट्स किंवा संगणकाशिवाय पूर्ण होऊच शकत नाहीत. जवळपास प्रत्येकाची नजर या तीनही प्रकारच्या स्क्रीन्सवर सतत लागून राहिल्याने डोळ्यांत जळजळ होणे, समोरचे धूसर दिसते, डोकेदुखीचा त्रास जाणवतो, झोप येत नाही, डोळ्यांतील ओलावा कमी होऊन डोळे कोरडे होतात, मेलाटोनिन हार्मोन्स निर्मिती कमी होते असे तज्ज्ञांचे मत आहे. इंटरनॅशनल मायोपिया इन्स्टिट्यूटने आणि अनेक नामवंत नेत्रतज्ज्ञांनी दृष्टी संबंधित या आजाराबद्दल चिंता व्यक्त केली आहे. लहान मुलांकडून होणाऱ्या मोबाइल्स, टॅब्लेट्स वापराबद्दल नेत्रतज्ज्ञांनी स्क्रीनचा सततच्या संपर्कात येणे नेत्रआरोग्यासाठी घातक आहे, असा इशारा देऊन मुलांच्या पालकांना मोबाइल्स, टॅब्लेट्स मुलांकडून सतत स्क्रीन वापरण्यावर सजग होऊन त्यांच्या वापरावर मर्यादा घालाव्यात अशा सावधगिरीच्या सूचना दिल्या आहेत. इंटरनॅशनल मायोपिया इन्स्टिट्यूटने या दृष्टिदोषाच्या आजारामुळे सन २०५० पर्यंत जगातील सुमारे ५० टक्के लोकांना त्रास सहन करावा लागू शकतो. त्यावरून सर्वांनी गांभीर्य लक्षात घेऊन आपापल्या नजरेची काळजी घ्यावी असे सुचवावेसे वाटते.

**- स्नेहा राज, गोरेगाव**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन

संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस

संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस

मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६

विभागीय कार्यालये :

सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.

मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००

दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.

'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.

e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com

RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन



### ‘फुले’ - एका युगप्रवर्तक परिवर्तनाचा प्रवास २५ एप्रिलला रुपेरी पडद्यावर येतोय

**मुंबई :** झी स्टुडिओज् प्रस्तुत डान्सिंग शिवा फिल्म्स आणि किंग्जमेन प्रोडक्शन्स निर्मित यांच्या माध्यमातून ‘फुले’ हा हिंदी चित्रपट जगभर येत्या २५ एप्रिल २०२५ रोजी देशभर प्रदर्शित होत आहे. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण, जातिनिर्मूलन आणि सामाजिक परिवर्तनासाठीचे कार्य या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या या क्रांतिकारी दाम्पत्याच्या प्रेरणादायी जीवनकहाणीला रुपेरी पडद्यावर मांडण्याचा हा प्रयत्न आहे, जो आजच्या पिढीला इतिहासाची जाणीव करून देतानाच नव्या विचारांची दारे उघडणारा ठरणार आहे. ‘फुले’ चित्रपटाचे निर्माते प्रणय चोक्शी, जगदीश पटेल, रितेश कुडेचा, अनुया चौहान कुडेचा, सुनील जैन आणि डॉ. राज खवारे असून, सहनिर्मितीची जबाबदारी क्रांती शानभाग, कलापी नागडा,रोहन गोडांबे, परीधी खंडेलवाल यांनी उचलली आहे. दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी या चित्रपटाचं प्रभावी दिग्दर्शन केलं आहे. ज्योतिबा फुले यांच्या भूमिकेत ‘स्कॅम १९९२’ फेम प्रतीक गांधी आणि सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत अभिनेत्री पत्रलेखा झळकणार आहेत. त्यांच्या अभिनयातून या ऐतिहासिक व्यक्तिरेखांना नवी ऊर्जा मिळाल्याचं ट्रेलरवरून स्पष्ट होतं. ‘फुले’ हा केवळ एक चित्रपट नाही, तर एका युगपुरुषाच्या विचारांचा, संघर्षाचा आणि परिवर्तनाच्या प्रवासाचा साक्षीदार ठरणारा दस्तऐवज आहे. २५ एप्रिलपासून हा सिने-अनुभव सर्वांच्या भेटीला येतो आहे.

### ‘तेनाली रामा’ मालिकेचे शतक



**मुंबई :** सोनी सबवरील तेनाली रामा या समस्त कुटुंबाला रिझवणाऱ्या मनोरंजक मालिकेने १०० भाग पूर्ण करून एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. सुरू झाल्यापासून या मालिकेने बुद्धिचातुर्य आणि सुजाणता यांचे मिश्रण करणाऱ्या सुरस कथा सादर करून सर्व वयोगटातील प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. विजयनगर सम्राज्याच्या पार्श्वभूमीवरील ही मालिका जीवनाकडे बघण्याचा एक चतुर आणि सुजाण दृष्टिकोन देत आजही प्रेक्षकांना गुंतवून ठेवत आहे. हा महत्त्वपूर्ण टप्पा पार केल्याचा आनंद व्यक्त करताना तेनालीची भूमिका करणारा कृष्ण भारद्वाज म्हणतो, या सेटवर मी पहिल्या दिवशी पाऊल ठेवले, तो दिवस मला आजही आठवत आहे. आणि यावेळी तेनाली रामाच्या रूपात केवळ हुशार आणि विनोदी नायक परतलेला नाही. गेल्या १०० भागांच्या प्रवासात तेनाली ही व्यक्तिरेखा इतकी मोठी झाली आहे की, तेनाली आता केवळ दैनंदिन समस्या सोडवत नाही, तर आपल्या बुद्धीचातुर्याच्या आणि सुजाणतेच्या बळावर तो आपल्या राज्यावर आलेल्या संकटात राज्याचे आणि प्रजेचे रक्षण देखील करत आहे. कधी तो आपल्या शत्रूवर चतुरपणे कुरघोडी करतो, तर कधीकधी तो इतरांच्या रक्षणासाठी स्वतःचा जीव देखील धोक्यात घालतो. हा तेनाली अधिक ठरेल आणि निश्चयी आहे. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पदारांचा शोध घेताना खूप आनंद होत आहे आणि खरं सांगतो, कधीकधी तर तो मला देखील आश्चर्याचा धक्का देतो!




### ‘झापुक झुपूक’ सिनेमाचा रोमांचक ट्रेलर रितेश देशमुखच्या हस्ते झाला रिलीज

**मुंबई :** जिओ स्टुडिओज् आणि केदार शिंदे ही सुपरहीट जोडी २५ एप्रिल २०२५ रोजी ‘झापुक झुपूक’ हा कौटुंबिक मनोरंजन करण-ारा सिनेमा घेऊन पुन्हा एकदा प्रेक्षकांना भेटण्यास येत आहेत. नुकतंच या सिनेमाचा धमाल ट्रेलर रितेश देशमुखने रिलीज केला आहे आणि रिलीझ होताच हा ट्रेलर सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. विशेष म्हणजे अभिनेता रितेश देशमुखचा सूरज चव्हाण खूप मोठा चाहता आहे आणि आज बिग बॉस सीजन ५ च्या यशानंतर रितेश सूरजच्या या खास क्षणी सामील झाला आहे. सूरज चव्हाण अभिनित ‘झापुक झुपूक’ ह्या सिनेमाचं ट्रेलर आनंदाची मेजवानी घेऊन आलाय. रोमांस, ऍक्शन, ड्रामा या सर्व गोष्टींवर प्रकाशझोत टाकणारा हा चित्रपट आहे. हा ट्रेलर अनेकांचं लक्ष वेधून घेत आहे. विशेष म्हणजे तरुणांमध्ये या सिनेमाची क्रेज जास्त पहायला मिळते. सूरज चव्हाणची स्टाईल आणि धमकेदार डायलॉग्स अख्ख्या महाराष्ट्रात आता गाजणार आहे. ट्रेलर मध्ये दोन कमाल गाण्यांची झलक सुद्धा पहायला मिळते. त्यातील एक गाणं नक्कीच ह्या पुढे हळद गाजवणार. त्याचसोबत सुरज आणि जुई भागवत ची छान जोडी अजून आकर्षक करते. दिग्दर्शक केदार शिंदे म्हणाले ‘झापुक झुपूक’ची कल्पना जेव्हा मला आली. सूरज चव्हाणला घेऊन त्यावेळेस बिग बॉस मराठी सुरु होतं. मी कलर्स मराठीचा प्रोग्रामिंग हेड असल्या कारणामुळे बिग बॉसची जबाबदारी माझ्यावर होती. त्यावेळी माझं आणि रितेशचं खूप बोलणं सुरु असायचं, तेव्हाच मी ती कल्पना रितेशला सांगितली. रितेश भाऊंना ही कल्पना भयंकर आवडली आणि त्यांनी सुद्धा मला सांगितलं की जर माझ्याकडे उत्तम गोष्ट आहे तर मी ती पुढे आणावी. फॅमिली एंटरटेनमेंटचा जबरदस्त तडका असलेल्या झापुक झुपूक चित्रपटाची टीम संपूर्ण महाराष्ट्राचं मनोरंजन करायला सज्ज आहे. ‘झापुक झुपूक’ चित्रपटात सूरज सोबत जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. प्रत्येकाला आपलीशी वाटणारी ही गोष्ट आहे. झापुक झुपूकचा मजेशीर ट्रेलर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे आणि आता प्रेक्षक सिनेमाच्या रिलीझ ची आतुरतेने वाट पाहत आहे. झापुक झुपूक हा सिनेमा तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात, २५ एप्रिलपासून प्रदर्शित होणार आहे.

# एलआयसी एमएफ फ्लेक्झी कॅप फंड



**१५ एप्रिल १९९३ ला एल.आय.सी. म्युच्युअल फंडाने योजना आणली. ३२ वर्षे पूर्ण होऊन योजना ३३ व्या वर्षात पदार्पण करेल. योजनेकडे १००० कोटी रुपयांची मालमत्ता आहे. तर कामगिरीचे मोजमाप करण्यासाठी निफ्टी ५०० टोटल रिटन इंडेक्स विचारात घेण्यात आला आहे. बाजारात ९३ साली फ्लेक्झी कॅप ही संकल्पना नव्हती. परंतु २०१७ ला जेव्हा सेबीने आरि ॲम्फीने वेगवेगळ्या चौकटी निर्माण केल्या. त्यानंतर एल.आय.सी.ने आपल्या एका योजनेच्या नावात बदल करून फ्लेक्झी कॅप फंड असे नामकरण केले आणि ते केले. म्हणून फंडाला ३१ ऑक्टोबर २२ या दिवशी मल्टी कॅप फंड ही योजना आणता आली आणि त्या अगोदर २५ जानेवारी २०१७ या दिवशी मिड कॅप योजना आणता आली.**

फ्लेक्झी कॅप असे का म्हटले जाते याचे थोडक्यात स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. या योजनेत ३५ टक्के लार्ज कॅप, १३ टक्के मिड कॅप आणि ४९ टक्के स्मॉल कॅप आहे. हे प्रमाण कमी जास्त करण्याचा फंडाच्या व्यवस्थापकांना निर्णय स्वातंत्र्य

**शेअर बाजार समालोचन**

**प्रमोद पुराणिक**
**९८२२०७८८२९**

देण्यात अलेले आहे. परंतु हे निर्णय स्वतंत्र म्युच्यअल फंडाचे व्यवस्थापक कशाप्रकारे वापरता यावर योजनेचे यश अपयश अवलंबून असते. कमी जोखीम असावी असे जर फंडाच्या व्यवस्थापकाला वाटले तर तो लार्ज कॅपचे प्रमाण वाढवतो आणि स्मॉल कॅपचे प्रमाण कमी करतो. याउलट जास्त भांडवलवृध्दी मिळवून द्यावी, या हेतूने स्मॉल कॅप आणि मिडकॅप जास्त प्रमाणात दिले जातात.

योजनेने एकूण शेअर्सपैकी कोण कोणत्या शेअरमध्ये जास्त गुंतवणूक केली आहे. याची आकडेवारी उपलब्ध आहे. त्यानुसार मारुती सुझुकी, एच.डी.एफ.सी. बँक, हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपन्यांमध्ये जास्त गुंतवणूक आहे तर इतर शेअर्समध्ये ती कमी आहे. योजनेने निर्देशांकाच्या तुलनेने फारशी जास्त वाढ मिळवून दिलेली नाही. फ्लेक्झी कॅप या प्रकारात इतर म्युच्युअल फंडांनी कशाप्रकारे गुंतवणूक केलेली आहे. याचा आढावा घेऊनच मग गुंतवणूक करावी. सर्व फ्लेक्झी कॅप फंड सारखे नसतात. आकारमानसुध्दा वेगवेगळे असते. पराग पारिख, एच.डी.एफ.सी., कोटक या फंडाच्या फ्लेक्झी कॅप योजना फारच मोठ्या झालेल्या आहेत. याउलट अनेक म्युच्युअल फंडाच्या योजना फारच लहान आहे. योजना केव्हा जन्माला आली कामगिरी कशी केली यावरुन आकारमान वाढते किंवा कमी होते. काही म्युच्युअल फंडांनी जुन्या योजनांची नावे बदलली तर काहींनी नव्याने योजना आणल्या असे या उद्योगात घडलेले आहे. त्यामुळे कामगिरीचा अभ्यास करून निर्णय घ्यावेत.

### राजकारणातले अर्थकारण की अर्थकारणातले राजकारण

**साप्ताहिक समालोचन**

अर्थकारण आणि राजकारण या एकाच जाण्याच्या दोन बाजू असतात. अमेरिकेत जे काही सध्या घडत आहे ते अमेरिकेत राहून प्रत्यक्ष अनुभव घेत आहोत. गांवकरीच्या वाचकांना त्याची थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न नायक की खलनायक म्हणायचे जे निर्णय घेतले जात आहेत. ते जगाला मान्य नसेल तरी काही प्रमाणात अमेरिकेत जरी विरोध होत असला तरी सर्वसामान्य माणसांमध्ये जे अमेरिकन नागरिकांना दीर्घकालीन फायदे होतील असे वाटते की, हा राजकारणाचा विजय आहे. दि वॉल स्ट्रीट जर्नल या जगात प्रसिध्द असलेल्या आर्थिक वर्तमानपत्रात अग्रलेखात एक विषय अत्यंत चांगल्या प्रकारे हाताळला आहे तो महत्त्वाचा आहे.

**दि मेनस्ट्रीट विरुद्ध वॉलस्टीट**

अध्यक्षांना गर्व अभिमान आहे की, ते अमेरिकेतल्या सर्वसामान्य कर्मचारी वर्गाचे अध्यक्ष आहेत की, मेन स्ट्रीटच्या बाजूने आहेत. वॉल स्ट्रीटच्या बाजूचा नाहीत.

अध्यक्षांनीच असे सांगितल्यानंतर मग ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बसन्ट यांनी एक पाऊल पुढे उचलले आणि ते सुध्दा अमेरिकन बँकर्स असोसिएशनच्या सभसदांसमोर बोलताना सांगितले. माझी यात वॉल स्ट्रीटवर काम करण्यात गेली. परंतु आता पुढची चार वर्षे ही मेन स्ट्रीटची आहेत. मेन स्ट्रीटची प्रगती झाली पाहिजे. गुंतवणूक वाढली पाहिजे. अमेरिकन स्वप्न पूर्ण व्हायला हवे.

अर्थकारणातल्या व्यक्तींना जे उत्तर वर्तमानपत्राने दिले आहे. ते अतिशय महत्त्वाचा आहे. प्रत्येकाची हीच इच्छा आहे. परंतु मुख्य स्ट्रीट विरुद्ध वॉल स्ट्रीट असा विरोध नसून, दोघेही एकमेकांना पूरक आहे. एकाच्या मदतीशिवाय दुसऱ्यांची प्रगती होणे शक्य नाही.

एकूण अमेरिकन जनतेच्या ६० टक्के जनता वॉल स्ट्रीटची प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या जोडली गेली आहे. गुंतवणूकदार जोखीम उचलतात नवीन कंपन्यात गुंतवणूक करतात म्हणून रोजगाराच्या संधी निर्माण होतात. जर बाजार चांगला राहिला नाही तर कर्मचारी वेगाने ४०१ (के) निवृत्तीनंतरचे नियोजन यासाठी केलेल्या गुंतवणुकीवर संकट येईल.

मांडलेल्या अनेक मुद्यांपैकी फक्त महत्त्वाचे थोडक्यात लिहिले. दोन रस्ते एकमेकांना पूरक आहेत. हे फक्त अमेरिकेला लागू नसून सर्व जगाला लागू आहेत.

सुदैवाने अर्थकारणातल्या अनेक व्यक्तींनी चांगली कानउघाडणी केली व त्याचा योग्य परिणाम तात्पुरता का होईना पण दिसून येत आहे. व्हर्जनिया अमेरिकेतून गांवकरी वाचकांसाठी.

## पीबीपार्टनर्सकडून शपथ ४.० विशेष बिझनेस मीट




**नाशिक : प्रतिनिधी**

पॉलिसी बाजारची पीओएसपी शाखा असलेल्या पीबीपार्टनर्सने आपल्या वार्षिक प्रमुख व्यवसाय संमेलनाची चौथी आवृत्ती ‘शपथ ४.०’ यशस्वीरीत्या संपन्न केली. या वार्षिक संमेलनात पीबीपार्टनर्सच्या प्रमुख भागधारकांना गेल्या वर्षाच्या कामगिरीवर विचार करण्यासाठी आणि येत्या आर्थिक वर्षासाठी मार्गदर्शिका तयार करण्यासाठी एकत्र आणले गेले.

यावेळी पीबीपार्टनर्सचा पाया मजबूत करणे आणि व्यापक, तंत्रज्ञान-सक्षम वाढीसाठी तयारी करणे यावर लक्ष केंद्रित केले गेले. भारताचे भविष्य सुरक्षित करणे, एका वेळी एक कुटुंब या आपल्या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार करत ब्रँडने एजंट भागीदार आणि ग्राहक दोघांसाठीही विमा प्रवासाच्या प्रत्येक टप्प्याला पाठबळ देणारी एक मजबूत भागीदार परिसंस्था तयार करण्याचे आपले ध्येय अधोरेखित केले.

पीबीपार्टनर्स टियर २, टियर ३ आणि उदयोन्मुख ग्रामीण बाजारपेठांमध्ये पीओएसपी-नेतृत्वाखालील वितरणात आघाडीवर आहे. हा ब्रँड आता १९,३०० हून अधिक पिन कोड कव्हर करतो, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ९०,०००+ सक्रिय भागीदारांना सहभागी करून घेतले आहे (आर्थिक वर्ष २०२३ मधल्या ५९,००० वरून वाढले आहे) आणि दररोज २०,००० पॉलिसीवर किंवा दर चार सेकंदांनी एक पॉलिसीवर प्रक्रिया करतो. त्याचे कर्मचारी ५५६ शहरांमध्ये पसरलेले आहेत आणि हे प्लॅटफॉर्म दररोज ४,५०० हून अधिक एजंट भागीदारांच्या उपजीविकेला थेट आधार देते.

पीबीपार्टनर्सचे सह-संस्थापक ध्रुव सरीन यांनी सांगितले की, आम्ही भविष्याकडे पाहत असताना आमच्या वाढीच्या धोरणाच्या केंद्रस्थानी तंत्रज्ञान आहे. एक भविष्याधारित तंत्रज्ञान एजन्सी तयार करणे हे आमचे ध्येय आहे. एजंट पार्टनरच्या समावेशाचे सुनियोजन करण्यापासून ते मदत सेवा स्वयंचलित करण्यापर्यंत आणि आरएम उत्पादकता सुधारण्यापर्यंत आम्ही संपूर्ण भारतात आणि विशेषतः तंत्रज्ञान व विश्वास एकत्र चालणे आवश्यक असलेल्या ग्रामीण बाजारपेठांमध्ये एक अखंड, सक्षमीकरण अनुभव तयार करत आहोत.

ते पुढे म्हणाले की, दुसरे मोठे लक्ष सेवा उत्कृष्टतेवर आहे. आम्ही पारदर्शकता, कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि एजंट भागीदारांना आत्मविश्वासाने वाढण्यास मदत करण्यासाठी एआय चलित सेवा प्रणाली तयार करत आहोत. आमचे यश आम्ही मोठ्या प्रमाणात सातत्यपूर्ण, विश्वासार्ह सेवा किती चांगल्या प्रकारे देतो, यावर अवलंबून असेल.

## मॅटरने अहमदाबादच्या चांगोदर येथे सुरू केले पहिले मॅन्युफॅक्चरिंग हब




**अहमदाबाद :**

उत्पादन क्षमतेचा वेग वाढवत आणि सस्टेनेबल वाहतुकीच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा गाठत, मॅटरने चांगोदर, अहमदाबाद येथे आपल्या पहिल्या वर्ल्ड -क्लास मॅन्युफॅक्चरिंग हबचे उद्घाटन केले. गुजरातचे माननीय मुख्यमंत्री श्री. भूपेंद्रभाई पटेल यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन झाले असून, भारतात इलेक्ट्रिक वाहतुकीच्या नव्या युगाची सुरूवात झाली आहे. उत्पादनातील उत्कृष्टता, प्रक्रियेतील वेग आणि नावीन्यतेला चालना देण्याच्या उद्देशाने डिझाइन करण्यात आलेले हे हब मॅटर एरा - जगातील पहिली मैन्युफॅक्चर्ड गिअर्ड इलेक्ट्रिक बाइकसाठी महत्त्वपूर्ण असून, सस्टेनेबल वाहतुकीच्या भविष्यास नवी दिशा देणार आहे.

२.२५ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे हब ‘इंडस्ट्री ४.०’च्या पुढच्या पिढीतील तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. पॉवरपॅक, पॉवरट्रेन आणि व्हेईकल असेंब्ली लाइनसह टॉर्चर टेस्ट ट्रॅकचा समावेश असून, अचूक व सस्टेनेबल उत्पादनक्षमतेचा दर्जा यामुळे निश्चित केला जाईल. वर्टिकल इंटिग्रेशन आणि लीन मॅन्युफॅक्चरिंगच्या तत्त्वांवर आधारित असलेले हे प्लांट उच्च गुणवत्ता आणि कार्यक्षमतेचा आदर्श ठरेल. सध्या एका शिफ्टमध्ये २५ वाहनांचे उत्पादन सुरू असून, लवकरच हे हब वार्षिक १,२०,००० युनिट्सच्या क्षमतेपर्यंत वाढवले जाणार मॅटर एरा मे महिन्यापासून उपलब्ध होणार आहे.

या हबमुळे मॅटर इलेक्ट्रिक पॉवरट्रेन आणि बॅटरीतील नाविन्यतेला चालना देऊन उत्पादन क्षमतेत वाढ करेल आणि देशाच्या सस्टेनेबल वाहतूक परिवर्तनास बळकटी देईल. मॅटर मॅन्युफॅक्चरिंग हब ‘विकसित भारत’च्या दृष्टिकोनाशी सुसंगत असून, पुढच्या पिढीच्या इलेक्ट्रिक मोटारसायकल्सच्या निर्मितीसाठी आधारस्तंभ ठरणार आहे. मॅटरने गिर वन प्राधिकरणाला एरा बाईक भेट देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे वनरक्षक प्रदूषणमुक्त, शांत आणि वन्यजीवांच्या हालचालींना अडथळा न आणणारी गस्त घालू शकतील.

देशभरात इलेक्ट्रिक वाहने स्विकारली जात असताना मॅटरचे हे हब ‘मेक इन इंडिया’ आणि ‘इनोव्हेट इन इंडिया’ उपक्रमांना पाठबळ देत पुढील तीन वर्षांत सुमारे २,००० रोजगार निर्माण करणार आहे.

## जेबीएलने केले ट्यून सिरीज २ लॉन्च




**मुंबई :** जेबीएलची नवीन ट्यून सिरीज २ ही आकर्षक डिझाइन्सच्या त्रिकूटासह वैयक्तिक ऑडिओची पुनर्परिभाषा करत आहे - अर्गो नॉमिक बड-शैलीतील डिझाइनसह ट्यून बड्स २, स्लीक क्लोज्ड-टाइप स्टिक डिझाइनसह ट्यून बीम २ आणि वर्धित ध्वनी गुणवत्तेसाठी मोठे १२ मिमी ड्रायव्हर्स असलेले ओपन-टाइप स्टिक डिझाइनसह बहुमुखी ट्यून फ्लेक्स २, जे अधिक ओपन लिसनिंग अनुभव पसंत करणाऱ्या वापरकर्त्यांसाठी योग्य आहे. एकूण ४८ तासांपर्यंतच्या प्लेबॅकच्या प्रभावी बॅटरी लाइफसह, ट्यून सिरीज २ दीर्घकाळ चालणाऱ्या कार्यक्रमांमध्ये अखंड संगीत ऐकण्याची सुविधा देते. जेबीएलची नवीन ट्यून सिरीज २ उत्कृष्ट डिझाइनच्या त्रिकुटाने वैयक्तिक ऑडिओची पुनर्परिभाषा करत आहे - यामध्ये एर्गोनॉमिक बड-स्टाईल डिझाइनसह ट्यून बड्स २, स्लीक क्लोज्ड-टाइप स्टिक डिझाइनसह ट्यून बीम २ आणि वर्धित ध्वनी गुणवत्तेसाठी मोठ्या १२ मिमी ड्रायव्हर्ससह उपलब्ध आहेत.

## Redmi -5 स्मार्टफोन उद्या लॉन्च होणार

**नवी दिल्ली :**

Redmi-5 हा स्मार्टफोन नुकताच इंडोनेशियात लॉन्च करण्यात आला होता. आता हा फोन लवकरच भारतीय बाजारात लाँच करण्यात येणार आहे.

Redmi-5 नुकताच इंडोनेशियात ऑक्टा-कोर Unisoc T7250 चिपसेट आणि 5,200mah बॅटरीसह लॉन्च करण्यात आला होता. कंपनीने भारतात लाँचिंगच्या तारखेसह त्याचे डिझाइन, कलर ऑप्शनसह प्रमुख फीचर्स जाहीर केली आहेत. फोनच्या उपलब्धतेचा तपशीलही समोर आला आहे. विशेष म्हणजे या महिन्याच्या सुरुवातीला लाँच करण्यात आलेला Poco C71 देखील Redmi-5 प्रमाणेच फीचर्ससह येतो. Redmi-5 भारतात १५ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता लाँच होणार आहे. अधिकृत लँडिंग पेजवरून ही माहिती मिळाली आहे. हे फोन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि Xiaomi India ई-स्टोअरच्या माध्यमातून भारतात खरेदीसाठी उपलब्ध असतील. हा फोन जैसलमेर गोल्ड, जस्ट ब्लॅक आणि पाँडिचेरी ब्लू रंगात उपलब्ध असेल.

# ‘नामको’ बँकेस ६५ कोटी ३८ लाखांचा भरघोस नफा


## अध्यक्ष सोहनलाल भंडारी : सभासदांना १५ टक्के इतका लाभांश देण्याचा मानस

**नाशिक : प्रतिनिधी**

सन २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात ६५ कोटी ३८ लाख ढोबळ नफा झाल्याची माहिती बँकेचे विद्यमान अध्यक्ष सोहनलाल भंडारी यांनी दिली.

बँकेचे सन्माननीय सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांनी केलेले सहकार्य व बँकेवर तसेच संचालकांवर दाखविलेला विश्वास यामुळे बँकेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. याबद्दल मा. चेअरमन सोहनलाल मोहनलाल भंडारी व सर्व संचालक यांनी सर्वांचे आभार मानून बँकेची मार्च २०२५ अखेरची आर्थिक परिस्थिती सादर केली. बँकेच्या सर्व पॅरामीटर्समध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.

आपण बँकेवर दाखविलेल्या



निर्विवाद विश्वासामुळेच व सहकार्यामुळे बँकेने यावर्षी बँकेचा एकूण व्यवसाय (ठेवी २४३९.०१ + कर्ज १३२२.२४) रु.३७६१ कोटी २५ लाख इतका झाला आहे. तसेच बँकेचा ढोबळ एनपीए सध्या ४.४० टक्के असून, निव्वळ एनपीए ०.०० टक्के आहे हे केवळ सभासद, ठेवीदार, कर्जदार, व हितचिंतक यांनी दाखविलेला बँकेवरचा विश्वास आहे, हा टप्पा पार पाडण्यात आपल्या सर्वांचा व कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे. बँकेचा एकत्रित व्यवसाय आर्थिक वर्ष २०२६ अखेर रु.५००० कोटींवर नेण्याचा सर्व संचालकांचा मानस आहे.

बँकेने ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात रुपये ६५ कोटी ३८ लाख ढोबळ नफा मिळवला, सर्व तरतुदी वजा जाता निव्वळ नफा रक्कम रु.४१ कोटी ८१ लाख इतका झाला आहे. तसेच ठेवींमध्ये वाढ होऊन एकूण ठेवी रु. २४३९ कोटी झाल्या असून, चालू आर्थिक वर्षात ठेवींमध्ये रु. २५४ कोटी ६३ लाखाने वाढ झालेली आहे. कर्ज वाटप रुपये १३२२ कोटी २४ लाख केले असून, चालू आर्थिक वर्षात एकूण कर्जात रु. २८२ कोटी ६४ लाखाने वाढ झालेली आहे. तर बँकेची गुंतवणूक रुपये १४३६ कोटी ५० लाख इतकी आहे. बँकेच्या राखीव निधीमध्येही मागील वर्षीपेक्षा वाढ होऊन रुपये ४३६ कोटी २८ लाख निधी जमा

**दि ३१ मार्च २०२५ अखेरची सांपत्तिक स्थिती** (रक्कम कोटीत)

| अ.क्र. | तपशील | ३१.०३.२०२४ | ३१.०३.२०२५ | वाढ/घट टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | ठेवी | २१८४.३८ | २४३९.०१ | ११.६६ |
| २ | कर्ज | १०३९.६० | १३२२.२४ | २७.१८ |
| ३ | गुंतवणूक | १४४८.६५ | १४३६.५० | - |
| ४ | रिझर्व्ह फंड | ३९१.५० | ४३६.२८ | ११.४४ |
| ५ | भागभांडवल | ५१.४८ | ५२.८९ | २.७४ |
| ६ | एनपीए (निव्वळ) | ०० | ०० | ०० |

आहे तसेच बँकेच्या सभासदांसाठी आनंदाची गोष्ट म्हणजे या वर्षी सभासदांना १५ टक्के इतका लाभांश देण्याचा मानस आहे.

सदर प्रसंगी मा. सर्वश्री उपाध्यक्ष सुभाष चंपालाल नहार, जनसंपर्क संचालक सपना आनंद बागमार, ज्येष्ठ संचालक वसंत निवृत्ती गिते, हेमंत हरीभाऊ धात्रक, विजय राजाराम साने, महेंद्र मुळचंद बुरड, गणेश बबन गिते, भानुदास नारायण चौधरी, नरेंद्र हिरामण पवार, हितेंद्र (आकाश) जयप्रकाश छाजेड, प्रकाश मोतीलाल दायमा, हरीश बाबूलाल लोढा, ललितकुमार जवरीलाल मोदी, अविनाश मुळचंद गोठी, अशोक श्रावण सोनजे, प्रफुल्ल बुधमल संचेती, रंजन पुंजाराम ठाकरे, देवेंद्र हरीलाल पटेल, शीतल सूरज भट्टड, प्रशांत अशोक दिवे, तानाजी सुकदेव जायभावे, संकेत सुरेशचंद पारख तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी विश्राम दत्तात्रेय दीक्षित हे उपस्थित होते.

# महामानव



**महामानव डॉ. भीमराव आंबेडकर यांची आज जयंती. भारतीय इतिहासात सर्वसामान्य व तळागाळातील लोकांच्या उद्धारासाठी ज्यांनी ज्यांनी कार्य केले, त्यातील एक अग्रणी नाव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. ते महामानव आहेत ते त्यांच्या गुणांमुळे, त्यांच्या बुद्धिमत्तेमुळे व त्यांच्या लेखन व कार्यामुळे. ज्या काळात तंत्रज्ञान प्रगत नव्हते त्या काळातही देशातील कोट्यवधी जनतेच्या मनात आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी अढळ आदराचे स्थान मिळवले आहे.**

राजेश शिरभाते
९८६९५७८७२९

बाबासाहेबांचे अनेक गुण या देशातील तरुणांनी व इतरांनीही आचरणात आणण्यासारखे आहेत. त्यांची बुद्धिमत्ता ही त्यांना मिळालेली देणगी असली तरी त्याचा वापर त्यांनी केवळ स्वतःच्याच आर्थिक वा राजकीय फायद्यासाठी केला नाही. त्यांनी त्या ज्ञानाचा वापर सर्वसामान्यांच्या भल्यासाठी केला. रुढार्थाने त्यांना दलित समाजाचे नेते म्हटले जात असले तरी ते सकल भारतीय समाजाचे नेते होते. मार्गदर्शक होते, विचारवंत होते. त्यांनी मांडलेल्या आर्थिक सुधारणा, त्यांचा देशाच्या अर्थशास्त्राविषयीचा अभ्यास हा येणाऱ्या शतकांनाही मार्गदर्शक ठरणारा आहे. कायदे, अर्थकारण, समाजकारण याविषयीचे पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष समाजामधील त्यांचे कार्य याचा ते एक सुरेख नैसर्गिक असा दुवा होते. त्यामुळे देशातील तळागाळातील लोकांचे प्रश्न त्यांना समजले, त्यांनी त्यांच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. त्या काळातील दलित समाजावर होत असलेल्या अन्यायांनी त्यांना व्यथित केले.

परदेशातही शिक्षण घेतल्यामुळे माणसामाणसामधील ही वागणूक त्यांना अस्वस्थ करणारी होती. त्यामुळे मागासवर्गीय समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी दुहेरी प्रयत्न केले. एका बाजूला समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची समावेशकता निर्माण करणे व दुसरीकडे समाजानेच स्वतःच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा, असा मंत्र त्यांनी दिला. त्यातील शिक्षणाच्या मंत्रानेच आज अनेकांनी आपल्या व समाजाच्या विकासात मोठे योगदान दिल्याचे आपण पाहतो. त्या काळात धर्मातील काही बाबींमुळे त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. ब्रिटिशांमुळे व त्यातही लॉर्ड एलफिंस्टनसारख्या अधिकाऱ्यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षणाचा अधिकार मिळाला होता. त्यामुळे हे शिक्षण कोणत्याही स्थितीत मिळवण्याचा प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यानुसार त्यांनी अनेकांना प्रत्यक्ष व बहुजनांना अप्रत्यक्ष प्रोत्साहन दिले.

शिक्षणाने आपले जीवनमान सुधारणार असल्याची त्यांची भूमिका होती. त्याचे दृश्य परिणामही त्यानंतरच्या काळात दिसून आले. बाबासाहेबांनी दाखवून दिलेल्या मार्गांवरून चालणाऱ्या अनेक बुद्धिमान व्यक्तींनी नंतर देशाच्या विकासात भर घातली आहे.

आज बाबासाहेबांचे शिक्षणाचे, स्वतःच्या उन्नतीचे विचार सर्वच स्तरातील विद्यार्थी व तरुणांनी आत्मसात करण्यासारखे आहेत. जे भारतीय देशाच्या बाहेर व विविध विद्यापीठांमध्ये आहे, त्यांना बाबासाहेबांच्या जागतिक प्रतिष्ठेचीही कल्पना येत असणारच. अनेक विद्यापीठांमध्ये त्यांच्या लेखनावर आधारित पाठ्यक्रम आहेत.

आपल्या ज्ञानाचा वापर व्हावा, आपल्याकडून समाजाची, आपल्या बांधवांची सेवा व्हावी. सर्वांना न्याय वागणूक मिळावी हे आदर्श जपायला हवेत. त्याचबरोबर संघर्ष करा ही त्यांची शिकवणही लक्षात ठेवली पाहिजे. संघर्ष अस्तित्वासाठी असावा, आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी असावा. समाजातील चुकीच्या गोष्टींच्या विरोधात असावा. या लहान गोष्टींच्या आचरणातूनही आपण या महामानवाला आपल्या पातळीवर अभिवादन करू शकतो. त्याची जाणीव प्रत्येक भारतीयाने ठेवणे आवश्यक आहे.



# चैत्रोत्सव : शिस्तीत जा, मस्त दर्शन घ्या!

**सप्तशृंगगडावर चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे सोशल मीडियावर व्हायरल झालेले व्हिडिओ पाहून या उत्सवासाठी एकूणच जे नियोजन करायला पाहिजे, ते न झाल्यामुळे अशी परिस्थिती ओढावते.**

अशोक थोरात
७५८८०४०३६३

श्रद्धा आणि भावना याबरोबर आता आम जनतेला या उत्सवामुळे किती ताप होतो, ही दुसरी बाजू पण विचारात घ्यावी लागेल. चैत्री पौर्णिमा नांदुरी गडावर भव्य यात्रा भरते. सुमारे एक करोड भाविक येत असतात.

मध्य प्रदेश, गुजरात, खानदेशातील अहिराणी पट्टा यांची हजेरी देवी चरणी असते. परंतु भक्तांचा अनेकांना फायदा तर अनेकांना त्रास सहन करावा लागतो.

मालेगाव ते ब्राह्मणगाव कॅनॉलपर्यंतचा रस्ता या भाविकांची खासगी प्रॉपर्टी समजून चालत असतात.

रस्त्यातील हॉटेल्स, बार, बंदी असलेला गुटखा आणि न बोललेले बरे अशा वस्तू विक्रीतून अनेक व्यावसायिक मालामाल होत आहेत. या चार दिवसांत सहा महिन्यांचा व्यवसाय होतो. रस्त्यात सर्वत्र घाण, रस्त्याच्या कडेलाच शौचाला बसणे, सर्वत्र प्लास्टिकचा खच असे दृश्य पाहावयास मिळते. शिर्डीला वर्षभर साईभक्त पायी जात असतात. परंतु कुणालाच त्रास होत नाही. अगदी शिस्तीत रस्त्याच्या कडेने चालतात. मुंबई ते शिर्डी जातात, पण कुणालाच कंटाळा यावा असे नसते.

पंढरपूरच्या दिंड्या तर शिस्तीचे उत्तम उदाहरण. चैत्रोत्सवात मात्र सगळे उलट चित्र आहे. काही पुण्यवान त्यात मोठे व्यापारी व राजकारणी असतात.

कुणी सरबत, कुणी जेवण, कुणी चहा, कुणी पाणी पाऊच असे हवे ते उपलब्ध असल्याने एन्जॉय करीत जाणे म्हणून वयस्कर महिला, पुरुष, तरुण-तरुणी लहान बाळे सुद्धा यात्रेला जातात. चार- पाच दिवस सटाणा-मालेगाव रस्त्यावर वाहन चालवता येत नाही. अर्जंट असेल ॲम्ब्युलन्स असेल तरच जातात. पण दुप्पट वेळ व दुप्पट इंधन जाळून जावे लागते. निवडून आलेले व परत निवडणूक लढवण्यास तयार असलेले दानशूर सर्व व्यवस्था करतात.

सर्वांत मोठा त्रास होतो तो आवाजाच्या वाद्यांचा. अतिउत्साही भक्तांना कदाचित राग येईल, पण भक्तीवर श्रद्धेवर अजिबात शंका नाही. फक्त आपल्यामुळे समाजाला होणारा त्रास याचा विचार सर्व घटकांनी करून शिस्तीत जा शांततेत जा व मस्त दर्शन घ्या हीच अपेक्षा आहे.

सटाणा, मालेगाव बसेस बस स्टँडपासून चार कि.मी. अंतरावर टेहरे चौफुलीवरच थांबवाव्या लागतात. प्रवाशांना उन्हात चार कि.मी. पायी मालेगावला जावे लागते हा विचार कुणी करणार आहे का. एसटीला दुप्पट वेळ व दुप्पट डिझेल लागते म्हणजे देवीच्या आराधनेत आपण काय करतो याचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. ही यात्रा खरे तर पाटणा फाटा लोहणेर वसाकामार्गे गेली तर कुणालाच त्रास होणार नाही. कारण कमी वर्दळीचा तो रस्ता आहे, याचा पण विचार करून बघायला हरकत नाही.




# ज्येष्ठांनो चिंता नको, 'लिव्हिंग विल' आहे ना मदतीला!


## जनजागृतीची गरज : सामाजिक संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज

नाशिक : देवयानी सोनार

**दोन दिवसांपूर्वी एका निवृत्त मुख्याध्यापकाने पत्नीच्या आजारपणाचे हाल सहन न झाल्याने तिचा गळा दाबून खून केला आणि नंतर स्वतःही गळफास घेत जीवन संपविले. त्यांची दोन्ही मुले उच्चशिक्षित असून, आपल्या दोन्ही मुलांशी चांगला संवाद असूनही पत्नीला होणारा त्रास न बघविल्याने आत्महत्येसारखे पाऊल उचलले. ही घटना दुर्दैवी असली तरी कुटुंबव्यवस्थेतील एकाकीपणा यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. ज्येष्ठांनी टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वी लिव्हिंग विलचा पर्याय अवलंबण्याची गरज आहे.**







नुकतेच नाशिक येथील वकील महेंद्र एकबोटे यांनी पहिले वैद्यकीय इच्छापत्र महानगरपालिकेचे सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत शेटे यांच्याकडे सुपूर्द केले होते. लिव्हिंग विल हा पर्याय असताना लिव्हिंग विलबाबत अजून जनजागृती नसल्याने अनेक ज्येष्ठांनी आत्महत्यासारखे पाऊल उचलले आहे.

वैद्यकीय उपचारांची इच्छा,पैसा असूनही त्या व्यक्तीला होणाऱ्या यातना संपाव्यात म्हणून सर्वोच्च न्यायालयाने कॉमन केस विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या प्रकरणात नागरिकांना सन्मानाने मृत्यू येण्याचा हक्क मान्य केला आहे. भारतात देहत्याग कायदेशीर नसला तरी सर्वोच्च न्यायालयाने २०२३ रोजी दिलेल्या एका निर्णयामुळं मरण लांबवणाऱ्या उपचारांना नकार देण्याचा मार्ग सुखकर केला आहे. यात कस्टेडिअन म्हणून वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यात खऱ्या कॉपीची खातरजमा करून छायांकित कॉपी स्वतः जवळ सुरक्षितपणे ठेवावी लागते. त्यानंतर भविष्यात आवश्यकता पडेल त्यावेळी कस्टेडिअन छायांकित प्रत हॉस्पिटलमध्ये जमा करता येते.

लिव्हिंग विल म्हणजे वैद्यकीय इच्छापत्र. असह्य जीवन जगून मरण येण्यापेक्षा, अखेरचा प्रवास सुसह्य आणि इच्छेनुसार झाला पाहिजे, यासाठी लिव्हिंग विल तयार केली जाते. या लिव्हिंग विलद्वारे इच्छुकांना आपल्या भविष्यकालीन वैद्यकीय आदेशाची प्रत महानगरपालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यांकडे जतन करता येणार आहे.

### स्टॅम्पची गरज नाही

लिव्हिंग विल करू इच्छिणाऱ्यांसाठी मुंबई उच्च न्यायालयाने सरकारद्वारे यंत्रणा उपलब्ध केली आहे. त्यासाठी कोणत्याही स्टॅम्पची आवश्यकता नाही. विल लिहून दोन साक्षीदारांसमोर सही करून नोटरी करून ठेवता येते. लिव्हिंग विल सुरक्षिततेसाठी कस्टेडिअन नियुक्त करण्यात आले आहेत.

- भविष्यात एखादा गंभीर आजार उद्‌भवल्यास, आपण शुद्धीत नसताना किंवा आपल्या शरीराला कोणत्याही जाणिवा नसताना त्यावर कोणत्या प्रकारचे उपचार घ्यायचे किंवा नाकारायचे, याचे स्पष्ट निर्देश वैद्यकीय इच्छापत्रात लिखित स्वरूपात असतात.

### इच्छापत्र महत्त्वाचे

अनेक सुशिक्षित व्यक्ती आजही लिव्हिंग विल (वैद्यकीय इच्छापत्र) या संकल्पनेबाबत अनभिज्ञ आहेत. लिव्हिंग विल तयार करणे कमी खर्चिक आहे. याबाबत समाजात प्रबोधन होणे गरजेचे आहे. जर तुम्ही शारीरीकदृष्ट्या पूर्णपणे विकलांग झाला आहात. बरे होण्याचा कुठलाही पर्याय नाही. तेव्हा तुम्ही उपचार घ्यायचे की नाही? हे ठरवू शकतात. यासाठी अशा प्रकारचे इच्छापत्र महत्त्वाचे आहे.

### व्हेंटिलेटर लावता येत नाही

रुग्णालयात मृत्यू उगाचच लांबवला जाऊ नये, अशी आपली इच्छा असल्यास लिव्हिंग विलद्वारे ती पूर्ण करता येते. व्यक्ती आजारी पडल्यास जर तिचे शरीर आणि मेंदू काम करत नसेल तर व्हेंटिलेटर लावता येत नाही. नळ्यांद्वारे अन्न न देता घरीच किंवा रुग्णालयात अंतिम श्वास घेऊ देण्याचा लिखित निर्णय लिव्हिंग विलद्वारे घेता येतो.



वैद्यकीय इच्छापत्र, लिव्हिंग विलबद्दल सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे आणि वैद्यकीय इच्छापत्र किंवा लिव्हिंग विलमध्ये कोणताही धोका नाही हे अगोदर समजून घ्यायला हवे. वैद्यकीय इच्छापत्रामुळे लोक काय म्हणतील याची मानसिक अडचण दूर होते. टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वी या घटनेने वैद्यकीय इच्छापत्राचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.
**-ॲड. अविनाश भिडे,** ज्येष्ठ वकील

वैद्यकीय इच्छापत्राबद्दल अजून समाजात माहिती नाही. ती एक कायदेशीर प्रक्रिया आहे. वैद्यकीय उपचार करता येत नसेल. पैसा, वेळ आणि इच्छा नसेल तर होणाऱ्या त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी वैद्यकीय इच्छापत्र करून ठेवल्यास वैद्यकीय उपचार त्या व्यक्तीच्या इच्छेनुसार बंद करता येतात.
**- ॲड. दीपक पाटोदकर,** वकील

# विस्मरणात गेलेला सम्राट

(भाग २)



जयंती



डॉ. संजय धुर्जड
९८२२४५७७३२

कलिंग युद्धात झालेल्या क्रूर मानवसंहाराने व्यथित झालेल्या सम्राटाने प्रायश्चित्त करण्याचे ठरविले. अशा वेळी त्यांना तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या धम्म मार्गावर चालण्याचा साक्षात्कार झाला. इ.स. पूर्व २४०, म्हणजे सम्राट अशोकाच्या कारकिर्दीच्या आठव्या वर्षीच हे युद्ध आणि परिणामी हे परिवर्तन घडले. त्या घडीला, सम्राट अशोकाचे आजवरच्या भारताच्या इतिहासातले सर्वांत मोठे साम्राज्य होते. सध्याच्या अफगाणिस्तान, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश आणि भारत असे सर्व देश मिळून विस्तारलेल्या या साम्राज्याचा कारभार अशोकाने पुढे तीस वर्षे चालविला. त्याला एक आदर्श शासक म्हणून ओळखले जाते, ज्याने शांतता आणि आदराने या विशाल आणि वैविध्यपूर्ण अशा मौर्य साम्राज्याचा कारभार केला. सम्राट अशोकाच्या महानतेबद्दल जितकं सांगावं तितकं कमीच आहे.

जगातला आजवरचा सर्वांत शक्तिशाली तसेच प्रभावशाली आणि लोककल्याणकारी राजा म्हणून त्याची गणणा केली जाते. अशोकाची कीर्ती मुख्यत्वे त्याच्या स्तंभ आणि शिलालेखांमुळे समजते. ज्यामुळे त्याचे कार्य आणि विचार आपल्यापर्यंत विस्तृतपणे पोहोचू शकले. या शिलालेखांनी एक चिरकालीन ऐतिहासिक नोंद जतन केलेली आहे. त्याला एक आदर्श शासक म्हणून ओळखले जाते. या मौर्य साम्राज्याचा ३७ वर्षे कारभार करताना, धार्मिक स्वातंत्र्य, गरीब जनतेसाठी विशेष सहाय्य, हिंसा आणि प्राण्यांप्रति क्रूरतेला बंदी, मानवी जीवनाचे पावित्र्याचे जतन करणे, पाणी, रस्ते, शेती, अशा मूलभूत सुविधा देऊ करणे यांसारख्या असंख्य लोककल्याणकारी कार्य अशोकाने त्या काळी केले आहे. ज्याला आपण अखंड भारत असे संबोधतो, तेच तर सम्राट अशोकाचे साम्राज्य होते. असा हा अखंड भारत निर्माता आपल्या भारतीयांच्या विस्मरणात का आणि कसा गेला, असा साधा प्रश्न आपल्याला पडू नये? अखंड भारतची बोंब मारणाऱ्यांना सम्राट अशोकाचा इतिहास माहीत नसावा का? किमान अखंड भारत निर्मितीच्या निमित्ताने सर्व भारतीयांचे ते प्रेरणास्थान असावे म्हणून का असेना, अशोक जयंती का साजरी केली जात नाही? असे म्हटले तर तुम्हीही माझ्या मताशी सहमत व्हाल, नाही का?

तथागत भगवान गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या सुमारे अडीचशे वर्षांनंतर सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार करून पुढे त्याचा प्रचार आणि प्रसारही केला. भारत देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत बौद्ध धर्म वाढविला, तसेच भारताबाहेर देखील ब्रह्मदेश (आताचे म्यानमार) मध्य आशिया (आताचे तिबेट), पश्चिम आशिया (अफगाणिस्तान) पूर्व आशिया (जपान, थायलंड, इंडोनेशिया) या भागात बौद्ध धर्म वाढविला. त्याच्या विचारसरणीच्या केंद्रस्थानी बौद्ध धर्म होता. आता काही वास्तविक बाबी लक्षात घेण्यासारख्या आहे. बुद्धांच्या आधीच्या काळात हिंदू असा कुठलाही धर्म अस्तित्वात नव्हता. बुद्धांच्या आसपासच्या कालखंडात जैन धर्माचा उगम झालेला दिसतो. तसेच बुद्धांच्या नंतर दोनशे वर्षांनी चंद्रगुप्त मौर्यांचे शासन आले. साधारणपणे तीनशे वर्षांनी अशोकाचा कालखंड अस्तित्वात आला. याच कालावधीत अनेक स्तूप, लेण्या, शिलालेखांची निर्मिती झाली. पुढील शतकांत गुप्त, चोल, पाल्लव, चालुक्य, राष्ट्रकूट...इ. शासक आले. त्यांची आपापली धार्मिक मान्यता होती. हिंदू (सनातनी) धर्मात वर्णभेदावर आधारित समाजव्यवस्था होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे सामाजिक वर्गीकरण असल्याचे दिसून येते.

हीच प्रचलित वर्णभेद समाजव्यवस्था आणि कर्मकांड मोडीत काढून बुद्धांनी परिवर्तनासाठी धम्म आणि संघाची स्थापना केली. सम्राट अशोकाने त्याचेच पुनरुज्जीवन करून भारत देश बुद्धमय केला होता. कालांतराने सामाजिक वर्णभेद मानणाऱ्यांनी त्याला विरोध करून, हळूहळू मुक्त विचारसरणीवादी विचारव्यवस्थेला हद्दपार केले. नवव्या दहाव्या शतकापासून सुरू झालेली ही हद्दपारी बाराव्या, तेराव्या शतकात बौद्ध धर्म या देशातून नामशेष झाला. त्यात भर म्हणून मध्य आणि पश्चिमी आशियायी भागातून झालेले परकीय इस्लामिक आक्रमणकार्यांनी स्थानिक राज्यही संपविली, हा इतिहास आहे. नंतर पुन्हा हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदूंचे राज्य निर्माण केले. तेव्हाही त्यांना याच वर्णव्यवस्था मानणाऱ्या मानसिकतेच्या घटकांनी विरोध केलाच होता. नंतर ब्रिटिश आले, देश पुन्हा स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र भारताच्या मोजक्या शिल्पकारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव अग्रभागी घ्यावेच लागेल. जो विरोध बुद्धांना झाला, तोच शिवाजी महाराजांना आणि संभाजी महाराजांना झाला. तोच विरोध आत्ताच्या काळात सम्राट अशोका आणि बाबासाहेबांना झालेला आहे. सत्यशोधक महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले देखील यातून सुटू शकले नाही.

समतावादी, लोकाभिमुख, स्वतंत्र आणि तर्काधारित विचारसरणी असलेल्या समाजाचे स्वप्न बघणाऱ्यांना या देशात कायम विरोधच होत आलेला आहे, हे वास्तव स्वीकारायलाच हवे. असे अगणिक समाजसुधारक, संत, महात्मे, पुरोगामी विचारवंत, लेखक, कलाकार आणि सर्वसामान्य कार्यकर्ते यात होरपळलेले आहेत. केवळ विरोध म्हणून नाही तर त्यांच्या चारित्र्याचे हनन करणारा चुकीचा इतिहास लिहून त्यांची बदनामी करण्याची आणि त्यांची महानता, त्यांचे शौर्य आणि त्यांचे धर्म, देश आणि समाजाप्रति असलेले योगदान क्षीण करण्याचे कटकारस्थाने रचली, शिजली आणि तडीस नेलेली आहे. फुल्यांमुळे शिवाजीराजे पुन्हा समोर आले. बाबासाहेबांमुळे खुद्द भगवान गौतम बुद्ध आणि बौद्ध धर्माची या देशात पुनर्स्थापना झाली, असे मी म्हणेन.

लाखो करोडो अनुयायांना समाजात सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून दिली, त्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक भारतात धर्म आणि वर्णभेदी समाजव्यवस्थेला तडा देऊन नवबौद्ध समाज घडविला. समाजातील अतिमागास आणि शेवटच्या घटकाला मुख्य प्रवाहात आणून त्यांना माणूस म्हणून हक्काने जगण्याचे साधन निर्माण केले, त्याला आज आपण भारतीय संविधान म्हणून ओळखतो. त्या महान आत्म्यास विनम्र अभिवादन.

सम्राट अशोकाने देखील अशाच समाजव्यवस्थेचा पाया रचला होता. शांती, समता आणि विकास या त्रिसूत्रीवर शासन केले. अशा या भारतभूमीच्या महान सम्राटाला आपण पूर्णपणे विसरून गेलो आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या साम्राटाची महानता आणि समाजास योगदान ओळखले असावे, म्हणून तर त्यांनी या देशाची प्राथमिक ओळख म्हणून देशाच्या संविधानावर अशोक स्तंभ आणि देशाच्या तिरंग्याच्या मधोमध अशोक चक्र विराजमान केले. भारताच्या इतिहासात भगवान गौतम बुद्ध आणि सम्राट अशोक कायमस्वरूपी स्मरणात राहतील अशी तरतूद बाबासाहेबांनी करून ठेवली असूनदेखील आपण या तिन्ही महात्म्यांना समाजाच्या एका विशिष्ट वर्गापर्यंत मर्यादित करून ठेवले आहे, ही खरी शोकांतिका आहे. अशोकाच्या नावाने एखादा शिक्का, मोहोर, एखाद दोन शौर्य मेडल, झाड आणि रस्त्याला नाव किंवा योजनेला नाव देऊन आपण त्यांचे महात्म्य कमी करतोय. त्या महान सम्राटाला या देशात उचित आदर-सन्मान मिळायलाच हवा. बाबासाहेबांच्या मनी असलेली इच्छा ओळखून या सम्राटाने या देशाला दिलेले योगदान आणि एक आदर्श शासक म्हणून त्यांची जयंती शासकीय पातळीवर साजरी व्हावी. भावी पिढीला आपल्या उज्वल इतिहासाची माहिती व्हावी, त्यांना आदर्श समाजव्यवस्था आणि आदर्श शासक म्हणून त्यांची पुर्नओळख व्हावी, हीच मनस्वी इच्छा...!

(समाप्त)